Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला--सोमवार तारीख १ माहे आक्टोबर सन १९१७ ई० [अंक ३९


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या व्हटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं जनपमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } Lyon Scott एजंट

नो नं १

# पाहिजे.

देवघेवीच्या दुकानाकरतां गुमास्ते पाहिजेत. पेनशनर लोकांस प्रथम पसंत केले जाईल. जास्त खुलासा खालील पत्त्यावर.

सही

गुलाबराय गोविंदराय दुकान अकोला वऱ्हाड

नो० नं. ३७९

## आयुष्याचा विमा.

विचार करण्यांत वेळ घालवून आपलें कर्तव्य करण्यास व्यर्थ उशीर करूं नका. आपले आयुष्याचा विमा **धि एशियन कमर्शियल अशूअरन्स** कंपनी लिमिटेड मुंबई, या देशी कंपनीमध्यें करणें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. विमा उतरण्याचे नमुने माहिती आमचे वऱ्हाड आणि मध्यप्रांताचे फिरते एजंट रा. रा वि रा. सोमण यांजकडे अगर आमचेकडे मिळेल.


गांवोगांव हुशार एजंटाची जरूरी आहे.

सेक्रेटरीज

धी एशियन कमर्शियल अशूअरन्स कं. लि. इस्मायल बिल्डिंग्ज. फोर्ट, मुंबई.

नो. नं. ८

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्त्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २९

" डबल रीड ३० ३९-४०-९०

तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९९.

पाय पेटी सप्तक ३। ६० ते ८० रु

" " " ३॥ ८९ ते ९९ रु.

" " " ३॥। १०४-११९ रु)

" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

**पत्ता—रामचंद्र वीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० ( बुलडाणा**

नो. नं. २८४


### नोटीस

नोटीस बेशमी झींग्या वा नरस्या चांभार राहणार सिंदखेड ता० व जि० आकोला

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा साक्षांत मुलगा असून आज सुमारे २९-३० वर्षांपासून मझ्यापासून वेगळा आहेस, व तूं लोकांच्या सांगण्यावरून तूं आपली इस्टेट कायम ठेऊन माझी इस्टेट विक्री करूं पाहत आहे. करितां या नोटिशीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून माझी इस्टेट कोणास गहाण; खरेदी अगर बक्षीस कोणास देऊं नये अगर कोणी माझे सहीशिवाय त्यांचे जवळून घेऊ नये घेतल्यास माझी स्थावर जंगम इस्टेट व मी जबाबदार राहाणार नाहीं. त्यांनीं त्याचे इस्टेटीवर वाटेल ते करावें त्याबद्दल माझे कांहींच म्हणणें नाहीं. त्याच्या इस्टेटीचा तो मालक आहे.

सही

नरस्या वा भगवान चांभार रा० सिंदखेड नि० खुद आंगठा

नो० नं० ४०८

### नोटिस

मेहेरबान कालखां वा जमालखां राहणार मळसूर ता० बाळापूर पोष्ट चानी

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी पूर्वी पोष्ट मार्फत ३ नोटिशी दिल्या, त्या तुह्मी वापस दिल्या, व तारीख ३-९-१७ इ० रोजीं वऱ्हाडसमाचार चे अंका मधून नोटिस दिली होती व त्यांत लिहिलें होते कीं आठ दिवसाचे आंत मजला घेऊन जावें. तरी अद्याप पावेतों त्याप्रमाणें तुह्मी कांहींच केले नाहीं. व मजला तुह्मी आज २ दोन वर्षे झाले सोडून दिले व तुह्मी दुसरी बायको करून तिच्यापाशीं संसार सुख भोगीत आहांत व माझी कांहीं फिकीरच तुह्मी ठेवीत नाहीं. मी दोन वर्षांपासून कर्ज काढून पोट भरीत आहे. मी सध्या सज्ञान असून माझा सर्व जन्म व्यर्थ जात आहे, अशा स्थितींत मी कोठपर्यंत राहावें सर्व जग मी जवान असलेवरून मजला नांवें ठेवीत आहे. तुमचा माझा यापूर्वीं कोणतेच प्रकारचा तंटा वगैरे झाला नसून फक्त माझे भाऊ व वहीणी त्यांना कोणतेच प्रकारचा आश्रय नसल्यावरून तुमचेपाशीं आणले होते, व त्यांचें वरूनच तुह्मी मजला सोडून दिले तरी आतां ही नोटीस पावल्या दिवसापासून ८ आठ दिवसाचे आंत मजला घेऊन जावें. अगर तुह्मी मुदतीचे आंत मजला घेऊन न गेल्यास मी आठ दिवसानंतर ही नोटीस तुमची फारकतीच ओह असे ठरवून पंचानुमतें दुसरा निका करून घरठाव करीन. मात्र कर्जाचा बोजा तुमचेवर राहील मग माझेवर तुमचा कोणतेच प्रकारे नवरेपणाचा हक्क राहणार नाहीं हे पक्के समजावें कळावें ता० २९।९।१७ इ.

सही

चांदबी मर्द लालखा रा० बाळापूर लेंडीपुरा कसारखेडा ता० बाळापूर नि. डावा आंगठा

नो. नं. ४०९


अंगुरी

# हिंग.

पवित्र आणि अस्सल १४८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ४८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगुरी हींग २१, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ४९ पौंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ९


### नोटीस.

रा० बळीराम वा किसन पाटील राहणार नेरधामणें ता० आकोट जि० आकोला

यांसः—

खालीं करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं माझे नेरधामणें येथें किराण्याचें दुकान असून तुमचा आमचा देण्याघेण्याचा आज ४० वर्षांपासूनचा व्यवहार आहे पण कांहीं तरी क्षुल्लक कारणानें विरोध येऊन दिवाळीपासुन आपण दुकानचें येणें जाणें सोडून दिलें आहेत, परंतु चार महिन्यापूर्वी दुकानांत येऊन आपण हिशेब करून पुन्हा उधारी सामान मागितलें तेव्हां आह्मी उधारी देत नाहीं असें सांगितलें. हिशेब करतां ८० रुपये मागिल सौद्यां बाबत १० रुपये व्याजाचे व २९ रुपये ९ मण कापूस आणून देतो ह्मणून नेलेले असे ११९ रुपये तुमचे कडे निघाले, ते रुपये आपण मुलाची शपथ घेऊन आणून देण्याचे कबूल करून गेलांत तें अजून रुपये आणून दिलें नाहीं. सबब या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावले पासून आठ दिवसाचें वरील ११९ रुपये व त्याचे चार महिन्याचे व्याज आणून देऊन आपला बरेच दिवसाचा घरोबा कायम ठेवावा, असें न केल्यास नाईलाजास्तव योग्य सल्ला घेतला जाईल व मग या नोटिशीच्या खर्चा सह रकम भरून घेतली जाईल उगीच नुकसान होऊं नये ह्मणून ही नोटीस दिली असें कळावें ता० २९-९-१९१७ इ.

सही

मथुरादास रामगोपाल करितां बदरीलाल रामगोपाल द० खु० रा० नेरधामणें पो० पंचगव्हाण

नो० नं० ४१०

### जाहिर नोटीस

सर्वत्र सेट सावकार व इतर गांवकरी लोक

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहीर नोटिसीनें कळवितो कीं; माझा मुलगा नामें झींग्या वा नरस्या चांभार हा असून तो वाईट लोकांचे नादी लागून माझे इस्टेटीची अफरातफर करूं पाहत आहे. करितां कोणी त्याला माझे इस्टेटीवर कर्ज देऊं नये. अगर कोणी त्याच्यापासून गहाण; खरेदी, बक्षीस, घेऊ नये. घेतल्यास माझी स्थावर जंगम इस्टेट व मी जबाबदार राहणार नाहीं. कळावें. ता. २०-९-१७

सही

नरस्या वा भगवान चांभार राहणार सिंदखेड नि. खु. आंगठा

नो० नं० ४११

वऱ्हाडसमाचार

भाद्रपद वद्य १ पिंगल संवत्सर १८३९

## सहकारिता आणि सरकारी अधिकारी.

अधिकाराचा लोभ हा मानवी स्वभावांतला एक दुर्गुण आहे, आणि तो काढून टाकण्याचा प्रयत्न जितका करतां येणें शक्य आहे तितका करून काढून टाकण्यांत येईल तितका समाज लवकर सुधरेल. हा दुर्गुण हिंदुस्थानच्या अधिकाऱ्यांच्या अंगीं गेल्या शंभर वर्षांत जडलेल्या संवयीमुळें इतका बळवत्तर आहे कीं तो कमी करण्याची बुद्धि त्यांना होत नाहीं इतकेंच नाहीं तर दुसऱ्या कोणीं तसें त्यांना सुचविलें तर ते चिडतात याचा अनुभव निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळ्या रूपानें ज्यास्त ज्यास्त प्रमाणांत येऊं लागला आहे. पब्लिक सर्व्हिसेस कमिशनपुढें ज्या कित्येक युरोपीयन साक्षीदारांच्या साक्षी झाल्या त्यांत हें दिसून आलें. हिंदुस्थानच्या लोकांनीं स्वराज्य किंवा होमरूल मिळण्यासाठीं जोरानें चळवळ सुरू करतांच कित्येक प्रांताधिपतींनीं लागलीच बेफाम भाषणें करून एका इंग्रजी पत्रकारानें म्हटल्याप्रमाणें 'इंग्रजाच्या अंगच्या, व्याघ्र गुणांचें प्रदर्शन' केलें. गेल्या आठवड्यांत सिमल्याच्या वरिष्ठ कायदे कौंसिलाच्या बैठकींत पंजाबच्या ले. ग. साहेबांनीं बेफाम भाषण करून या विधानाला पुरावा मिळवून दिला. मद्रासकडची व एकंदर हिंदुस्थानांतली युरोपियनांनीं चालविलेलीं पत्रें मि. मांटेग्यु व लॉर्ड चेम्सफर्ड यांच्यावर मिसेस बिझांट व त्यांचे सहकारी मित्र यांची मुक्तता केल्याबद्दल जे इतके चिडले आहेत त्याच्या बुडाशीं तरी इंग्रजांची अधिकार लोलुपता हीच गोष्ट आहे. एखाद्याच्या स्वातंत्र्याचा निष्कारण अपहार करणें हें न्यायतत्त्वाचें विरुद्ध आहे हें त्यांना कळत नाहीं असें नाहीं, पण या मंडळीला बिनशर्त सोडल्यानें स्वराज्याच्या चळवळीला जोर येऊन युरोपियन अधिकाऱ्यांच्या हातांतली सत्ता कमी होईल ही त्यांना भीती वाटत आहे. हातांतली सत्ता जाऊं देण्यास अधिकारी तयार किंवा खुष नाहींत इतकेंच नाहीं, तर कित्येक अधिकारी तर जेथें त्यांचा संबंध नाहीं अशा ठिकाणीं ही आपलें नाक खुपसण्यास सापडावें ह्मणून प्रयत्न करीत असतात. सहकारी चळवळ ही वस्तुतः लोकांची अगदीं स्वतंत्र संस्था आहे, आणि तशी ती राहिली तरच तिच्यापासून अपेक्षित लाभ घडतील; पण तेथें सुद्धां कित्येक अधिकाऱ्यांना आपलें वर्चस्व असावें असें वाटत आहे. ता. १८ रोजीं पुण्यास मुंबईचे ना. गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांचे अध्यक्षत्वाखालीं भरलेल्या प्रांतिक सहकारी परिषदेंत साताराचे कलेक्टर मि. ब्रँडन यांनीं एक निबंध वाचिला, आणि त्यांत असें सुचविलें कीं सहकारी पतपेढ्यांच्या सर्व जनरल सभांचे वेळीं जिल्हाधिकाऱ्यांना हजर राहण्याची मोकळीक असावी. या ठरावावर पुण्याचे होमरूलर डा. लेहोकर यांनीं खरमरीत टीका करून साहेबांच्या या फाजील मागणीचा तत्काळ जोरानें निषेध केला व रा. ब. नाईक यांनीं त्या निषेधाला पुष्टी दिली. सहकारी संस्थांना मार्गदर्शकत्वाची जरूरी आहे ही गोष्ट आह्मांला ही कबूल आहे, आणि या कामासाठीं सरकारनें प्रांतोप्रांतीं को—ऑपरेटिव्ह रजिस्ट्रार या अधिकाऱ्याची नेमणूक ही केली आहे. त्यांनीं स्वतः या सहकारी संस्थांपासून अलग राहून त्या संस्थेच्या कारभारावर नजर ठेवणें व जेथें अडचण उत्पन्न होईल तेथें त्यांचे मार्गदर्शक होणें येगय आहे. पण जिल्हाधिकाऱ्यांनीं तेथें बीचमें मेरा चांदभाई करण्याचें काय प्रयोजन आहे तें आह्मांस कळत नाहीं. लोकल बोर्डें, जिल्हा बोर्डें व म्युनिसिपालिट्या वगैरेतून सरकारी अधिकारी वर्चस्व ठेवीत असल्यामुळें स्वाभिमानी स्थानिक पुढारी या संस्थाच्या कारभारांत फारसें मन घालूं इच्छित नाहींत असा पुष्कळ ठिकाणीं अनुभव आलेला आहे व ह्मणून हें त्यांचें वर्चस्व काढून टाकण्यासाठीं बिनसरकारी अध्यक्ष नेमण्याचा हक्क वरील संस्था मागत असतां जेथें सरकारी अधिकाऱ्यांचा संबंध नाहीं अशा सहकारी संस्थेंत ही त्यांनीं आपला हात घुसडावयास पाहणें ह्मणजे अधिकाराच्या लोभाची परमावधि झाली आहे ह्मणावयाची! मि. ब्रँडन यांच्या या मागणीचा हजर असलेल्या बिनसरकारी मेंबरांनीं तर निषेध केलाच पण अध्यक्षाचे जागीं विराजमान असलेल्या ना. गव्हर्नर साहेबांना ही लोकांच्या व्यवस्थेंत लांडा कारभार करूं पाहणाऱ्या मि. ब्रँडन साहेबांची वरील सूचना आवडली नाहीं आणि त्यांनीं या गोष्टीचा सरकार विचार करील असें गुळमुळीत भाषण न करतां सरकारला ही सूचना मान्य करतां येत नाहीं असें स्पष्टपणें जागच्या जागीं सांगितल्यावर मि. ब्रँडन यांनीं मुकाट्यानें आपला ठराव परत घेतला. लॉर्ड विलिंग्डन साहेबासारखे उदार मनाचे व लोकांविषयीं सहानुभूतिप्रेरित अधिकारी मि. ब्रँडन सारख्या दुर्लोभी अधिकाऱ्यांना दडपण्यास आहेत ह्मणून बरें आहे, नाहीं तर आज सहकारी संस्थांत हात घुसडण्यास हे पाहत आहेत उद्यां तुमच्या घरगुती भानगडींत ही ते तसाच हात घुसडूं पाहणार नाहींत याचा कोणी नेम सांगावा? मि. ब्रँडन सारखे अधिकारलोलुप जिल्हाधिकारी इतर प्रांतांतून ही नसतील असें नाहीं. त्यांच्या मनाच्या या स्थितीवरून हिंदुस्थानांतल्या एकंदर अधिकाऱ्यासंबंधाचें सामान्य विधान करणें बरोबर नाहीं. पण यावरून एक गोष्ट चांगली निदर्शनास येते आणि ती ही कीं हळूं हळूं लोकांच्या हातांत अधिकार सोपविण्याचें राजनीतीचें धोरण मि. मांटेग्युसारख्या उदार ब्रिटिश मुत्सद्यांनीं जाहिर केलें, तरीसुद्धां अधिकार गाजविण्यास चटावलेले कित्येक अधिकारी प्रांताधिपतींनीं आपल्या कह्यांत पूर्णपणें न ठेवल्यास सरकारच्या त्या उदार धोरणाचा प्रत्यक्ष अंमल करतांना संकुचित मनाचे अधिकारी ब्रिटिश सरकारचा उदार उद्देश निष्फळ करण्यास सोडणार नाहींत. इतकेंच नाहीं तर उलट हर एक बाबतींत लांडा कारभार करण्याची त्यांची प्रवृत्ति वेळींच खोडून न काढल्यास ब्रिटिश अंमल लोकांना अप्रिय करून सोडण्याचें श्रेय सुद्धां हे अधिकारी घेतील. यासाठीं सरकाराला आह्मी अशी सूचना करतों कीं 'सावध रहा; तुह्मांला खरें भय मिसेस बिझांट प्रभृति चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांपासून नाहीं, पण तुमच्याच हाताखालच्या अशा अधिकारलोलुप अधिकाऱ्यांपासूनच आहे. त्यांचच विषयीं तुह्मांला अधिक सावध रहाणें जरूर आहे.'

---

## कौंट टॉलस्टॉय व गीता रहस्य.

हल्लींच्या सत्याग्रहाच्या प्रश्नावर देशांतल्या पुढाऱ्यांत जो तीव्र भेद आहे त्याच्या मूलभूत तत्त्वांसंबंधानें लोकांचा बराच गैरसमज झालेला दिसत आहे. मि. गांधी हे आफ्रिकेंत सत्याग्रहाच्या चळवळीचे शंकराचार्य आहेत. तथापि दक्षिण आफ्रिका व हिंदुस्थान यांच्या परिस्थितींतलें अंतर लक्षांत न घेतां तेथें जी मात्रा यशस्वी ठरली तीच येथें देऊन पाहावी असें ह्मणणारांच्या ते अगदीं विरुद्ध आहेत. हिंदुस्थानासारख्या अफाट व विस्तीर्ण देशांत ती गोष्ट शक्य नाहीं हें जाणूनच ते असें ह्मणत आहेत कीं सत्याग्रहाचें तत्त्व मान्य करावयाचें व अंमलांत आणावयाचें कीं नाहीं याचा विचार कांग्रेस सारख्या संस्थेनें न करतां प्रत्येक माणसानें व्यक्तिशः आपापल्या मनोदेवतेला साक्ष ठेवून करावा. सत्याग्रह धरावयाचा तो सत्य प्रतिष्ठित करण्यासाठीं; खुनशीपणानें दुसऱ्याचें नुकसान करण्यासाठीं नव्हे हें तत्त्व उराशीं बाळगून व या तत्त्वाच्या परिपालनापासून जर कोणास दंड भोगावा लागेल तर तो आपणा एकट्यास भोगावा लागेल हें पूर्णपणें ध्यानांत ठेवून काय करणें तें करावें. सुप्रसिद्ध राशियन तत्त्वज्ञ कौंट टॉलस्टॉय यांची शिकवण ही अशीच आहे. मि. गांधी हे त्या महात्म्याचे पट्ट शिष्य आहेत. मि गांधी यांनीं अशा रीतीनें सत्याग्रहाला वैयक्तिक धर्माचें स्वरूप दिलेलें आहे. मि. गांधी यांच्या मताप्रमाणें सत्याग्रहाचा प्रश्न हा धर्मप्रधान राजकारणाचा प्रश्न आहे. गीतारहस्यकार लोकमान्य टिळक हे सत्याग्रहांत राजकारणाला अधिक मार्क देतात व धर्माचें त्याचें बंधन तोडूं पाहत आहेत. राजकारण मुख्य व धर्म हें त्याच्या सिद्धीचें साधन या दृष्टीनें सत्याग्रहाच्या चळवळीकडे ते पाहत आहेत अर्थात् त्या प्रश्नाला वैयक्तिक स्वरूप असलें तरी तें गौण असून संघद्वारें चळवळ करावी अशी रा. टिळकांची गीतारहस्याच्या पायावर रचिलेली शिकवण आहे.

---

## स्वतंत्र आणि संयुक्त

प्रांतिक सरकार पुष्कळ बाबतींत हिंदुस्थान सरकारच्या पूर्ण आधिन आहेत व स्वातंत्र्य दिल्याखेरीज त्यांना स्वतःच्या हिंमतीवर राज्यकारभारांत सुधारणा करतां येणार नाहीं असें पुष्कळांचें ह्मणणें आहे. लॉर्ड इसलिंग्टन यांना ही गोष्ट मान्य आहे. आणि मि. मांटेग्यु यांनीं त्या गोष्टीला आपली पसंती दर्शवून पुढें मागें हिंदुस्थानचा राज्यकारभार ह्मणजे स्वतंत्र पण संयुक्त अशा प्रांतांचा ब्रिटिश वसाहतींचा राज्यकारभार असें चित्र आपल्या एका भाषणांत नुकतेंच वठविलें होतें. पण ही स्वतंत्र व संयुक्त राज्यपद्धति तरी कितीशी समाधानकारक होईल याविषयीं हिंदुस्थानच्या लोकनायकांना एक मोठें गूढच येऊन पडलेलें दिसतें. बंगाल, मध्यप्रांत, मद्रास इलाखा, पंजाब इ. प्रांत प्रत्येकीं स्वतंत्र, फक्त एका मध्यवर्ति सरकारशीं एका सामान्य बंधनानें बद्ध ठेविल्यास हिंदुस्थानांतल्या या निरनिराळ्या प्रांतांतली एकी व परस्परांविषयीं नुकतें उत्पन्न झालेलें प्रेमबंधन कितपत कायम राहील? कानडा, आस्ट्रेलिया, न्यू झीलंड वगैरे ब्रिटिश वसाहती जशा प्रत्येकीं स्वतंत्र, पण एका क्याबिनेट मिनिस्टरच्या हाताखालीं राहिल्यानें त्यांच्यामध्यें तुटकपणा आलेला आहे तसा निरनिराळ्या प्रांतांत येणें अशा स्थितींत अपरिहार्य नाहीं काय? व आल्यास तो इष्ट आहे कीं हल्लींची एकतंत्री पद्धति इष्ट आहे? वगैरे प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. आह्मांला वाटतें कीं हिंदुस्थानांत बंगाली, महाराष्ट्रीय, गुजराथी, पंजाबी वगैरे देशबंधूंत जी एकी उत्पन्न झाली आहे किंवा होऊं घातली आहे ती हिंदुस्थानाला सर्वथा श्रेयस्कर असल्यामुळें स्वातंत्र्याच्या लोभाला वश होऊन ती हातची दवडणें केव्हां ही हितपरिणामी होणार नाहीं. वरील योजनेंतलें स्वातंत्र्य हें प्रांतिक सरकारचें स्वातंत्र्य होय. लोकांचें नाहीं, हा मुद्दा ध्यानांत घेतला असतां प्रांतिक सरकारच्या स्वातंत्र्या प्रीत्यर्थ लोकांनीं परस्परांमधल्या प्रेमबंधनाचा अव्हेर करावा असें कोणी ही ह्मणणार नाहीं. कांहीं कांहीं बाबतींत प्रांतिक सरकारावर हिंदुस्थान सरकारचा स्क्रू जो फार घट्ट बसविला जात आहे तो ढिला झाला पाहिजे यांत शंका नाहीं, पण मि. मांटेग्यु यांच्या ह्मणण्याप्रमाणें वसाहतींच्या संघासारखा हिंदुस्थानच्या प्रांतांचा स्वतंत्र पण संयुक्त संघ व्हावा हें आमच्या मतें इष्ट नाहीं.

---

## उषःकाल.

हिंदुस्थानच्या भाग्योदयाचा सूर्य क्षितिजावर येत आहे असें सुचविणारा उषःकाल अमावास्येच्या दीर्घ काळानंतर नुकताच सुरू झाला आहे हें पहून पायोनियर, स्टेट्स्मन्, सिव्हिल अँड मिलिटरी ग्याझिट व सर्वांत ज्यास्त बेफाम झालेले मद्रास मेल या सारख्या घुबडांचें अनुकरण करणाऱ्या पत्रांच्या अंगाचा तिळपापड झालेला आहे व तीं पत्रें मि. मांटेग्यु सारख्या मुत्सद्यांना धमक्या व हिंदुस्थानांतल्या युरोपियन समाजाला चिथावणी देऊन हिंदुस्थानच्या भाग्योदयाचा सूर्य उगवूंच नये, किंवा निदान त्याचा उदयकाल लांबणीवर तरी पडावा ह्मणून निष्कारण जिवाची यातायात करीत आहेत, हें पहून त्यांच्या विषयीं संतापापेक्षां कींवच अधिक करावीशी वाटते. बहुतेक सगळीं आंग्लो—इंडियन पत्रें या मूर्खपणाला बळी पडलीं आहेत. फक्त मुंबईच्या टाइम्सनें

आपलें शांतपणाचें व विचारीपणाचें धोरण न सोडतां मौन्य स्वीकारलें आहे आणि याबद्दल त्याचें अभिनंदन करणें जरूर आहे. विलायतेंतल्या डेलीमेल पत्राचे बातमीदार मि. नेव्हिनसन हे दहा वर्षापूर्वी हिंदुस्थानांत आले होते व त्यावेळीं बंगालच्या अस्वस्थतेबद्दल आंग्लोइंडियन पत्रांतले विषारी फूत्कार पाहून त्यांनीं सदर पत्रांना सध्या युगांतर प्रभृति राजद्रोही व भयंकर पत्रांच्या मालिकेंत बसविलें होतें. आज मि. नेव्हिनसन येथें असतें तर त्यांनीं या पत्राला कोणती संज्ञा दिली असती कोण जाणें! हिंदुस्थानांतलें लोकमत खवळण्याला तशीं कारणें तरी आहेत. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत पदोपदीं दिसून येणारा वर्णभेद, मिसेस बिझांट सारख्या पुढाऱ्यांना करण्यांत येणारी बंदी, प्रेस आक्टासारखें कडक कायदे व त्याहून ही कडक व मर्यादेच्या बाहेर त्याची अंमल बजावणी, सर मायकेल ओडवायर साहेबासारख्या श्रेष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांचीं बेताल भाषणें, पोलीसची जुलुमाचीं कृत्यें इ. गोष्टीमुळें आपण अन्यायानें वागविले जात आहों अशी सकारण ह्मणा निष्कारण ह्मणा, हिंदुस्थानच्या लोकांची झालेली समजूत हिंदुस्थानांतल्या सध्याच्या अशांततेच्या मुळाशीं आहेत. पण आंग्लो–इंडियन पत्रांना इतकें चिडण्याला एक तरी सयुक्तिक कारण दाखवितां येतें काय ? हिंदुस्थानांत शिक्षण प्रसारामुळें लोकमत प्रबळ होत चाललें आहे व ते आपले नैसर्गिक व न्यायाचे हक्क कायदेशीर रीतीनें मागूं लागले आहेत, आपल्या न्यायाच्या मागण्या जोरानें मांडणाऱ्या पुढाऱ्यांवर येणाऱ्या संकटाचे वेळीं स्वाभिमानाचें बाणेदार वर्तन ठेवीत आहेत, कायदेशीर पद्धतीनें चळवळी करून त्या संकटाचें निरसन करीत आहेत, व मि. मांटेग्यु सारख्या उदार अधिकाऱ्यांकडून करवीत आहेत. सारांश, आपल्या उन्नतीचा उषःकाल लवकर प्राप्त व्हावा ह्मणून झटत आहेत हें पाहून आतां यापुढें याना आपल्या कह्यांत ठेवणें शक्य नाहीं, व आतांपर्यंत चालली तशी आपली चंगळ पुढे चालणार नाहीं, या निराशेपलीकडे या लोकांना येवढें चिडण्यास दुसरें कोणतें कारण आहे? हिंदुस्थानच्या लोकाना स्वतःचें हित कधीं कळूं नये, त्यांनीं जन्मभर दुसऱ्याच्याच ओंजळीनें पाणी प्यावें, त्यांना कोणी मदत करूं नये, केल्यास तो राजद्रोही ठराव निदान त्याला कायमचें कोठें तरी अडकून ठेवण्यांत यावें अशीच या पत्रकर्त्यांची इच्छाना? आणि ती त्यांची दुष्ट इच्छा पूर्ण न करतां हिंदुस्थानच्या लोकांना न्यायानें वागविण्याची प्रवृत्ति मि. मांटेग्यु यांनीं दाखविली याबद्दलचा त्यांचेवर या पत्रकर्त्यांचा येवढा घुस्सा ना ? अशा घुस्शाला भीक घालण्याइतकें मि. मांटेग्यु लेचेपेचे नाहींत हें त्यांना कळूं नये काय ? इल्बर्ट बिलाचे वेळीं या मंडळीच्या प्रयत्नाला यश आलें याचें कारण त्यावेळीं त्याला विरोध करणारें हिंदुस्थानचें लोकमत तयार झाले नव्हतें. पण ती ३०।३२ वर्षांच्या मागची गोष्ट आहे. या अवधींत हिंदुस्थानचें लोकमत किती प्रबळ झालें आहे व ते आंग्लो इंडियन मताशीं टक्कर देण्यास किती समर्थ आहे याची कल्पना या पत्रकर्त्यांना असती तर त्यांनीं असें पोरखेळ खास मांडले नसते.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत पश्चिमरणक्षेत्राच्या इप्रेस विभागांत इंग्रजांची चढाई चालली होती. या चढाईत इंग्रजांना चांगलें यश मिळालें. देशाच्या विस्ताराकडे पाहिलें तर झालेल्या लाभाचें महत्व वाटणार नाहीं. पण लढाईत विस्तारापेक्षां त्याच्या परिस्थितीला महत्व असतें. संपादन केलेला प्रदेश उंचवट्याचा असून त्याच्या एकेक तुकडा सर डगलस हेग यांनीं मोठ्या परिश्रमानें व युक्तीनें मिळविलेला आहे. या प्रदेशाचें लष्करी दृष्टीनें महत्व किती आहे हें कळण्यास एकच गोष्ट सांगितलेली पुरी आहे आणि ती ही कीं येथून इंग्रजांना शत्रूवर असा नेम धरतां येईल कीं शत्रूला बेलज्यमच्या उत्तर व पश्चिम भागांतून यःपलायच करावें लागेल. हा लहानसा प्रदेश हस्तगत करण्यास सर ड. हेग यांस इतका वेळ लागला कीं त्यांचा धिमेपणा पाहून शत्रुपक्षाकडचे लोक हंसावयाला लागले होते. पण त्यांचें तें हास्य पुढें लवकरच येणाऱ्या रुदनाची प्रस्तावना होईल अशी आतां आशा-नव्हे खात्री-वाटत आहे. शत्रूला मोठी उमेद होती कीं बचावाचें साधन ह्मणून पिल बॉक्स ( गोळ्याची डबी ) नांवाची जी नवी व्यूहरचना त्यांनीं शोधून काढली आहे तिच्यावर इंग्रजांना कांहीं तोड सुचणार नाहीं. या व्यूहरचनेची मुख्य खुबी ही आहे कीं कांक्रीटचीं मजबूत ठाणीं शिपायांना राहण्यासाठीं अशीं बांधावयाचीं कीं तोंडाशीं एक घर, मागे दोन चार, त्यांच्यामागें दहाबारा, अशारीतीनें संख्या वाढवीत, पिछाडीची बाजू रुंद करीत जावयाचें व हें कांक्रिट इतकें उत्तम वापरावयाचें कीं तें तोफेच्या गोळ्याला सुद्धां अभेद्य राहील. या ठाण्यांतून यांत्रिक तोफा चालविणारे व दुसरे निवडक योद्धेच फक्त ठेवावयाचे. सारांश, जर्मन लोकांनीं आपल्या योद्ध्यांच्या बचावार्थ बुद्धीची शिकस्त करून ही व्यूहरचना केली होती. पण इंग्रजांनीं याच्याहिवर आपल्या अकलेची मात्रा चालविली, व जशी बचावाची नवी युक्ति शत्रूनीं काढली, तशी चढाईचीही नवी शकल इंग्रजांनीं काढून जर्मनांची युक्ति निष्फळ केली. त्यामुळें शत्रूची प्राणहानि मात्र फार झाली. इंग्रजांकडे याच्या उलट प्रकार घडला. एक इंग्रज पलटण एकतृतीयांश मैल पुढें सरकली, आणि तेवढ्यांत फक्त तीन शिपाई मारले गेले. १६० शिपायांच्या एका कंपनींतले फक्त ५ शिपाई मेले. जर्मनांचे कैदी धरलेल्या लोकांचीच संख्या ३२४३ होती! यावरून मारलेल्यांची संख्या किती असेल याची कल्पना करतां येईल.

---

## वैमानिकांची चळवळ.

या आठवड्यांत जर्मन वैमानिकांपेक्षां ब्रिटिश व फ्रेंच वैमानिकांची चळवळ ज्यास्त दिसून आली. शंभरापासून हजार फुटापर्यंतच्या निरनिराळ्या उंचीच्या ठिकाणावरून त्यांनीं शत्रूच्या पायदळावर गोळ्यांचा, आणि खालच्या रेल्वे स्टेशनांवर आणि दारूगोळ्यांच्या खाजिन्यावर बांबचा वर्षाव केला. जर्मन वैमानिकांचा उत्साह पूर्वीसारखा आतां राहिला नाहीं, तरी ते अगदीं स्वस्थ होते असें मात्र नाहीं. त्यांनीं ही इंग्लंडच्या आग्नेय किनाऱ्यावरून निरनिराळ्या ठिकाणावरून येऊन खुद्द लंडनवर हल्ला केला. पण विशेषसें नुकसान झालें नाहीं. हा लंडनवर कितवा हल्ला?

---

## ' लढाई आटपली.'

' लढाई आटपली ' आणि आह्मीं ती जिंकली ' असें जनरल स्मटस् ह्मणत आहेत, आणि ते उगाच कांहीं आधारावांचून बरळणारे नाहींत. त्यांच्या ह्मणण्याचा शब्दशः अर्थ न घेतां भावार्थ घेतला पाहिजे. तो भावार्थ हा कीं जर्मनीची सध्या जशी मित्रराष्ट्रांनीं गळ चेपी केली आहे तशीच कांहीं दिवस कायम राहिली तर शत्रूचे डोळे तेव्हांच पांढेर होऊन तो अगदीं चीत होईल. फ्लांडर्समध्यें नुकत्या झालेल्या लढायांत इंग्रजांच्या तोफखान्यानें आमच्या लोकांचा धुव्वा उडवून दिला ही गोष्ट जर्मन अधिकाऱ्यांनीं आपल्या फौजेला काढलेल्या सक्युंलरांत स्पष्टपणें कबूल केली आहे असें रूटरचा बातमीदार लिहितो. याहून मोठा पुरावा काय पाहिजे?

---

## आणखी कारस्थान बाहेर आलें.

गुप्त कारस्थानाबद्दलची जर्मनीची प्रसिद्धी आहेच. पण अमेरिकेंत नुकत्या उघडकीस आलेल्या एका मोठ्या कारस्थानानें त्या प्रसिद्धींत आणखी भर टाकली आहे. अमेरिकेंतल्या **जर्मन वकिलाचें** आफिस ह्मणजे कृष्णकारस्थानाचें कसें आगर होतें याचा जो एकेक पुरावा बाहेर येत आहे तो कांहीं अजब आहे. हें कारस्थान करणारांच्या विलक्षण धाडसाची तो साक्ष पटाविणारा आहे. अमेरिकन कांग्रेस सभेच्या प्रमुख पुढाऱ्यांना कांचनानें वश करून वेऊन प्रेसिडेंट विल्सन प्रभृति जे अधिकारी जर्मनीच्या विरुद्ध आहेत त्यांच्या सुचना हाणून पाडण्याचा कट प्रकट करणारा पत्रव्यवहार अमेरिकन सरकारच्या हातीं लागल्याचें बाहेर आलें आहे, आणि हा पत्रव्यवहार अमेरिकन सरकारचा जर्मनींत त्यामुळें निरुपायास्तव सैन्याचा व आरमाराचा येवढा पसारा मांडावा लागला आहे असा नाटकी आविर्भाव या उत्तरांत इतका ओतप्रोत भरला आहे कीं तें उत्तर वाचतांच ' अरे हें नाटक रे नाटक ' असे उद्गार ज्याचे तोंडून निघणार नाहींत त्याला मनुष्य स्वभावाची व व्यवहाराची अगदींच ओळख नाहीं असें ह्मणावें लागेल. केसर विषयींच्या क्रोधाग्नींत तेल ओतून तह घडवून येण्याचा संभवकाल आणखी लांबणीवर पडेल याबद्दल जर्मन पत्रकारांना खेद वाटत आहे. तिकडे रूमानियामध्यें ही निराळाच एक प्रकार चालल्याचें याचवेळीं बाहेर आलें आहे. रूमानियानें जर्मनीशीं युद्ध जाहिर करण्याचे पूर्वींच जर्मन लोकांनीं हंगेरींतून रोगजंतु व स्फोटक द्रव्यें रूमानियांत नेऊन एका बागेत पुरून ठेविलीं होतीं तीं बुखारेस्ट येथील अमेरिकन वकिलातीच्या सेक्रेटरीनें आतां उकरून काढलीं आहेत. यावरून तटस्थ राष्ट्रांनीं सुद्धां जर्मनांच्या दगलबाजीबद्दल किती सावध राहिलें पाहिजे तें उत्तम प्रकारें दिसून येतें.

---

## नाटकी आविर्भाव.

जर्मन कैसरनें पोपमहाराजांच्या शांतता स्थापित करण्याबद्दलच्या सूचनापत्राला जें उत्तर दिलें आहे तें पाहिलें ह्मणजे कैसर हे उपजत नट असावेत असें दिसतें. आपण स्वतः अगदीं अल्लाची गाय असून सारें जग आपणावर दुष्टपणानें उलटलें आहे असल्या नाटकी आविर्भावानें कोणाला फसवूं पाहत आहे कीं स्वतःलाच फसवीत आहे तें सांगणें कठीण आहे. बहुधा युद्धास कंटाळलेल्या जर्मन लोकांच्या समाधानार्थ ही युक्ति असेल. वस्तुतः तह करणारे न करणारे पोपमहाराज ही नव्हेत व जर्मन कैसर ही नव्हेत. ते निराळेच असून फ्लांडर्समध्यें सध्या लढत आहेत, व त्यांच्या बंदुकींतली प्रत्येक गोळी कैसरच्या उत्तराच्या एकेका वाक्याला ' ही शुद्ध लबाडी आहे ' असा रोख ठोक जबाब देत आहे.

---

## तुरुंग खातें
### ( १९१६ ची कैद्यांची दिनचर्या. )

सन १९१६ ची प्रांतिक तुरुंग खात्याची हाल हवाल नुकतीच प्रसिद्ध झाली आहे त्यावरून पहातां सरकारी धोरण असें आहे कीं जबलपूर नागपूर व रायपूर यां मध्यवर्ती तीन मुख्य तुरुंगांची भरभराट करून तेथील उद्योगधंदे मोठ्याशा प्रमाणावर चालवावे ह्मणजे पैशाच्या दृष्टीनें खर्च कमी व तुरुंगाच्या व्यवस्थेच्या मानानें अधिक जोमदार व्यवस्था अंमलांत येईल. या धोरणाला धरूनच एकंदर वऱ्हाड व मध्यप्रांत मिळून जे २१ जिल्हाजेल होते त्यापैकीं बालाघाट, बैतुल, दमो, मंडला, वर्धा येथील जिल्हा जेल मोडून टाकण्यांत आले आहेत. तसेंच चांदा व सिवणी येथील ही मोडण्याचा विचार आहे आणि आलिशान चीफ कमिशनर यांचा अभिप्राय असा पडतो कीं जर हल्लीं प्रमाणें तुरुंगाची लोकसंख्या जिल्ह्यांतून कमीच रहात जाईल तर जिल्हा जेलचा आमला ठेवण्याचें कारण नसून दुसरे कित्येक जेल कमी दर्जाला नेण्यासारखे आहेत.

१९१६ हें साल बरेंच सुखानें गेलें त्यामुळें गुन्हे कमी होऊन तुरुंगांची भरती ही अर्थातच कमी झाली. पण सध्या लष्करी कोर्टानें शिक्षा दिलेले कैदी बरेचसे कैदखान्यांत आल्यामुळें त्यांच्या संख्येमध्यें विशेषसा फरक नाहीं. रिपोर्टाच्या वर्षी ३७१४ कैदी शिक्षा भोगत होते. ३३५ कच्चे कैदी असून त्यांची चौकशी चालू होती.

आणि दिवाणी तुरुंगाच्या बाजूला १६ कैदी होते. असें एकंदर ४०६९ कैद्यांची तरतूद आमच्या प्रांतांत करण्यांत आलेली आहे. या कैद्यांच्यावर जे देखरेख करितात त्यांचा खर्च २०६६०० रुपये असून बाकीचा खर्च हाच निम्यापेक्षां अधिक खर्च आहे. एकंदर कैद्यांचा खर्च ३८७४६० रुपये आहे ह्मणजे सरकारला प्रत्येक कैद्यामागें सरासरी ९५॥ रुपये पडतात. एवढ्या खर्चापैकीं कैद्यांच्या अन्नखर्चानिमित्त ११६६-०७ रुपये लागले. ह्मणजे सरासरी प्रत्येक कैद्यामागें अन्नखर्च वर्षाचा २८४१२८९ आहे. या शिवाय दवाखाना, कपडालत्ता, सफाई आणि इतर खर्चाच्या बाबी मिळून बाकीची रक्कम फुगलेली आहे. सुमारें ४ हजार कैद्यांच्या कडून सक्त मजूरीची व कारखान्याची कामें काढून घेण्यात येतात. त्या करितां सुमारें २॥ लक्ष रुपये भांडवल लागतें आणि हें भांडवल वजा जातां नक्की उत्पन्न ६३६१९ रु. १० आणे झालेलें आहे. खडी फोडणें सारख्या निव्वळ मजूरीच्या कामावर प्रत्येक कैद्यामागें सरासरी १७ रुपये उत्पन्न सालीना येतें. पण जे कैदी मुख्य जेलामध्यें निरनिराळ्या कारखान्यावर ह्मणजे रंगाऱ्याच्या, कोष्ट्याच्या, छापण्याच्या कागद तयार करण्याच्या कामावर असतात त्यांच्या कारागिरीचें उत्पन्न दरमाणशीं निदान ९० रुपये सरकारच्या पदरीं पडतें.

उद्योग धंद्याच्या दृष्टीनें पाहतां जबलपूरचा तुरुंग या वर्षी लष्करी खात्याच्या उपयोगीं विशेष पडला हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. सतरंज्या, चादरी, उशा, टॉवेल, इतर कपडा, गन फॅक्टरीला लागणारे तेल, ब्लँकेटें, इत्यादि मुबलग येथून पुरविण्यांत आलीं आणि लेफ्टनंट रॉजर्स व खानसाहेब खर्सेटजी यांनीं रंगाविण्याचा कारखाना सुद्धां फार चांगला चालविला आहे. जबलपूरच्या तुरुंगांत कुंभाराचा कारखाना नव्यानें काढण्यांत आला आहे आणि त्याला यशही चांगलें मिळेल असा रंग दिसतो. नागपूरच्या तुरुंगांत छापखान्याचा उद्योग विशेष चालतो आणि आतां तेथें कागद तयार करण्याचें काम चालू आहे तेंही चांगला चांगला कागद तयार करण्याच्या दृष्टीनें लौकरच लोकांच्या दृष्टीस येईल असा रंग दिसतो. रायपूरच्या जेलामध्यें जागले पुलीस यांना लागणाऱ्या पोशाखाचा कपडा विणण्यांत येतो व आतां निळीचा रंग देण्याचा उद्योगही सुरू आहे. रायपूरकडे शेतीचा उद्योग कैद्यांमध्यें चालूं करण्याचा सरकारी विचार आहे. वर सांगितलेले हे उद्योग पहातां कैद्यासंबंधानें जें सरकारी धोरण दृष्टीस पडतें तें विशेष प्रशंसनीय आहे. सरकारला जे उद्योग धंदे आपल्या कैदखान्यांत चालू करितां येतात तेच लोकांना निरनिराळ्या उद्योगांचें शिक्षण देऊन बाहेर ही चालूं करण्यासारखे आहेत. हलक्या कामाची मजुरी जर फार वाढली आहे तर लोकांना उद्योगधंद्यांचें शिक्षण मिळेल तर रोजंदारीही चांगली येईल, लोक अधिक सुखी होतील आणि जो सर्व भरणा शेतीच्या कामावर लोटला आहे तो आपोआप कमी होईल. आणि मग खरोखर शेतीची कामें कारागिरीच्या दृष्टीनें चालविणाऱ्या लोकांस शेतकी अधिक किफायतवार होईल.

कैदी ह्मणजे समाजांतून बाहेर फेकून दिलेला मनुष्य असतो आणि तो आपली कैद भोगून सुटला तरी त्यांच्यावर समाजाची नजर फार करडी असते किंबहुना त्याच्याशीं समाजांतील मुख्य मुख्यलोक व्यवहारही खुल्या दिलानें करूं इच्छित नाहींत. पण अतां या कैद्यासंबंधाच्या कल्पना बदलत चालल्या आहेत. कैदखाना ह्मणजे त्याला सुधारण्याची शाळा आहे व यापुढें तेथें त्यांच्या शरिराचे हाल न करतां त्याला चांगलें वळण लागेल असे उपाय उत्तरोत्तर सरकार अधिक योजीत चाललें आहे. आमच्या मतें या नव्या तत्वाच्या धोरणानें कैद्यांची जोपासना करण्यांत यावी तशी अद्याप येत नाहीं. तुरुंग ह्मणजे एक अकाळविकाळ यमदरबारच वाटतो आणि अशा तुरुंगाच्या भीतीनें लोकांनीं गुन्ह्यापासून परङमुख व्हावें असा जुना विचार होता पण यापुढें अनुभवाच्या पारड्यांत तो टिकण्यासारखा नाहीं. कैद्यांना प्राथमिक शिक्षण मिळेल, त्यांना त्यांच्या धर्माच्या गोष्टी ऐकण्याला मिळतील, कांहीं उद्योग धंदा शिकण्याला अवसर मिळेल अशा योजना फार मोठ्या प्रमाणावर व्हावयाला पाहिजेत. अर्थात् जे कैदी या शाळेंतून सुटतील त्यांना बाहेर पडल्य बरोबर दुनियेदारींत प्रामाणिकपणानें वागून प्रपंच करतां येईल अशाविषयीं समाजानें विशेष काळजी घेतली पाहिजे. रायपूरला कैदमुक्त झालेल्या लोकांना मदत करण्यासाठीं नामदार रायसाहेब सेट नथमल यांनीं एक संस्था काढली आहे. ही संस्था अद्याप बाल्यावस्थेंत आहे तथापि कैदेंतून सुटल्य नंतर या लोकांच्या मागें जो अप्रत्यक्ष पहारा असतो तो कमी होत जाईल तर या लोकांना या संस्थेमार्फत पुष्कळसे उद्योग धंदे समाजांत मिळू लागतील. तुरुंगाच्या व्यवस्थेच्या दृष्टीनें पाहतां आकोल्याचे डेपटि कमिशनर ह्मणतात कीं एक महिन्याच्या आंतील लहान लहान मुदतीच्या शिक्षा पुष्कळशा कमी झाल्या पाहिजेत. थोडक्या मुदतींत कैद्यांना तुरुंग हा शाळेसारखा वाटून कांहीं लाभ होणाचा संभव फार कमी असतो. आमच्या मतें प्रथम गुन्हेगाराला जें जामिनावर सोडण्याचें कलम आहे तें अधिक व्यापक करण्यांत येईल आणि लहानसान मुदतीच्या शिक्षांच्या ऐवजीं दंडाच्या शिक्षा देण्याचें धोरण मॅजिस्ट्रेट सुरूं करितील तर थोड्या थोड्या कैदेच्या शिक्षा आपोआप नाहींशा होतील. आह्माला भीती एवढीच वाटते कीं लहानसान कैदेशी शिक्षा देण्याविरुद्ध सरकारी मत आहे ह्मणून मॅजिस्टेटांनीं जबर मुदतीच्या शिक्षा देण्याचा क्रम पाडूं नये.

---

## गौरव.

(राजश्री जोग यांस पानसुपारी.)

रा. रा. रामचंद्र दाजी जोग डिपटि इन्स्पेक्टर शाळाखातें आकोला यांची बढती जबलपुरास असिस्टंट इन्स्पेक्टरच्या हुद्यावर झाली आहे हें कळविण्यास आनंद वाटतो. यांच्या सद्गुणांची थोरवी त्यांच्या हाताखालील शिक्षक मंडळीस विशेष वाटली ह्मणून त्यांनीं गेल्या सोमवारीं त्यांस येथील प्राथमिक शाळेमध्यें पानसुपारी देण्याचा सुयोग घडवून आणला. येथील जिल्हाबोर्डाच्या आश्रयाखालीं जी प्राथमिक शाळांची विद्यापरिषद गुदस्ता भरली होती तिचें श्रेय यांच्याचकडे असून त्यांनीं शिक्षक मंडळीमध्यें शिक्षणक्रम सुधारण्याचा चांगला उपक्रम घालून दिलेला आहे. या पानसुपारीच्या समारंभांत मुर्तिजापूरचे शिक्षक व कवि राजश्री पतकी यांनीं आपल्या गोड कवितामध्यें व निराळ्या लेखी भाषणामध्यें, राजश्री बळीरामपंत मास्तर यांच्याही लेखी भाषणांत व रावबहादुर दामले यांच्या अध्यक्षस्थानच्या भाषणांत व आणखी इतर संभाषणांत राजश्री जोग यांचें खानगी बालबोध वर्तन, गृह व्यवस्थेचें व्यवस्थेशीर वळण व सार्वजनिक शिक्षण कार्यांतील हौस, परिश्रम व प्रेमळ स्वभाव हीं एकाग्रतेनें सर्वांच्या डोळ्यासमोर उभीं राहिलीं, आणि सद्गुणांचा गौरव विद्याखात्यासारख्या निरुपद्रवी आणि पवित्र खात्यांत शिक्षक व परीक्षक यांच्या मत्रील नाजुक परिस्थितींतही अशा पानसुपारीच्या थाटानें झालेला पाहून मनाला मोठा आल्हाद वाटतो. राजश्री जोग हे विक्रमशील व कर्तृत्ववान् आहेत तेव्हां त्यांचा लौकिक जबलपूरच्याही विभागांत बहुगुणीत होईल अशी इच्छा आह्मी त्यांच्या विद्यार्थीच्या गेल्या २० वर्षांच्या अनुभवावरून प्रगट करितों.

---

## कांग्रेसचें रामायण.

(आमच्या एका सन्मान्य मित्राकडून)

श्रीरामचंद्राला यौवराज्याभिषेक करण्याचें ठरलें, हें वर्तमान ऐकतांच अयोध्या नगरींत सर्वत्र आनंदोत्सव होऊं लागले, अभिषेकाची सगळी तयारी झाली, तो सुदिन येऊन पोचतांच सगळ्या नगरींत जिकडे तिकडे गुढ्या तोरणें उभारण्यांत आलीं. रस्त्यांवरून चंदनाचे सडे घालण्यांत आले, तो आनंदोत्सवाचा समारंभ पाहण्यासाठीं देशोदेशचे लोक मोठ्या उत्सुकतेनें आले, त्यावेळीं घटकाभरानें काय दैवदुर्विलास पाहण्याचा प्रसंग सर्वांवर येणार आहे याची कोणाला यत्किंचित् तरी कल्पना करतां आली असती काय? जुन्या पुराण्या काळच्या इतिहासांतल्या घटना अर्वाचीन इतिहासांत ही नव्या रूपानें कशा प्रविष्ट होतात, हें कोणाला पहावयाचें असेल तर रामायणांतला ह्या रामराज्यवियोगाची पुनरावृत्ति हल्लीं कलकत्याच्या स्वागत कमिटीच्या गोंधळांत पहाण्यास मिळेल. सुरतेस बखेडा झाल्यानंतर ही कांग्रेसच्या बैठकी नियमित वेळीं व्हावयाच्या त्या झाल्या, पण राष्ट्राच्या राजकीय पुढाऱ्यांत झालेली दुफळी दोन्ही पक्षांतल्या पुढाऱ्यांच्या मनाला सारखी टोंचीत राहिल्यामुळें त्वयार्धं मयार्धं करून त्यांनीं समेट केला व गेल्या सालच्या लखनौ कांग्रेसच्या वेळीं हिंदु–मुसलमान व जहाल नेमस्त यांच्या एकीची ध्वजा रोविली. त्यावेळीं ही एकी अशीच सदोदित टिकेल काय अना अंदेशा कोणाच्या मनांत आलाच असला तर तो केवळ अतिस्नेहः पापशंकी या ह्मणीची सत्यता पटविण्यापुरताच आला असेल. पण कलकत्याचा अतिकार्य प्रसंग ह्मणजे हा दैवाचा दुर्विलास रामराज्यवियोगाच्या प्रसंगाहून कमी शोचनीय व अतर्क्य आहे असें कोणालाही ह्मणतां येणार नाहीं. रामायणांतल्या कैकेयीला आपल्या मुलासाठीं युवराजपद पाहिजे होतें. येथें कलकत्त्याच्या 'बंडखोर' मंडळीला मिसेस बिझांट बाईची नेमणूक अध्यक्षपदावर व्हावयास पाहिजे होती. रामायणांतल्या कैकेयीला वृद्ध मंथरेनें चिथविलें होतें. येथें तें काम मद्रासच्या होमरूल लीगचे वृद्ध अध्यक्ष सर सुब्रह्मण्यम् आयर यांनीं मिसेस बिझांट बाईचें नांव अध्यक्षपदासाठीं सुचवून केलें. रामायणांतल्या भरताची लीनता व बंधुप्रीति इतकी अमर्याद जाज्वल्य होती कीं आपल्यामुळें रघुकुलावर जो अक्षय कलंक लागला त्यामुळें भरताला अतिशय दुःख वाटलें व स्वतःच्या मातेचाही त्याला मनस्वी संताप आला. मिसेस बिझांटला आपल्यामुळें कांग्रेसमध्यें फूट पडत आहे हें जर कळलें व त्यांची इच्छा त्यांच्या तरुण मंडळीला कळण्याचा जर कांहीं मार्ग असता तर हल्लीं चाललेल्या प्रकारानें बाईच्या मनांत उठणारे दुःखाचे तरंग व तरुणमंडळींनें चालविलेल्या अदूरदर्शित्वामुळें मनाला वाटणारा संताप त्या व्यक्त केल्यावाचून आणि कैकेयीनें मिळवून दिलेल्या राज्याचा तिरस्कारपूर्वक त्याग करण्यांत भरतानें जो अप्रतिम स्वार्थत्याग दाखविला तसाच स्वार्थत्याग कांग्रेसच्या अध्यक्षपदाचा अस्वीकार करण्यानें दाखविल्यावांचून त्या खचित राहणार नाहींत. मिसेस बिझांट बाईना कांग्रेसचे अध्यक्ष नेमण्याच्या विरुद्ध कलकत्याचे वृद्ध पुढारी असले तर त्यांच्या दृष्टीनें तसें त्यांचें प्रमाणिक मत होण्याला योग्य कारणें ही असतील. बाईविषयीं त्यांचा द्वेष किंवा मत्सर नाहीं; बाईची अलौकिक बुद्धिमत्ता, अपूर्व उत्साह, प्रशंसनीय शीलसंपत्ती, हिंदुस्थानच्या हिताविषयींची खरी कळकळ इ. गुणांची त्यांना मारख आहे कीं नाहीं हें लखनौ काँग्रेसच्या वेळीं त्यांनीं बाईचा जो गौरव केला त्यावरून सर्वांस श्रुत झालेंच आहे. सारांश, जी भवितव्यता स्वतः श्रीरामचंद्राला टाळतां आली नाहीं अथवा आपल्यां अवतारकृत्याच्या संपादनार्थ त्यांनीं तिच्यापुढें मान वाकविली ती टाळण्याचें सामर्थ्य कलकत्तेकर तरुण मंडळींत नसल्याचें आश्चर्य नाहीं. येथपर्यंत हें कांग्रेसचें रामायण झालें.

## आतां पुढें काय?

नागपूर, सुरत, पटना, व कलकत्ता येथें निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या रूपानें दिसून आलेला हा वृद्धतरुणांचा संग्राम येथेंच संपला, आतां पुनः ह्मणून त्याचें दर्शन केव्हां ही व्हावयाचें नाहीं अशी हमी कोणाला ही देतां यावयाची नाहीं. प. वा. ना. गोखले यांनीं एकदां आपल्या भाषणांत सांगितल्याप्रमाणें सार्वजनिक जीवन हें आपल्या देशाला अद्याप अपरिचित आहे. त्या जीवनाची अवश्यक तत्वें आमच्या मनावर अद्याप पूर्णपणें बिंबलीं नाहींत. विचार करण्याचें काम पोक्त व अनुभवी पुढाऱ्यांवर सोंपवून आपली सर्व उत्साहशक्ति त्यांनीं घालून दिलेल्या मार्गानें कार्यसिद्धि घडवून आणण्यास आमची तरुण मंडळी अद्याप शिकली नाहीं;

आणि असें जोंपर्यंत चालू राहील तोंपर्यंत वृद्धतरुणांचे असे संग्राम चालावयाचेच व त्यापासून घडणारें दुष्परिणाम भोगण्यास आपण तयारही असावयास पाहिजे, असें ह्मणण्यानें या प्रश्नाचा समाधानकारक निकाल लागत नाहीं

## उपाय चिंतन

हें झालेंच पाहिजे, आणि या संकटांतून कांग्रेससारख्या राष्ट्रीय संस्थेचा निभाव लागण्यासारखी कांहीं युक्ति निघाली पाहिजे आणि ती ही अशी कीं तिच्या योगानें महत्प्रयासानें घडवून आणिलेली एकी नष्ट होणार नाहीं. असा उपाय आमच्या मतें सध्या एक आहे व तो अनिवार्य आहे. आपली पूर्वापार चालत आलेली अविभक्त कुटुंबपद्धति या कामीं आपण आपली मार्गदर्शिका केली पाहिजे. अविभक्त कुटुंबांत निरनिराळ्या वयोवस्थेचीं व भिन्नभिन्न स्वभावाचीं माणसें एकत्र राहत असत. तेव्हां आपण कोणत्या उपायानें कुटुंबांत एकी व शांति राखीत होतों त्याचा विचार करा. विभक्त कुटुंबांत ही वृद्धपिता व तरुण पुत्र यांचीं मतें एखाद्या बाबतींत जुळलीं नाहींत ह्मणजे शहाणपणाची तोडजोड कोणती करतात? वृद्धांनीं अनेक संकटांतून संसाराचा गाडा मोठ्या परिश्रमानें व हिकमतीनें पैलतीराला आणून सोडलेला असतो. ह्मणून साऱ्या जन्मभर त्या गाड्याचा भार आपणच वाहणार असा हेका ते धरून बसत नाहींत. मुलगा कर्तासवरता झाला ह्मणजे ते स्वसंतोषानें प्रपंचभर पुत्रावर घालून आपण प्रपंचाच्या जबाबदारीपासून दूर होतात. पुत्रांनीं एखादेवेळीं सल्ला विचारली तर जें योग्य दिसेल तें सांगतात आणि स्वस्थ बसतात. प्रपंचाची सगळी जबाबदारी तरुणावर राहते व जबाबदारी अंगावर पडलीच ह्मणजे तरुणांचा उच्छृंखलपणा ही हळूं हळूं कमी होऊन सगळें कार्य सुरळीत चालतें. आपल्या गृह स्थितीपासून हा धडा कांग्रेसच्या वृद्धपुढाऱ्यांनीं अवश्य घ्यावा व त्या संस्थेला तरुणपिढीच्या स्वाधीन करून आवण

## हरि हरि ह्मणत बसावें.

हें आमच्या मतें आतां त्यांचें प्राप्त कर्तव्य आहे. प वा. डॉ. दादाभाई गेल्या १०।१२ वर्षांत हेंच करीत होते व मि. सुरेंद्रनाथ बॅनर्जी, रा. ब वैकुंठनाथ सेन प्रभृति वृद्ध पुढाऱ्यांनींहि आतां तोच मार्ग स्वीकारणें योग्य होईल. त्याच्या योगानें सगळा तंटा मिटेल, पुढाऱ्यांचा ही बोज राहील आणि हे वृद्ध आमच्या प्रगतीच्या मार्गांत विघ्न करणारे आहेत असें तरुणांना वाटण्याचें ही कारण राहणार नाहीं.

---

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—हत्तीचा पाऊस आणि विश्वामित्री उन्हाळा यांनीं आकाश व वातावरण हीं अगदीं नवीं करून सोडलीं आहेत. पिकें चांगलीं जोमांत आहेत. आकोल्याला प्लेगाची भीति वाटूं लागली आहे.

नझूल जमिनीचे स्पेशल ऑफिसर रा. रा. तात्यासाहेब सहस्त्रबुद्धे ; यांनीं या जिल्ह्यांचें काम संपविलें असून ते यापुढें एलिचपूर जिल्ह्यांत काम करितील. या कटकटीच्या कामांत या अधिकाऱ्यानीं फार परिश्रमानें लोकांस सौख्य देऊन सरकारी काम यशस्वी केलें आहे हें त्यांस भूषणावह होय.

येथील श्री गणपतीच्या उत्सवांत गेल्या गुरुवार अखेर जाहीर व्याख्यानें झालीं आणि या लोकशिक्षणाच्या कामीं श्री राजेश्वर संस्थानच्या ट्रस्टींनीं चांगलें परिश्रम घेतले याबद्दल ते स्तुतीला पात्र आहेत. दोन तीन संभाषणें सदभिरुचीस पटलीं नाहींत ह्मणून पुढें दोन दिवस व्याख्यानास सुट्टी दिली हाही त्यांचा शहाणपणा होय.

येत्या ६ व्या तारखेला ऑल इंडिया कॉंग्रेसची कामिटी अलहाबादेस भरेल तेव्हां आमच्या राष्ट्राचा खरा मुत्सद्दीपणा जगाचा निदर्शनास येणार आहे. वादाच्या सर्व बाजू अत्यंत नाजूक आहेत, तथापि ,राष्ट्रदेवी सुयशाचे मंगल मार्ग खुले करो ' ह्मणून सर्व पक्षांच्या अंतःकरणाची एकच प्रार्थना आहे.

**वाढदिवस**—आज श्रीमती बिझांट यांस ७१ वें वर्ष लागतें. ह्मणून येथील थिआसाफिकल लॉजमध्यें रात्रौ ८ वाजतां जाहीर सभा भरून सर्व राष्ट्राचा हा ब्राह्मी **सुवर्णदिन** ह्मणून पाळण्यांत येणार आहे.

दुधदुभत्याचा सहकारी कारखाना—असा कारखाना आकोल्यास अवश्य पाहिजे आहे. दुध चांगलें निर्भेळ मिळणें ह्मणजे संसारांतलें एक मोठेंच सौख्य होय. इंदुरास दूध विकणाऱ्यांस सुपरिनटेंडेंटचे परवाने घ्यावे लागतात आणि अशा परवान्यावांचून दूध विकण्याची मनाई आहे. असाच निर्बंध मुनसिपाल्टिटीनें सुरु करण्याचा काळ यापूर्वींच येऊन चुकला आहे आणि त्या संबंधीं येथील सार्वजनिक मंडळी जर सहकारि पद्धतीनें पुढें येतील तर दुधदुभत्याची उत्तम सोय होईल इतकेंच नाहीं तर भेसळ व धर्मबाह्य तूपाला स्पर्श करण्याचा प्रसंगही येणार नहीं

**कपाशी**—यंदा मध्यप्रांतांत १४४०८७४ एकर व वऱ्हाडांत ३०९४००० एकर जमीन कपाशीच्या पेऱ्याखालीं आहे.

**सरबराई**—जे सद्गृहस्थ सार्वजनिक कार्यानिमित्त आकोल्यास येतात त्यांची सरबराई ज्याच्या त्याच्या इतमामाप्रमाणें राहावी ह्मणून येथील जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या मार्फतीनें एक कायमची योजना करण्यांत यावी असा विचार चालला आहे सार्वजानिक कार्यकर्त्यामंडळींसाठीं एक सर्किट हाऊस काढण्याची ही योजना सर्वांस मान्य होण्याइतकें लोकमत सध्या जागृत आहे हा आनंदाची गोष्ट होय.

**उपक्रम**— इस्टेटवाला गृहस्थ कर्जबाजारी होतो आणि तो कधीं कधीं सावकाराच्या पेचांत व कर्जाच्या विवंचनेंत इतका बुडतो कीं त्याचें त्याला कल्याण समजत नाहीं. अशा प्रकारचे जे कोणी सहकारी पेढीचे गृहस्थ असतील त्यांना मदत करून कर्जमुक्त करण्याचा विचार येथील सेंट्रल बॅंकेनें आपल्या मनांत आणण्याला आज ३ वर्षांचा काल होत आला. रावबहादूर दामले यांनीं १६ वर्षांत जिनगीच्या गहाणावर सर्व कर्जाची फेड करण्याची एक योजना केली आहे. प्रारंभाला १ लक्षाचें भांडवल उभारून १०० रुपयांचा एकेक डिबेंचर बॉंड या प्रमाणें दहा हजार डिबेंचर बॉंड आकोला सेंट्रल बॅंकेनें काढले आहेत. ही पद्धत जशी यशस्वी होईल तसे तिला पुढें विस्तृत स्वरूप देण्यात येणार आहे. हा उपक्रम फार नामी होय.

**महापुण्यः**— राजश्री महमदअली आणि शौकतअली यांस अटकेंतून काढल्या संबंधानें येथें अभिनंदनपर जाहीरसभा भरून अधिकाऱ्याकडे कृतज्ञतेचे संदेशही पाठविण्यांत आले. खरी मुक्तता अद्याप झाली नाहीं; पण लोकांच्या मनोदेवतेला व त्यांच्या वाणीला खरेपणा आणण्याचें महापुण्य सरकारानें जलदी समीप करावें, मुसलमान बंधूंनाच नव्हे तर सर्व राष्ट्राला ही गोष्ट रुचलेली आहे. ईश्वर करो आणि आमच्या जाहीर सभेचा मंगल ध्वनी अर्थपूर्ण होवो!

**शुभवार्ताः**—- सर बेंजामिन रॉबर्टसन यांनीं श्रीमती बिझांट बाईच्या संबंधानें आपल्या स्थानिक सरकारच्या अटकेचा हुकुम काढून घेतला असें मुंबईचीं पत्रें ह्मणतात. तर खरा धन्यवाद देण्याची ती अमृत वेळा कोणती!

**अभिनंदनः**—येथील राजेश्वर मंदिरांत जी श्री गणपतीची प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली ती सुंदर व उभट तोंडवळ्याची मूर्ती व तिचें तें पद्मासन आणि शूंडेचा मेरुदंड हीं उत्कृष्ट कारागिरी व्यक्त करितात आणि ह्मणूनच आह्मी हे कुशल कारागीर रा. रा. दिंगबरराव व दुसरे दत्तोपंत अघोर या दोघांचेही अभिनंदन करितों.

गंधर्व नाटक मंडळीनें "स्वयंवर" या नव्या नाटकाचा प्रयोग परवा रात्रौ केला. हें नाटक प्रौढ विचारांच्या मंडळीस फार आवडलें, आणि रुक्मिणीचें मनोहर गायन तसेच भीमकाचें काम यांनीं श्रोतृसमाज आनंदित झाला. काल दोनप्रहरीं "संशय कल्लोळ" हा प्रयोग झाला. ही गंधर्व मंडळी आकोल्यास चांगली लोकप्रिय होत चालली आहे.

**कैदी सैनिक**

कर्नल लेन यांची मेसापोटेमियाकडे व लष्करी कामावर बदली झाली तेव्हां त्यांनीं मध्यप्रांतांच्या कैद्यासाठीं फार महत्वाची लढाईवरची कामगिरी शोधून काढली सुमारें ९०० कैदी लढाईवर जाण्यास तयार झाले आणि त्यापैकीं सुमारें ४०० लोकांची लढाईच्या बाजूला रवानगीही करण्यांत आलेली आहे. कैद्यांना बहादरीची कामगिरी करण्याला व लौकिक मिळविण्याला ही चांगली संधी मिळाली आणि लढाईवरून ते विजयी होऊन परत येतील तेव्हां समाजातर्फें व सरकारांतून त्यांचे योग्य अभिनंदनही करतां येईल. कित्येक कैदी असें असतात कीं त्यांच्या शारीरिक शक्तीला योग्य दिशा न लागल्यामुळें ते गुन्ह्यांचे मार्ग स्वीकारतात; पण लढाई सारखें राजसेवेचे जेव्हां उत्कृष्ट कार्य त्यांच्या डोळ्यापुढें खेळूं लागतें तेव्हां हींच माणसें चांगलीं ह्मणून नावाजली जाण्याचा चांगला काल प्राप्त होतो. हें कैद्यांचें वर्तन बाह्य जगांतही प्रस्तुतच्या आणीबाणीच्या प्रसंगीं अनुकरण करण्यासारखें होय.

**देशी कांच**—येथील सायकलचे दुकानदार राजश्री रत्नाकर ब्रदर्श यांनीं लोकांच्या सोयीसाठीं मुद्दाम देशी कांचेचें सामान बोलावून विक्रीसाठीं ठेविलें आहे.

येथील पवित्र देशी साखरेचे दुकानदार राजश्री दिगंबर मुकुंद अघोर यांनीं एक चांगला निबंध लिहून ते स्वतः कानपूर शुगर वर्क्सची साखर विक्रिसाठीं ठेवीत असतात असें आह्माकडे लिहून धाडलें आहे.

काल रोजीं सायंकाळीं येथील सेंट्रल बॅंकेची वार्षिक जाहिरसभा भरली होती अध्यक्ष राव बहादूर दामले असून सेंट्रल बॅंकेचे बरेचसे सभासद व त्यांच्या ताब्यांतील पतपेढ्यांचेही पुष्कळसे सभासद मिळून दीडशेवर मंडळी जमली होती. रावबहादुर महाजनी व राजश्री बापूसाहेब जठार हेही आले होते. एकंदर सभेच्या क्रमांत मंडळीचा उत्साह विशेष दिसला आणि रावबहादुर दामले, बापूसाहेब जठार यांनीं सहकारी तत्वाचा प्रसार करण्यासंबंधानें जो कळकळीचा उपदेश केला तो लोकांस फार आवडला.

---

## नोटीस.

रा. रा. लालसा वा देवसा तेली रा. जामठी बु॥ ता. मुर्तिजापूर जि. आकोला यांसः—

नोटिस देणार खबदुऱ्या वा बाळ्या महार रा. जामठी बु॥ ता. मुर्तिजापूर जि. आकोला नोटिस देतो कीं, मी माझा मुलगा नामे पुण्या हा तुमचे येथें १॥ वर्षांचे बोलीनें ३६ रुपये साला प्रमाणें ठेविला होता. त्याबद्दल मी तुह्मास सालखत लिहून दिलें आहे. दिड वर्षांची रक्कम एकंदर ५४ रुपये मला मिळावयास पाहिजेत. परंतु एक वर्षाचे ३६ रुपयेच मिळाले बाकीचे ६ महिन्याचें पैसे पुढें देऊं ह्मणून सांगितलें. त्याप्रमाणें मी पुढें २-४ वेळां मागणी केली तरी दिलें नाहींत. आणि शेवटीं असें ह्मटलें कीं, सालाचे पैशाबद्दल तुझे आमचेकडे कांहीं राहिले नाहीं. आणि माझे मुलानीं तुमचे येथें १ वर्ष ३ महिने नोकरी केली आहे तर मला ६ महिन्याचे पैसे द्यावेत व आपली तीन महिने भरून घ्यावीत नाहींतर जर कदाचित तुह्मी फिर्याद केली अगर कोणास दस्तैवज विकला तर मी त्याचा जबाबदार नाहीं. क. ता. २९-९-१७

सही

खबदुऱ्या वा बाळ्या महार सहीची नि. खुद हातचा आंगठा

नों० नं० ४१४

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दिवाणी मुकदमा नंबर ७२ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रिक्ट अन्ड सेशन जज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव सखाराम
बापाचें नांव सोनाजी
जात कुणबी राहणार धोदानी
तहसील बाळापूर जिल्हा आकोला
च्या अल्पवयी विठू वा। गणू कुणबी
उमर वर्षे १४

राहणार धोदानी ता. बाळापूर तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हू अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर तुह्मास कांहीं तक्रार असेल तर तुह्मांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि तुह्मांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तुह्मी हाजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख १९ माहे सप्टेंबर सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही
W. R. Dhobley
डि. जज
पश्चिम वऱ्हाड
आकोला

नो. नं. ४१२

---

## जाहिर नोटीस

चुनी मर्द गोपाळसिंग रजपूत राहणार हात ब्रांच पोष्ट निंब ता. बाळापूर

इजलाः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची ता. ७-९-१७ ची नोटिस पावली. तुमचे मयत बंधु नारायणसिंग यानीं आमची शेतें दुसऱ्या कोणास लावल्याची आह्मास माहिती नाहीं. आह्मी तुमचे नवरून किंवा नारायणसिंगचे वाहितदाराकडून जमिन हिसकावून घेतली, व मारोतीसिंग व भेदासिंग या उभयतांना लावून काढली वगैरे मजकूर सर्व खोटा आहे. आमची रक्कम बुडविण्यासाठीं तुह्मी हे थेताड व कुभांड कादलें आहे असें दिसतें. आमची पत्याची रक्कम देण्याम तुह्मी नारायणसिंगचें वारस सर्वतोपरी जबाबदार आहांत. जमिन आमचे कबज्यांत नाहीं. व आह्मी पडीत ठेवल्याबद्दलचा मजकूर सर्वथैव खोटा आहे. ही नोटिस ता. २८-९-१७ इ.

सही
यशवंतराव गोविंदराव देशमुख द. खुद
नों. नं. ४१३

---

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुळठी, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधीं विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

---

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचें (अडतीचें) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचें व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरें लागणारें सामान, बिछांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्पांपस् वगैरे माल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स
पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. न. ३९८

---

**गरीबांस फुकट**

# रामबाण मलम

**( कोणत्याहि त्वग्रोगावर )**
**गुणकारी किं. ६ आणे.**

# केशनाशक पूड.

**( ९ आणे )**

**(क्याटलॉग फुकट) पत्ता- व्ही. आर. मुळे**
नांदूर. G. I. P.

नो० नं० ३७०

---

## रोल्डगोल्ड सोन्याचे

**कधींच काळे न पडणारे दागिने**

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; तुळी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-९. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २-३-४; अंगठी १; मळे अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के. आणि कंपनी**
**गिरगांव— मुंबई**

नो० नं० ९

---

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखानाः—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोल्हासक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भसंबंधी मुरकेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळंतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टिमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ती भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व नढाल भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटें मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ९ आणे पडेल दर एकदम ३९ गो० १ रु० ७९ गो० २ रु० १६९ गो० ४ रु० २७९ गो० ६ रु० ५९० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगींस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह, तीडक, मुत्रांची लाळा, संकोच, पुपस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकेत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. वा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवू.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोगीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतीमा कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Regd-N. No 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला—सोमवार तारीख ८ माहे आक्टोबर सन १९१७ ई० [ अंक ४०

## जाहिरात

**मुंबई व्यांकेची सेव्हिंग व्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मार्गे राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई व्यांक
आकोला ९।९।०९ } Lyon Scott
एजंट
नो नं १

## नोटीस.

रा. रा. घनश्या वा॥ लक्ष्या मांग राहणार घुसर ता. व जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस दिली जाते कीं, तूं माझे लग्नाचा नवरा आहेस. मला १२ वर्षांपासून बरोबर वागवित नाहींस. मला अन्नवस्त्र ही देत नाहींस. आज पावेतों तुह्मी वागवाल अशा आशेनें होते. तरी कळविते कीं, आज १५ दिवसाचे आंत मी खालेल्ला खावटी खर्च रुपये २०० देऊन मला नांदाविण्यास घेऊन जावे. या प्रमाणें करणें नसल्यास खर्चाची रक्कम देऊन मजला दुसरा घरठाव करण्यास फारकती लिहून द्यावी. या प्रमाणें करण्यास चुकले असतां मी योग्य कोर्टांत फिर्याद करून दाद लाऊन घेईन. मग सर्व खर्च नोटिशी सुद्धां भरून घेईन. ही नोटीस दिली सही ता २२-९-१७ इसवी दस्तुर विनायक लक्ष्मण पि. रा.

सही

सहीची नि॥ साळू मर्द घनश्या मांगीन
इची रा. वरखेड बु॥ ता॥ आकोला
पोष्ट बार्शीटाकळी
नो० नं० ४१५

## जाहीर नोटीस

सर्वांस कळविण्यांत येते कीं, माझा वडील मुलगा महमद यासिन वा महमद पन्हा रा. हिरपूर हा माझे मर्जी प्रमाणें वागत नसल्यामुळें मी त्यास कुटुंबा सु॥ निराळा काढून दिला आहे. त्यास सुमारें दोन महिने झाले तो निराळा राहत आहे. त्यास माझे इस्टेटीवर अगर माझे नांवावर कोणी कर्ज देऊं नये. दिल्यास मी त्याचा जोखमदार नाहीं. कारण या शिवाय मजला आणखीन दोन मुलें व स्त्री आहे. माझी सर्व स्थावर जंगम इस्टेट वडिलार्जित नसून स्वसंपादित आहे. माझे इस्टेटीवर महमद-यासिन याचा मुळींच हक्क नाहीं. कळावें. ता. १।१०।१७

सही

महमदपना वा लालमीया राहणार
हिरपूर दस्तुर खुद
नो० नं० ४१६

## नोटीस.

रा. रा. कर्णाजी वा कमट्राजी राऊत रा. महान तालुके आकोला जिल्हे आकोला

यांसीः—

खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमची मुलगी नामें सारजी मर्द रामजी टाकोल्कर रा. धोत्र ता. मंगरूळपीर जिल्हा आकोला ही माझी लग्नाची बायको असून हीला आणण्याकारितां मी स्वता व माझा मामा नामें कृष्णाजी वा रघुजी वानखडे असे आह्मी आलो असतां तुह्मी तिला पाठवित नाहीं तिचे माझे लग्न होऊन आज सरासरी ९-१० वर्षें झालीं. यांत तिचे माझे कोणते ही तऱ्हेनें भांडण तंटा नसतां शिवाय कोणत्याही गोष्टीची कुरबुर नसतां तिला आपण पाठवीत नाहीं तर या नोटिशीनें आपणास कळवितो कीं, ही नोटिस पावल्या तारखे-पासून ८ दिवसाचे आंत आपण तिला आमचे घरीं आणून घालावे. नाहीं तर तिनें तरी आमचे घरीं निघून यावे. तसें न झाल्यास पुढें जर तिनें आमचेवर अन्नवस्त्रा-चा दावा आणल्यास त्याची जबाबदारी आमचेवर राहणार नाहीं कळावें. ता. २४ माहे ९ सन १९१७

सही

रामजी वा लुंगराजी टाकोल्कार
राहणार धोत्र प्रगणे धामणी ता.
मंगरूळपीर जिल्हा आकोला
नो० नं० ४१७

## नोटिस

नोटीस घायनी मर्द सदाशीव वावोडे कुणबी रा० पाडसुल ता० आकोट जि० आकोला इसः--

नोटीस देणार सदाशीव वा मारोती वावोड कुणबी रा० पाडसुल हलीं मु. देवरी ता० आकोट जि० आकोला मी खालीं सही करणार नोटीस देतो कीं तूं माझी गंधर्वाची बायको असून आज सुमारें गंधर्वास चार वर्षें झालीं व गंधर्व झाल्यापासून तूं माझे घरी कधीच चांगले रितीनें वागली नाहीस. आणि तुजबरोबर मी जे गंधर्व लावीले ते माझें सुखाकरितां व नाव लौकीक वाढावे. ह्मणून ते न होतां त्याचे उलट वागु लागलीस. तरी गंधर्व झाल्यापासून मी एक वर्षेंपर्यंत वागाविले पुढें तीन वर्षांपासून मी तुला टाकून दिले. मी माझे जवळचे अन्न वस्त्र ही दिलें नाही. आणि तुजला फंद फितूर लोकांनीं तुजला फंद देऊन शिकविलें व त्या प्रमाणें तूं वागू लागली. व तुझी वाईट चाल पाहून मी माझी इजत व वाडवडीलांचें नांव राहावे ह्मणून मी मौजे देवरी येथें सहा महिन्यापासून राहण्यास गेलो आहो. आणि या तीन वर्षांत तुझा माझा बेबनाव झाल्यामुळें कांहींच जगरूढी प्रमाणें सबंध घडला नाहीं व माझे पासून तुजला मुल बाळ वगैरे मुळीच झालें नाहीं. व आतां या नोटिशीनें कळवितो कीं, तुझे अंगावर असलेले सोन्या चांदीचे दागीने मजला माझे परत देण्याचे करावे व माझे इस्टेटीवर त्वा कांहीं व्यवहार केल्यास तो मजला कबुल होणार नाहीं. करितां या नोटिशीनें तुजला दुसरा घरठाव करण्यास मोकळीक दिली आहे मी तुजला घरठाव केल्याबद्दल अडथळा करणार नाहीं ही नोटीस फारकती समजावी असें करण्यास चूकू नये व त्वा कांहीं व्यवहार केल्यास त्याचा जबाबदार मी होणार नाहीं कळावे ता० २८ सप्तेंबर सन १९१७ इ.

दस्तुर रामकृष्ण बळीराम जोशी रा. देवरी

सही

सदाशीव वा मारुती वावोडे
कुणबी रा० पाडसुल हलीं
मु० देवरी निशानी आंगठा
नो. नं. ४१८

## नोटीस

नोटीस बेशर्मी घनःशाम वा॥ गोविंदा कासार राहणार सातेगांव पोस्ट अंजनगांव ता० दर्यापूर जि. उमरावती.

यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीशीनें कळविण्यांत येते कीं तुला राहाण्याकरितां तीनच्यार वर्षाचे बोलीने दरमाहा भाडं १ रुपया एकचा ठराव करुन घर दिले होतें. भाड्याची रक्कम रुपये ४८ अक्षरी रुपये अठेचाळीस आजपावेतो तुझ्याकडेस निघतात. यापैकी लिपपोत दुरस्ती बद्दल ठराव झाल्याप्रमाणें रकम रुपये २४ तूं मजरा घेऊन बाकी रुपये २४ अक्षरी रुपये चौविस आणून द्यावे व मला भाडे-चिठ्ठीकरुन द्यावी. अगर भाड्याचे रुपये तुझ देणे नसल्यास माझी जागा खालीं करुन द्यावी. तुजकडेस भाड्याबद्दल राहिलेल्या रकमेची आठ दिवसात तुजकडून सोय न झाल्यास मी खर्चासुधा रकम दावा करुन भरून घेईन कळावे तारीख २८-९-१७
द. कृष्णराव नारायणराव देशमुख रा. सातेगांव

सही.

दशरथ शिवरामजी कासार द. खुं.
नो० नं० ४१९

## जाहिर नोटीस

मी खालीं सही करणारिन सरू मर्द ज्यानकीराम आप्पा लिंगाईत वाणी जीन राहणार कुटासे ता० आकोट जिल्हा आकोला हलीं मु० आकोट ईजकडून नोटीस जाहीर देण्यात येते कीं माझे मालक नामे ज्यानकीराम आप्पा वलद वीठु आप्पा लिंगाईत वाणी राहनार सोनाळ ता० जळगांव जामोद जील्हा बुलठाणें यांना नोटीस जाहिर देण्यात येते कीं तुह्मी मला आज च्यार पाच वर्षांपासून माझे आंइ बापाचे घरीं पाठवून दिले आपण घेवून जाण्यास येत नाहीं व मला सोडाचिठ्ठीही करून देत नाहीं. करितां या जाहीर नोटीसीनें कळविते हें नोटीस पावल्या तारखे पासून आठ दिवसांचे आंत घेऊन जा नाहींतर मी हीच सोडचिठ्ठी समजून दुसरा घरठाव कर-णार कळावे ही जाहिर नोटीस लिहिली असे ता. २८-९-१७ ई.

सही

सरू मर्द ज्यानकीराम आप्पा वाणीन
हलीं मुकाम आकोट निशानी
हातची बांगडी
नो० नं० ४२०

## नोटीस.

रा. रा. सखाराम वा शामु माळी राऊत रा. पारखेड ता. खामगांव

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे बरोबर माझे लग्न होण्यास अंदाजा १०।११ वर्षे झालीं. मी तुमचे येथें लग्न झाल्यावर ७।८ वर्षे होते. पुढें माझा कोणते ही प्रकारें अपराध नसतां, तुह्मी मजला माझे माहेरी आणून घातले. तेव्हां मी माझे माहेरीं ७।८ दिवस राहून माझे बापानें पुन्हा तुमचे येथें आणून घातले. तुह्मी त्यावेळीं मला दोन दिवस ठेवून माझे अंगावरील सर्व दागिने काढून घेऊन मारहाण करून कांहींच अपराध नसतां पुन्हा मजला माहेरीं आणून घातले. तेव्हां पासून मी माझे बापाचे घरीं पोट भरीत आहे. मजला तुह्मी नेले नाहीं, व खाण्या-पिण्यास ही दिले नाहीं. त्यामुळें मजला ३०० रुपये कर्ज झाले आहे. करितां तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत वरील

३०० रुपयांची रक्कम द्यावी, ह्मणजे मी तुह्मी वागविल्यास तुमचे घरीं येऊन संसार करण्यास तयार आहे. या प्रमाणें न केल्यास मी दुसरे इसमा बरोबर वरठाव करीन. मग तुमचा माझेवर नवरेपणाचा मुळींच हक्क राहणार नाहीं. हीच फारकती जाणून मजला दुसरा वरठाव करण्यास कोणत्याच प्रकारची हरकत नाहीं व तुमची कोणबेच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं. काळावें. ४।१०।१७ इ॥

सही

१ भुली मर्द सखाराम राऊत रा० माटरगांव नि. आंगठा

नो. नं ४२१

## नोटीस

**नोटीस कलम ११ आक्ट ८ सन १८९० प्रमाणें.**

कि. दिवाणी मुकद्दमा नंबर ७५ सन १९१७ इ. विद्यमान डिस्ट्रीक्ट अँन्ड सेशन जज्ज साहेब यांचें कोर्ट

मुक्काम आकोला

नांव सत्यभामाबाई

नवऱ्याचें नांव शंकर मोरेश्वर हिंगवे

जात ब्राह्मण राहणार आकोला

तहसील आकोला जिल्हा आकोला

ह्या अल्पवयी जनार्धन शंकर

उमर वर्षें १९

राहणार आकोला ता. आकोला तहसिलीचे (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालनकर्ता (१) नेमला जाण्या विषयींच्या अर्जा संबंधीं—

सर्वत्र लोकांस जाहीर करण्यांत येते कीं सदर्हू अर्जदारानें सदर्हू अल्पवयीचें (२) शरीर व इस्टेट रक्षणासाठीं पालन कर्ता नेमला जाण्या विषयीं अर्ज केल्यावरून सदर्हु अर्जाची सुनावणी व चौकशीची तारीख ३ माहे नोव्हेंबर सन १९१७ इ. रोजीं नेमिली आहे. त्यावरून अशी नोटीस देण्यांत येत आहे कीं, सदर्हू अर्जदाराच्या अर्जाबद्दल जर तुह्मास कांहीं तक्रार असेल तर तुह्मांस जातीनें किंवा कोर्टानें अधिकार दिलेल्या ज्या वकीलास योग्य माहिती दिली असेल व अर्जासंबंधीं सर्व मुद्याच्या सवालांचा जबाब देण्यास जो समर्थ असेल किंवा अशा सर्व सवालांचा जबाब देऊं शकेल असा कोणी दुसरा असामी ज्याच्या बरोबर असेल अशा प्लीडराच्या मार्फत या कोर्टांत हजर झाले पाहिजे; आणि तुह्मांस असें ही नोटीस देण्यांत येत आहे कीं सदरी लिहिलेल्या दिवशीं तुह्मी हाजर न झाल्यास, तुमच्या परोक्ष अर्जाची चौकशी होऊन ठराव केला जाईल. आज तारीख २० माहे सप्टेंबर सन १९१७ इ. रोजीं आमच्या सहीनिशीं व कोर्टाच्या शिक्या निशीं दिली

सही

W. R. Dhobley

डि. जज्ज

पश्चिम वऱ्हाड

आकोला

नो. नं. ४२२

## पत्र व्यवहार

वऱ्हाड समाचार पत्रकर्ते यांस सा. न. वि वि. यदां अकोट येथें सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या थाटमाटानें आणि अपूर्व उत्साहानें साजरा करण्यांत आला. उत्सवांत निरनिराळ्या विषयांवर व्याख्यानें ठेवण्यांत आल्यामुळें लोकांस ज्ञानामृत पाजून त्यांच्यांत जागृति उत्पन्न करण्याची कामगिरी उत्तम रितीनें बजावण्यांत आली. याच समयास येथें रा. बाबासाहेब खापर्डे व यवतमाळचे डाक्टर परांजपे ही आले होते. रा० बाबासाहेब खापर्डे यांनीं ता. २३.९.१७ रोजीं संध्याकाळीं "स्वराज्यावर" व्याख्यान दिलें. ता. २४.९.१७ रोजीं सकाळीं "गौतमबुद्धाचें चरित्र" या विषयावर व्याख्यान देऊन संध्याकाळीं पुन्हा एक स्वराज्यावर व्याख्यान दिलें. गौतमबुद्धाचें हृदयंगम चारित्रामृत त्यांच्या रसाळ वाणींतून स्रवत असतां श्रोत्यांच्या अंतःकरणास पाझर फुटून तो अश्रुरूपानें दृग्गोचर होत असे. स्वराज्यावरील व्याख्यानांचाही श्रोत्यांच्या मनावर चांगला परिणाम होऊन तालुका कमेटी स्थापन करण्यांत आली. स्वराज्याविषयीं अपूर्व उत्साह उत्पन्न झाला. डॉ. बाबासाहेब परांजपे यांच्या ता. २७-९-१७ चे व्याख्यानानीं हा उत्साह द्विगुणित झाला. येथील व्यापारी खुशालचंद मोरारजी यांनीं रा. बाबासाहेब खापर्डे यांस चहापार्टी दिली ते वेळीं एकाच बैठकीस व्यापारी मंडळीपैकीं ताबडतोब २९ सभासद स्वराज्यसंघास मिळाले.

ता. २५-९-१७ रोजीं रा. श्रीधरपंत दाणे यांनीं 'मानवीध्येय' या विषयावर सुंदर व्याख्यान दिलें.

ता. २६-९-१७ रोजीं रा. रामेकर वकील यांनीं "उपयुक्त शिक्षण" या विषयावर बोलत असतां हल्लींच्या शिक्षण पद्धतींतील अनेक दोषांचें अविष्करण केलें व रिस्ले सर्क्युलर वर टीका करून तूर्त कामकरीवर्गाकरितां रात्रीच्या शाळांना आरंभ करून अखेर Hampstead व Tuskeji येथील संस्थाप्रमाणें संस्था स्थापन करण्याची किती अवश्यकता आहे तें सांगितलें.

विद्यार्थ्यांना व सरकारी नोकरांना येण्यास कोणचीही आडकाठी राहूं नये ह्मणून बाकीच्या दोन दिवसां करितां 'विश्वाची उभारणी व शंकराचार्यांचें चरित्र' या विषयाची योजना केली होती.

ता. २७-९-१७ रोजीं रा. करकरे वकील यांनीं आपल्या बालबोध आणि शांत वाणीनें विश्वाच्या उभारणी सारखा ज्योतिषविषयक शास्त्रीय विषय सुगम व मनोरंजन करून दाखविला.

ता. २८-९-१७ रोजीं रा. घिरणीकर वकील यांनीं श्रीमच्छंकराचार्यांचें चारित्र आपल्या गोड भाषेनें विशद करून साकल्येंकरून सर्व माहिती दिली. आणि हिंदुधर्मांत नानामतांचा जो गलबला माजला होता तो नाहींसा करून आचार्यांनीं अद्वैत सिद्धांताची कशी स्थापना केली तें समजाऊन दिलें.

हा गणपत्युत्सव यशस्वी करून दाखविण्याचें सर्व श्रेय येथील खटपटी तरुण मंडळीकडे विशेषतः रा. दाजीपंत बेदरकर आणि महादेवराव आसरकर यांजकडे आहे. कळावें. आपला.

बातमीदार

वऱ्हाडसमाचार

भाद्रपद वद्य ८ पिंगल संवत्सर १८३९

## सहकारित्व

रावबहादुर दामले यांचा

## ( अभ्युदयाचा मंत्र )

आमच्या जिल्ह्यांत सहकारी तत्वाचें मुख्य अध्वर्यू राव बहादुर केशव गोविंद दामले हे आहेत. या तत्वाचा यांच्या अंतःकरणांत इतका प्रकाश पडला आहे कीं त्यांना सहकारी पेढ्या व त्यांचा उत्कर्ष हाच राष्ट्राचा जीव कीं प्राण वाटतो. त्यांची दृष्टी इतकी व्यापक होत चालली आहे कीं त्यांनीं सहकारी पतपेढ्या सर्वत्र प्रसृत करण्यासंबंधानें फार दांडगा प्रयत्न चालविला आहे. गेल्या २३ व्या तारखेस येथील सेंट्रल बँकेची जी वार्षिक जाहिरसभा भरली होती त्यावेळीं त्यांनीं आपलें हें ध्येय फार सुंदरपणें लोकांपुढें मांडिलें. आपल्या उपसंहाराच्या संभाषणांत ते ह्मणाले कीं:—

या सहकारी चळवळी मोठ्या कार्योद्दीपक आहेत. महायुद्धासंबंधानें जेव्हां वर्गण्या सुरू झाल्या तेव्हा सेंट्रल बँकेच्या व पतपेढ्यांच्या सभासदांनीं मोठी रक्कम युद्धकर्जासाठीं दिलेली आहे. त्याशिवाय सेंट्रल बँकेच्या मार्फतीनें ९६ हजार रुपयांचे वॉर बांड्स ही घेण्यांत आले. सहकारी चळवळींत पडलेले लोक राजनिष्ठेनें, उत्साहानें व तत्परतेनें पुढें आले व मागें सरले नाहींत यांत त्यांनीं मोठें चांगलें कर्तव्य बजाविलें आहे. १९०४ सालीं सहकारी संस्थांचा कायदा झाला व त्याचा प्रथम प्रयत्न १९०६-७ सालीं आकोला जिल्ह्यांत करण्यांत आला. आरंभीं ६-९-१३-१८ व १८ अशा सभा होत्या पण १९१० सालापासून या पेढ्यांची खरी प्रगति दिसून येत आहे. ही प्रगति करून देणारा आमचा मुख्य उत्साहाचा झरा ह्मणजे आमचे गुरुवर्य व प्रसिद्ध लोककल्याणकारी रावबहादुर अण्णासाहेब महाजनी हे होत. आरंभापासून यांनीं ही लोकसेवा उत्कृष्ट प्रकारें केली व सर्वांना पद्धत लावून कामाच्या दिशा दाखवून दिल्या. ते या वेळीं डायरेक्टरांतून निवाले आहेत; तथापि त्यांच्या विचारशक्तीचा आह्माला दीर्घकाल लाभ होईल अशी त्यांची सदृढ शरीर प्रकृती राहावी ह्मणून आमची ईश्वराजवळ प्रार्थना आहे.

सहकारी तत्व पाश्चिमात्य देशांतून आलेलें आहे खरें आणि त्याला सरकारी प्रयत्नांचा पाठिंबाही आहे. तेव्हां तें प्रत्येक व्यवहारांत अगदीं भिनून जाईल अशी वस्तुस्थिति आली पाहिजे. ५०-६० वर्षांचा अनुभव एकत्र करून त्याच्या यशाची हमी घेऊन सरकार लोकांना सहकारी कार्याला प्रवृत्त करीत आहे. या त्यांच्या पवित्र व स्तुत्य उद्योगाबद्दल राष्ट्र सदैव ऋणी राहील. सहकारित्वानें कोट्यावधी रुपयांचें भांडवल उभारतां येतें, लक्षावधी लोकांना त्याचा फायदा मिळतो, असे प्रचंड फायदे या सहकारी संस्थाच्या भावी कार्यमालेपासून होणारे आहेत. लोकांनीं या विषयचा चांगला विचार केला पाहिजे व त्यांतील तत्वांचा अभ्यास ही जसा उत्तम होईल तशी यशःश्री आपल्या दारीं उभी राहील. खाजगी मंडळीच्या हातून होण्यासारखे सहकारी संस्थेसारखें दुसरें पवित्र कार्य कोणतेंच नहीं. या सहकारी संस्था जेव्हां मूर्तिमंत होऊं लागतील तेव्हां त्या दांडग्या प्रयत्नामुळें पहाडासारखे पहाड आपोआप उलथून पडतील. खेडोपाडीं ही चळवळ लोकांच्या अंगीं खेळती राहील तर सांपात्तिक स्थिती सुधरून लोक चांगले उदयास येतील. पतपेढ्यांच्या सभासदांचें बाहेरचें कर्ज नाहींसे होईल हा त्यांचा पाहिला एकदेशीय फायदा होय; पण कालावधीनें हे सभासद दुसऱ्या सांपात्तिक अभ्युदयाच्या गोष्टी करून परोपकार करण्याला ही सामर्थ्यवान् होतील. सध्या शेतकरीवर्गच सेंट्रल बँकेनें आपल्या डोळ्यापुढें ठेविला आहे. काम बिकट खरें; पण पूर्वींच्या चालीमुळें व इतर कांहीं स्थितीमुळें जीं कर्जें झालीं आहेत तीं फेडल्याशिवाय लोकांस सहकारी तत्वाचा फायदा मिळणें संभवनीय नहीं. हें तत्व आमच्या ८६ पतपेढ्यांच्या सभासदांच्या मनावर इतकें बिंबलें आहे कीं सुमारें ४०।४५ पेढ्यांतील सभासदांस आज मित्तीला बाहेरचें एक पै देखील कर्ज नाहीं ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. कर्ज फिटल्यानंतरचा पुढील हेतू असा कीं शेतकऱ्या जवळील जमिनीचें क्षेत्र वाढवावें, शेतीची मशागत सुधारलेल्या शास्त्रीय पद्धतीनें करण्यांत यावी, ह्मणजे शेतीचें उत्पन्न हल्लींच्यापेक्षां लौकरच दिढी दुपटी इतकें होईल. लोकांच्या सांपात्तिक उत्कर्षाला आधिभूत असा हा सहकारित्वाचा मंत्र होय. या मंत्राचें ब्रीद असें आहे कीं लोक संपत्तिमान् ऐपतदार, वजनदार आपोआप होत जातील. मंडळीचा ओघ हे सहकारी कार्य सतत करण्याकडे पाहिजे. आपल्यापैकीं झटणारी मंडळी हें पवित्र कर्म हातीं घेतील, हौसेनें, कळकळीनें व दृढ इच्छेनें हें कार्य उभारण्याची ते मनापासून शपथ घेतील आणि अन्न, वेळ व ऊन हीं न पाहतां पुढें सरसावतील तर लोकसेवा फार अप्रतिम व सर्वोत्कृष्ट होईल. कळकळीनें व आग्रहानें ही लोकसेवेची विनंती लोकांपुढें मांडलेली आहे. हल्लींच्या १०।१५ मंडळीच्या ऐवजीं ५० लोक खरा बोध घेऊन सहकारी तत्व समजाऊन घेऊन व सर्व शंका दूर फेकून यावेळीं पुढें येतील तर प्रस्तुतचें कार्य शंभरपट जोरानें चालेल आणि त्यांतच लोकांचा खरा उत्कर्ष, कल्याण व सुख हीं वृद्धिंगत होतील.

१६ वर्षांची पद्धत ही जरूर लक्षांत घ्या. ही समजून घेऊन कर्ज मुक्त होण्याची ही खरी दिशा आहे अशी खात्री झाल्यास ही खूळ ह्मणून फेकूं नका. कल्याणाची दिशा आहे असा मनाचा निश्चय होईल तर जोराची खटपट करा. सध्या एक लक्षाचें भांडवल १०० रुपयांचा एक डिबेंचर बाँड या पद्धतीनें आह्मी उभारीत आहों. जबलपूरची

प्राव्हिन्सियल बँक ही सर्व रक्कम देण्याला तयार आहे; पण जबलपूरच्या प्राव्हिन्शियल बँकेला किंवा अलाहाबाद बँकेला व्याज खाऊ न देतां आपणच तें व्याज घेतलें पाहिजे. सहकारी संस्थाचे सभासदच काय; पण बाहेरच्या लोकांनीं ही हे डिबेंचर बाँड डोळे झाकून घ्यावेत अशी पूर्ण व पक्की योजना या १६ वर्षांच्या पद्धतींत आहे. सरकारी प्रॉमिसरी नोटा यांच्या पेक्षाही बाजारांत याला नेहमीं तेजी राहील आणि हे डिबेंचर बाँड विकत घेणारे जर ६ महिन्याच्या नोटिसीनें पैसे मागतील तर त्यांस पैसे ही परत मिळतील. पण १६ वर्षें पर्यंत ज्यांना धीर असेल त्यांना शेंकडा ६ च्या ऐवजीं ७ व्याज मिळेल. पुष्कळशा मंडळींनीं या १६ वर्षांच्या योजनेंत आपले पैसे घातलेले आहेत. यामध्यें शेतकऱ्यांचा अभ्युदय उत्कर्ष व कल्याण आहे व त्या प्रमाणें आपलें ही कल्याण आहे. ह्मणून निवळ व्यापारी तत्वावर बुडणूक कांहीं नाहीं असें पाहून आपण स्वतः दहा हजार रुपये या कामीं घालून रावबहादुर दामले हा सुंदर उपदेश करीत करीत व लोकांस उत्साह देत देत टाळ्यांच्या गजरांत खालीं बसले.

## देशकार्य

### ( जठार–महाजनी यांची एकरेषा )

गेल्या सेंट्रल बँकेच्या जाहीर सभेच्या वेळीं आमचे बाणेदार व कर्तृत्ववान् डिपटि कमिशनर रा. रा. काशिनाथ श्रीराम जठार हे मुद्दाम आले होते. सहकारी संस्थांचा कारभार हें त्यांना मोठें देशकार्य वाटतें आणि या मध्यें सरकारी व बिनसरकारी लोकांस सारख्याच जोमानें शिरतां येते हा या कार्याचा विशेष होय असें त्यांनीं बोलून दाखविलें. सेंट्रल बँकेमध्यें ठेवींची रेलचेल आहे ही गोष्ट त्या बँकेच्या चांगल्या पतीची उत्तम साक्ष होय. प्रस्तुतचे डायरेक्टर व चेअरमन रावबहादुर दामले, महाजनी व कुळकर्णी या स्नेहीं मंडळीचे वर्तमान प्रगतीबद्दल त्यांनीं अभिनंदन केलें. शेतकऱ्याची स्थिती सुधारण्याच्या या कामांत लोक एकत्र होतील तितके पुष्कळसे पाहिजे आहेत. रिपोर्टाच्या एका रकान्यांत तीच तींच नांवें सांगण्यांत येतात ह्मणजे काम करणारी मंडळी वाढावी तितकी वाढत नाहींत हें उघड होय. या कार्याला उत्तेजन देण्याकरितां आकोल्याच्या व बाहेरगांवच्या लोकांनीं मोठी मदत केली पाहिजे आणि मंडळी जशी या कामाला येऊन मिळतील त्या मानानें बँका वाढतील, शेतकऱ्यांची सुधारणा होईल व व्याजाचा भाव हळूं हळूं कमी ही होत जाईल इ. इ. उद्गार राजश्री जठार यांनीं लोकांना वीरश्री येईल अशा निश्चयानें काढले आणि आह्मास उमेद आहे कीं ती त्यांची आशा लौकरच सौभाग्यमय होईल.

नामदार रावसाहेब रामचंद्र विष्णु महाजनी यानीं या देशकार्याची दुसरी एक बाजू सांगितली. या सहकारी संस्थामध्यें पतपेढ्या पहिला पाया. त्याला भांडवल पुरविणाऱ्या जिल्ह्याजिल्ह्याच्या सेंट्रल बँका, आणि या सेंट्रल बँकांना भांडवल पुरविणारी एक प्रांतिक मुख्य बँक अशी ही तीन दुव्यांची साखळी आहे. पतपेढ्या व सेंट्रल बँका यांच्यामध्यें आतां एक नवा दुव्वा घालण्यांत येत आहे तो युनिअन ह्मणजे पतपेढ्यांचें मंडळ हा होय. हें मंडळ निरनिराळ्या पतपेढ्यांवर देखरेख ठेवून आपल्या ताब्यांतील पतपेढ्या चांगल्या उत्कर्षाला आणण्यासाठीं सर्व प्रकारची देखरेख व खटपट करील. असें मंडळ सध्या गायगांव येथें राजश्री विष्णुपंत कुळकर्णी यांनीं चालविलें असून त्याचें काम चांगलें चाललें आहे. आठ आठ दहा दहा पतपेढ्यांचें एकेक संयुक्त मंडळ अशीं मंडळें जितकीं निघतील तितके सेंट्रल बँकेचें काम हलकें होऊन चांगलें जोमांत येईल. यंदाच्या सालापासून जबलपूरच्या प्रांतिक मुख्य बँकेचे गव्हर्नर सरकारी रजिस्ट्रार हेच असत ते यापुढें नामदार रावबहादुर नारायणराव केळकर हे झाले असून राजश्री कॉस्थवेट यांनीं लोकांच्या हातीं कारभार देण्याची ही योजना मुद्दाम सुरू केली आहे. आमचीं हीं युनिअनें सहकारी तत्वावर जसजशी चांगली चालतील त्या त्या मानानें भावी ग्रामपंचायतींची हीं केंद्रस्थानें होत जातील सरकार ग्रामपंचाइती स्थापण्याच्या विचारांत आहे, तेव्हां या सहकारी पेढ्या ह्मणजे लोकांच्या अंगांत योग्यता व पात्रता आणण्याला उत्तम शाळाच होत. व्यवहारद्वारां येथें जें शिक्षण मिळेल तें ग्रामपंचाइतीच्या कामाला उपयोगीं पडून ग्रामपंचाइतींची संस्था अंमलांत आणण्याचा सुदीन अगदीं नजीक येऊन हल्लीं जी स्वराज्याची इमारत आपण उभी करूं इच्छीत आहों तिचा मूळ पायाच घातल्याचें श्रेय लाभणार आहे.

## कापडाचे भाव.

मनुष्याच्या अवश्यक जिनसा दोन एक अन्न व दुसरें वस्त्र, या दोहोंचे भाव हल्लीं चढले आहेत. पण त्यांतल्या त्यांत कापडाचे भाव इतके चढले आहेत कीं कांहीं पुसूं नये. जो धोतरजोडा पूर्वीं दोन सवा दोन रुपयाला चांगला मिळत असे त्याला चार साडे चार रुपये पडतात. वस्त्रासंबंधीं इतकी महगाई कां झाली आहे हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. वस्तुतः धोतरजोडे बहुधा हिंदुस्थानांतल्याच गिरण्यांतून तयार होतात. ह्या गिरण्या ही आमच्याच लोकांच्या मालकीच्या आहेत. या गिरणीवाल्यांना जबर नफा पडत असला पाहिजे. आणि हा नफा ते आपल्याच देशबांधवांना पिळून काढून मिळवीत आहेत. पण गिरण्यांची भरभराट हिंदुस्थानांत आजपर्यंत कापसाचे जिवावर झाली आहे या गोष्टीचा विचार ही गिरणावाल्यांच्या मनांत येत नाहींसें दिसतें. ते स्वतः या गोष्टीचा विचार करीत नसले तर लोकांनीं व सरकारानें त्यांना तसें करण्यास भाग पाडणें जरूर आहे. सरकार दुष्काळाचे वेळीं दुकानदारांना धान्याचे भाव योग्य मर्यादेंत ठेवण्यास लावतें. वस्त्र ही अन्ना इतकेंच मनुष्याला अवश्य असल्यामुळें या ही बाबतींत त्यांनीं बाजारभावाचें नियमन कां करूं नये तें कळत नाहीं. कळकत्याचे लोकांची सभा या संबंधांत लवकरच व्हावयाची आहे. अशा सभा प्रत्येक गांवांतून झाल्या पाहिजेत, व सरकाराकडे अर्ज गेले पाहिजेत. या बाबतींत लोकांनीं ही आपल्या फ्याशनप्रियतेला आळा घालून शक्य तेवढा कमी कपडा वापरण्याचा निश्चय केल्यास गिरणीवाल्यांचे डोळे उघडतील.

## तोंड उघडलें

बंगालच्या जुन्या प्रांतिक कांग्रेसकामिटीचे सेक्रेटरी मि पृथ्वीशचंद्रराय यांनीं बाबू सुरेंद्रनाथ, रा. ब. वैकुंठनाथ सेन प्रभृति पुढारी मिसेस बिझांटला कांग्रेसचे अध्यक्ष नेमण्याचे इतके विरुद्ध कां आहेत याचा आतां खुलासा प्रसिद्ध केला आहे. इतक्या उशिरा तो करण्याचें कारण ते असें लिहितात कीं बाई अटकेंत असतांना त्यांचे विरुद्ध बोलणें योग्य नव्हतें, ह्मणून इतके दिवस शिष्टाचारास अनुसरून त्यांनीं तोंड बंद ठेविलें होतें. आतां तरी त्यांनीं जी कारणें पुढें केलीं आहेत तीं ही आमच्यामते विशेषशीं समाधानकारक नाहींत. पहिलें कारण ते असें देतात कीं आपले लोक हल्लीं स्वराज्याची मागणी जोरानें करीत असतां व आमचा राज्यभारभार पाहण्यास आह्मी समर्थ आहों असें प्रतिपादीत असतां कांग्रेस सारख्या देशी संस्थेचें नेतृत्व बिझांटबाईसारख्या परदेशी स्त्रीकडे देणें योग्य नाहीं. आह्मी पृथ्वीशबाबूस असें विचारतों कीं दादाभाई नवरोजी यांनीं स्वराज्याच्या मागणीची मुहुर्त मेढ रोवल्यास सुमारें बारा वर्षें झालीं. इतक्या अवधींत सर विल्यम वेडरबर्न हे परदेशी साहेबच कांग्रेसचीं सूत्रें हलवीत आले आहेत ना? यंदा सुद्धां कांग्रेसचें डेप्युटेशन विलायतेस पाठविण्याचें कांग्रेसनें ठरविलें असतांही वेडरबर्न साहेबांनीं उलट सल्ला दिल्यामुळेंच तें जाण्याचें राहिलें ही गोष्ट खरी आहे कीं नाहीं? वेडरबर्न सारखे इंग्रज कांग्रेसचे नेते चालतात, मग बिझांट बाईच कां चालूं नयेत? दुसरें कारण याहून ही पोकळ आहे. मिसेस बिझांट या थि ऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष असल्यामुळें त्यांना अध्यक्ष केल्यानें धर्म व राजकारण यांची सांगड जमेल व तसें करणें कलकत्तेकरांना योग्य वाटत नाहीं. पृथ्वीशबाबू सारख्यांचें थिऑसॉफिकल सोसायटीविषयींचें खरोखरच इतकें अज्ञान आहे कीं ही केवळ हातचलाखी आहे तें सांगणें कठीण आहे थि. सोसायटी ही धार्मिक संस्था आहे, तरी ती एका विशिष्ट पंथाची नाहीं. वाटेल त्या धर्माच्या माणसाला तिचे मेंबर होतां येतें. अर्थात् धर्मभेद तिच्या जवळ नसल्यामुळें धार्मिक मतभेदामुळें होणारे दुष्पारिणामाची शंका घेण्यास मुळींच कारण नाहीं. अशा संस्थेच्या अध्यक्ष बाई कांग्रेसच्या अध्यक्ष झाल्यानें कोणती हानि होणार होती? थि. सोसायटी मानिते तशा प्रकारच्या उदार धर्माचीं मतें राजकारणाला मुळींच विरोधी नसून उलट उत्तम प्रकारें पोषक आहेत, कारण त्यांत भ्रातृसंबंध दृढ करणारीं तत्त्वें आहेत ही गोष्ट कलकत्त्याच्या पुढाऱ्यांना कळूं नये हें आश्चर्य आहे.

## कांग्रेस व होमरूल लीग.

पृथ्वीश बाबूंचें तिसरें कारण मात्र महत्त्वाचें आहे आणि तेंच सुरेंद्रनाथ प्रभृती मंडळीच्या विरोधाचें एकंदर मार असावें असें दिसतें. तें कारण हें कीं होमरूल लीग कांग्रेसला दडपून आपण पुढें येण्यासाठीं धडपड करीत आहे असें या मंडळीच्या मनानें घेतलें आहे. वस्तुतः ही गोष्ट खरी नाहीं. कांग्रेसचे व होमरूल लीगचे उद्देश एकच आहेत. कांग्रेसचीच द्वाही फिरवून लोकांत जागृति करण्याचें व कांग्रेसनें केलेले ठराव अंमलात आणण्याचें काम लीग करीत आहे. पण कांग्रेस स्वतः नुसते ठराव मंजूर करण्यापलीकडे प्रत्यक्ष कार्य कांहीं करीत नाहीं, आणि होमरूल लीग मात्र सभा भरवून, लोकांना शिक्षण देऊन, येथें व इंग्लंडांत सारखी चळवळ करीत आहे याचें कलकत्तेकर मंडळीला वैषम्य वाटतें, व कानामागून आली आणि तिखट झाली असे उद्गार ते बिझांटबाई विषयीं काढीत असतात. यावर येवढेंच उत्तर देतां येईल कीं प्रस्तुतचा काळ चळवळीचा आहे, नुसत्या ठरावांचा नाहीं. आजपर्यंत कांग्रेस नुसते ठराव पास करीत आली, आणि ह्मणूनच हिंदुस्थानच्या राज्यकारभारावर तिचा प्रभाव पडावा तितका पडला नाहीं. कांग्रेसच्या कामाच्या पद्धतींतला हा दोष मिसेस बिझांट यांनीं वर्ष दीड वर्षांच्या आंतच किती सफाईनें काढून टाकिला आहे तें मशहूरच आहे; आणि ह्मणूनच त्या कांग्रेसच्या अध्यक्ष होण्यास इतर सर्व पुढाऱ्यांपेक्षां अधिक पात्र आहेत असें आह्मी ह्मणतों.

## बिझांट बाईच्या विरुद्ध चतुःसूत्री.

पृथ्वीश बाबूंनीं बिझांट बाईच्या विरुद्ध पुढें केलेली वरील चतुःसूत्री किती मोलाची आहे हें वर दाखविलेंच आहे. आमच्या दृष्टीनें तर ती अगदींच टाकाऊ आहे आणि सुरेंद्रनाथ किंवा वैकुंठनाथ यांच्या सारख्या पुढाऱ्यांच्यातर्फे ती पृथ्वीशचंद्रासारख्या देशभक्तानें पुढें करावी ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे. पण घटकाभर आपण असें धरून चालूं कीं हीं कारणें खरीं आहेत. तरी कांग्रेससारख्या आज तीस वर्षें सुरळीत चाललेल्या राष्ट्रीय संस्थेंत फूट पाडण्या इतकीं तीं महत्त्वाचीं आहेत असें खास कोणी ह्मणणार नाहीं. तुह्मांला बिझांट बाई अध्यक्ष नको होत्या, तर तसें स्पष्ट सांगून मोकळे व्हावयाचें होतें. त्यासाठीं प्रांतिक कांग्रेस कमिटीचा इतका चुथडा होऊं देण्याचें कारण नव्हतें. परंतु स्वाभिमानाच्यापायीं स्वदेशहिताला तुडविण्याचें महापातक कलकत्तेकरांनीं केल्यामुळें राष्ट्राची केवढी हानि झाली आहे याची त्यांना कल्पना नाहीं.

## सर रवींद्रनाथ टागोर आणि आंग्लो इंडियन पत्रें.

हिंदुस्थानचे जगद्विख्यात कवि सर रवींद्रनाथ टागोर हे कलकत्याच्या भावी कांग्रेसच्या स्वागत कमिटीचे अध्यक्ष होण्यास कबूल झाले येवढ्यावरून कलकत्याच्या आंग्लोइंडियन पत्रांचा त्यांचेवर मोठाच रोष झालेला दिसतो. हीं पत्रें ह्मणत आहेत कीं कविता आणि राजकारण या दोन भिन्न गोष्टी आहेत. कवींचें साम्राज्य

कल्पानिक जगावर असतें. राजकारणांत प्रत्यक्ष स्थितीचा संबंध येतो. स्टेट्समन् पत्रानें तर साफ असें ह्मटलें आहे कीं पाश्चात्यांच्या विरुद्ध जें गरल रवींद्रनाथांच्या मनांत भरलें आहे तें ओकून टाकण्याची संधी साधण्यासाठींच त्यांनीं स्वागत मंडळीचे अध्यक्ष होण्याचें कबूल केलें आहे. यावर रवींद्र नाथांनीं एक पत्र प्रसिद्ध करून आपल्या कृतीचा खुलासा केला आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं 'ज्या बिझांटबाईनें हिंदुस्थानच्या हितासाठीं स्वज्ञाति बांधवांच्या रोषाचा भार स्वतःवर ओढून घेतला व अटकेंत पडून दुःखाचा ही भार सहन केला, त्या बाईच्या गुणांवर लुब्ध होऊन आपण अध्यक्षपद स्वीकारण्यास संमति दिली. ज्या चारित्र्याचा आदर सर्व मनुष्य जातीनें करणें योग्य आहे त्या चारित्र्यालाच आपण हा मान देत आहों' कांग्रेसचें अध्यक्षपद मिसेस बिझांटला देण्यास कांग्रेस कमिटी तयार असेल तर आपण ही फूट बंद पाडण्यासाठीं मिळालेला मान नाकारण्यास व तो मान रा. ब. वैकुंठनाथ सेन यांस परत देण्यास तयार आहों असें ही त्यांचें ह्मणणें असल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. पण या उदारपणाची किंमत स्वार्थांध झालेल्यांना कशी कळणार ?

## महंमद अली व शौकतअली.

यांची सहानुभूति शत्रुपक्षाकडे असल्यामुळें त्यांना अटक करण्यांत आली व ते आपलें वर्तन बदलण्यास तयार नाहींत ह्मणून त्यांची मुक्तता करण्यात येत नाहीं असा जबाब व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलांत नुकताच देण्यांत आला. सरकारनें केलेला हा खुलासा खरा धरूनच चललें पाहिजे. तथापि या संबंधांत सरकारचा सदर बंधूशीं झालेला पत्रव्यवहार सरकारनें प्रसिद्ध केला असता ह्मणजे वरील दोघांच्या ह्मणण्याचा विपर्यास झाला नसून सरकारचेंच ह्मणणें खरें आहे अशी लोकांची खात्री झाली असती. या दोघांच्या अटकेमुळें हिंदु व मुसलमान या दोन्ही जातींत की खळबळ उडून राहिली आहे ती पाहिली तर कसाही प्रकार असला तरी या बंधूंची मुक्तता सरकारनें करण्यानेंच हिंदुस्थानांत शांत वातावरण स्थापित होईल असें आह्मांस खरोखर वाटतें. त्यांची सहानुभूति शत्रूकडे आहे हें सरकारचें ह्मणणें खरें असलें तरी ते त्यांच्या मुक्ततेच्या आड कां यावें तें कळत नाहीं. बोअर युद्धाचे वेळीं इंग्लंडांत बोअर लोकांविषयीं उघडपणें सहानुभूति दाखविणारे राजरोसपणें इंग्लंडांत वावरत होते कीं नाहीं ? आयर्लंडाचे सीनफेनर बंडवाले मुक्त करण्यांत आले त्यांत शत्रूविषयीं उघडपणें सहानुभूति दाखविणारे शेंकडो लोक नव्हते काय ? सीनफेनर सारख्या प्रत्यक्ष बंडवाल्यांपेक्षां हीं मि. महमदअली व मि. शौकतअली हे बंधु अधिक भयंकर आहेत असें सरकारी अधिकाऱ्यांस वाटत असेल असें आमचें मन सांगत नाहीं. तसे ते खरोखर असून मोकळे ठेवण्यांत आले तर त्यांचे जातभाईच त्यांची कानउघाडणी करून त्यांना ताळ्यावर आणतील ही आमची खात्री आहे.

## हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें ब्रिटिश स्वरूप

व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलांत सिव्हिलसर्विसच्या परीक्षेचा प्रश्न निघाला असतां त्यावर चर्चा करतांना सर विल्यम व्हिन्सेंट असें ह्मणाले कीं हिंदुस्थानच्या राज्यकारभाराचें स्वरूप ब्रिटिश राखण्याचा पतकर इंग्रज सरकारानें घेतल्यावरूनच ब्रिटिश लोकांनीं हिंदुस्थानच्या उद्योगधंद्यांत व व्यापारांत भांडवल घातलें आहे. कोणाच्या ही हातांत अधिकार असो, पण राज्यकारभाराचें स्वरूप ब्रिटिश राहिलें पाहिजे. सर वि. व्हिन्सेंट यांच्या या भाषणांतले मुद्दे विचार करण्यासारखे आहेत तसे गोंधळ उडविणारे ही आहेत. ब्रिटिश स्वरूप ह्मणजे काय? ब्रिटिश लोकांचें वर्चस्व राहणें हा अर्थ उद्दिष्ट आहे काय? आणि तो असला तर मग 'कोणाच्याही हातांत अधिकार असो' या शद्बांचा अर्थ काय? हिंदी लोकांच्या हातांत अधिकार ठेवून ब्रिटिश लोकांचें वर्चस्व कसें राहणार? बरें, ब्रिटिशस्वरूप ह्मणजे ग्रेट ब्रिटनमध्यें असलेल्या राज्यपद्धतीच्या स्वरूपासारखें स्वरूप असा अर्थ उद्दिष्ट असेल तर मग 'राखणें' या शद्बाचा अर्थ काय? जें अगोदर असेल तें संभाळून ठेवणें याला राखणें ह्मणतात. हिंदुस्थानांत ब्रिटिशपद्धतीवर राज्यकारभार चालला आहे कोठें तर तो तसाच अबाधित स्वरूपांत राखावयाचा? ग्रेटब्रिटनमध्यें पार्लमेंटांत लोकमताला केवढा मान आहे? तेथें लोकमताच्या जोरानें प्रधानमंडळही उलथून पडूं शकतें. येथें तसें कांहीं आहे काय? कौंसिलांत लोकपक्ष किती दुर्बळ आहे? सरकारी अधिकार व सरकारनियुक्त मेंबर यांचें मताधिक्य आहे इतकेंशंतनही एखादा ठराव लोकमताच्या प्रभावानें पास झाला तरी तो नामंजूर करण्याचा अधिकार गव्हर्नर जनरलांस आहे व शिवाय त्या ठरावाची अंमलबजावणी सरकारी अधिकारीच करणार. त्यांच्यावर लोकांचा कोणत्याही प्रकारचा दाब नाहीं. मग हिंदुस्थानचा राज्यकारभार ब्रिटिशस्वरूपाचा राखण्याची जबाबदारी सरकारावर आहे या ह्मणण्याचा अर्थ काय ? सदर राज्यकारभार ब्रिटिश स्वरूपाचा राखूं अशा आश्वासनावरच ब्रिटिशभांडवलवाल्यांनीं हिंदुस्थानांत भांडवल घातलें असें सर वि. व्हिन्सेंट साहेबांनीं सांगितलें. पण हें आश्वासन कधीं, कोणी व कोणत्या स्वरूपांत दिलें तें सांगितलें नाहीं. दिलें असल्यास तें देण्याचा त्याला कितीसा अधिकार पोंचत होता वगैरे गोष्टींचा खुलासा व्हावयास पाहिजे आहे. कोणी कौंसिलचे सभासद कौंसिलांत प्रश्न विचारून तो करून घेईल तर बरें होईल.

## दृष्टींची भिन्नता.

वर लिहिल्या प्रमाणें ब्रिटिश भांडवलवाल्यांना जरी सरकारकडून आश्वासन दिलें गेलें असलें तरी हिंदी लोकांना राज्यकारभारांतल्या मोठाल्या जागा दिल्यानें त्या आश्वासनाचा भंग होईल कशावरून? दुसरी गोष्ट, भांडवलवाल्यांना आपल्या भांडवलाच्या सुरक्षितपणाची जितकी काळजी वाटते, तितकी किंबहुना ज्यास्तच हिंदी प्रजेच्या कल्याणाबद्दल सरकारला वाटावयास नको काय? तशी वाटणें हें नीतिबंधन मोठें कीं ब्रिटिश भांडवलाच्या सुरक्षितपणाबद्दलचें बंधन मोठें ? ब्रिटिश भांडवलवाल्यांची दृष्टि व हिंदी प्रजेची दृष्टि या वर्तीत भिन्न असणारच. पण सरकारानें तरी ब्रिटिश भांडवलापेक्षां प्रजेचें आरोग्य, शिक्षण, आर्थिक, नैतिक, व राजकीय उन्नति इ. गोष्टींची किंमत ज्यास्त मानणें हें त्यांचें कर्तव्य नाहीं काय? हिंदी लोकांच्या हातांत राज्यकारभार गेल्यानें वाईटांत वाईट असा परिणाम खत्रीनें होणार अशी कल्पना केली तरी त्यांत अधिक नुकसान कोणाचें आहे? इंग्रज व्यापाऱ्यांचे नुसते पैसेच बुडतील, पण हिंदी लोकांची सर्वप्रकारें हानि होणार नाहीं काय? इतकें ही असून ते स्वराज्य मागत आहेत तेव्हां हिंदी लोकांना स्वराज्य चालविण्याची खरी हिंमत वाटत आहे असा अर्थ होत नाहीं काय ?

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत महायुद्धसंबंधाच्या विशेष गोष्टी ह्मणजे जर्मन वैमानिकांचे इंग्लंडच्या आग्नेय किनाऱ्यावरचे व लंडनवरचे हल्ले, सर डगलस हेग साहेबांनीं फ्रान्समध्यें हळू हळू पण नेटानें चालविलेली प्रगति, तोफांच्या चकमकी, सप्टेंबर महिन्यांतला लढाईचा आढावा इ. होत. यातच बेनासिझाच्या डोंगरपठारावर शत्रूवर मिळविलेला मोठा विजय आणि मेसापोटेमियाकडे इंग्रज सैन्यानें ता० २८ सप्टेंबर रोजीं मोठ्या निकराची लढाई करून मशेद हें ठिकाण घेतलें, या ही गोष्टी जमेस धरल्या पाहिजेत. जर्मन वैमानिकांचे हल्ले इतके दिवस चालले असतां इंग्रज लोक स्वस्थ कसे बसले याचें पुष्कळांना आश्चर्य वाटत आहे. जर्मनी वैमानिकांचे हल्ले कां पाठवितो, त्यांत त्याला काय लाभ आहे याची अगोदर मीमांसा केली पाहिजे. हे हल्ले पाठविण्याचा उद्देश इंग्लंडच्या सिव्हिलियन लोकांना घाबरवून सोडावें ह्मणजे ते तह करण्याबद्दल सरकाराकडे निकड लावतील असा एक उद्देश सकृद्दर्शनीं दिसतो. दुसरा ही एक त्यांचा उद्देश असेल हें संभवनीय आहे आणि तो हा कीं इंग्रज वैमानिकांना स्वतःच्या देशाच्या किनाऱ्याचें व लंडनचे संरक्षण करण्याचे कामीं गुंतवून ठेविलें ह्मणजे ते वैमानिक जर्मनींत येऊन दारूगोळ्याचे कारखान्यावर बांब टाकून नुकसान करणार नाहींत. हा ही उद्देश वरच्या इतकाच संभवनीय आहे. पण जर्मनी प्रमाणें आपण ही वैमानिक पाठवून जर्मन शहरांचा नाश करावा कीं नाहीं या बद्दल खुद्द इंग्लंडांत आज कित्येक दिवस वाद चालला आहे. जर्मनीनें जरी धर्मयुद्धाच्या सगळ्या नियमांचा भंग केला तरी आपण तो करूं नये असे कित्येकांचें ह्मणणें आहे आणि 'शठे शाठ्यमाचरेत्' या तत्त्वाप्रमाणें वागण्यास हरकत नाहीं असें दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें आहे. या वादामुळें इंग्रजसरकारानें जर्मनीवर वैमानिक पाठवून शत्रूचें नुकसान त्याच्याच पद्धतीनें करावयाचें तें केलें नसावें असें अनुमान करतां येतें. पण जर्मनीनें वैमानिकांचे हल्ले पाठविण्याचा आपला हट्ट असाच चालविल्यास अखेर कांट्यानें कांटा काढण्याच्या राजनीतीचा अवलंब ब्रिटिश सरकारासही करावा लागेल. आतांच तशी वेळ आलेली आहे आणि ही राजनीति लवकरच अंमलांत आलेली दिसेल असें डेली क्रॉनिकल पत्र ह्मणतें.

## फ्रान्सचें रणक्षेत्र.

या क्षेत्रांत तोफांच्या सरबत्तीला केव्हां ही खंड पडलेला दिसत नाहीं. सध्या लढाईचें केंद्र यिप्रेसपाशीं आहे. मेनिन रोडवर जर्मनी वरचेवर हल्ले करीत आहे, आणि तितके वेळा ते हल्ले परतविण्याचें काम इंग्रज मोठ्या बहादरीनें करीत आहेत. लष्करी तज्ञांचें ह्मणणें आहे कीं जशी सॉमची घनघोर लढाई इंग्रजांना अत्यंत श्रेयस्कर झाली, तशीच यिप्रेस जवळची ही होईल. सध्याच्या लढाईंत शत्रूची जबर हानि होत आहे.

व्हर्डुन येथील मित्रराष्ट्रांच्या सैन्याचा पराक्रम लोकांच्या स्मरणांत सदैव ताजा रहावा ह्मणून त्या शहराला बादशहा पांचवे जॉर्ज यांनीं ब्रिटिश झेंडा देणगी दाखल पाठविला. तो ब्रिटिश कॉर्टर मास्टर जनरल सर जॉन कॉवन्स यांनीं देतांना मोठें उत्तेजनक भाषण केलें.

## सप्टेंबर महिन्याचा आढावा.

एकंदरींत सप्टेंबरचा महिना मित्रराष्ट्रांना फार उमेदीचा गेला, आणि शत्रूंना तो तितकाच निरुत्साहकारक झाला. फ्रान्समध्यें ब्रिटिश फौजेवर शत्रू अनेक वेळां तुटून पडले, तरी त्या फौजेनें बिलकूल न डगमगतां शत्रूचे हल्ले परतविले, आणि ब्रिटिश तोफखाना किती उत्कृष्ट आहे याची साक्ष पटविली. या महिन्यांत ब्रिटिशांनीं शत्रूकडचे एकंदर ५२९६ लोक कैद केले. त्यांत १४६ ऑफिसर आहेत. काबीज केलेल्या सामानांत तीन जड व आठ हलक्या तोफा, ५७ खंदकाचे मॉर्टर, व ३१७ यांत्रिक तोफा आहेत.

## इटालियनांचा विजय.

इटलीला आज बरेच दिवस असहाय स्थितींत लढावें लागत आहे, तरी त्यांच्या धैर्याची व शौर्याची कमाल ह्मटली पाहिजे. कारण कीं शत्रूचे निकराचे हल्ले एकामागून एक येत असतां एकटे इटालियन त्यांना परतवीत आहेत. बेनासिझा येथील हल्ले त्यांनीं परतविले इतकेंच नाहीं तर शत्रूकडचे दोन हजारावरील लोक कैद केले. व्हारिडफ्युमो येथें ही त्यांना शत्रूच्या हल्ल्यापासून बराच त्रास झाला, आणि तेथें ही त्यांनीं मोठ्या बहादुरीनें हल्ले परतवून शत्रूकडचा दारूगोळा व स्फोटक द्रव्यें यांची लूट केली.

## रशियांतली गडबड.

रशियांतली अंतःस्थ अशांतता अद्याप नाहींशी झाली नाहीं. त्यांचें डेमोक्रॅटिक कॉन्फरन्स भरलें आहे. या कॉन्फरन्सच्या निकालाकडे सर्वांचे डोळे लागले आहेत. सैनिक व कामकरी प्रतिनिधींच्या

कौंसिलांतल्या जहाल प्रतिनिधीस मॉ० केरेन्स्की यांचें धोरण अगदीं नापसंत आहे. त्यांनीं त्यांच्यावर आपला विश्वास नाहीं अशा अर्थाचा ठराव पास केला आहे. अर्थात् केरेन्झस्की यांना त्या कौंसिलांतल्या आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला आहे. याचा अर्थ राशियांतल्या बहुतेक सर्व लोकांना ते नको आहेत असें मात्र समजण्याचें कारण नाहीं. केरेन्स्की यांना अतिशय जबरदस्त विरोधाला तोंड द्यावें लागत आहे ही गोष्ट खरी आहे, तरी पण सध्याच्या परिस्थितींत सर्व विरोध बाजूला सारून राज्यकारभाराचें तारूं सुखरूपपणें पैलतीराला नेण्याची धमक त्यांच्या इतकी दुसऱ्या कोणांत ही नाहीं हें त्यांचे शत्रुसुद्धां कबूल करीत आहेत. कोसाक हे लढाऊ लोक आहेत. त्यांचा तर राशियांत स्थापन झालेली लोकसत्ता तशीच कायम टिकून राहील असें करण्याचा कृत संकल्प आहे. ते मॉ० केरेन्स्की यांना पूर्ण पाठबळ देतील. शिवाय मॉस्को येथील व्यापारी व कारखानदार यांच्या रास्त मागण्या कबूल करून त्यांना ही आपले बाजूस वळविण्याचें शहाणपणाचें धोरण मॉ० केरेन्सकी यांनीं स्वीकारलें आहे. तेव्हां ते हळूं हळूं लोकप्रीति संपादन करून राशियांत शांतता स्थापित केल्यानंतर शत्रूचा यथेच्छ समाचार घेतील अशी मोठी उमेद वाटूं लागली आहे.

## इतर बातम्या.

चीनमधील गडबड अद्याप चालूच आहे. तेथील लोकपक्षाचे जहाल पुढारी सुन्यत्सेन यांनीं चीनमध्यें लष्करी अंमल चालू केल्याबद्दल तेथील सरकारानें त्यांना पकडण्याचा हुकुम फर्मावला आहे. पण ते हातीं लागतील तेव्हां खरे. चीनांत लोकसत्ता स्थापित झाली, तेव्हां कांहीं काळ पर्यंत हे तेथें प्रेसिडेंट होते. १८९६ सालीं हे लंडनमध्यें पकडले गेले होते, पण ब्रिटिश सरकारच्या मध्यस्थीनें सुटून १९११ पर्यंत अज्ञातवासांत राहिले. पुढें लोकसत्ता स्थापित झाल्यावर ही त्यांच्यावर बंडखोरपणाचा आरोप आला होता; पण बचावले. आतां पुनः त्यांचेवर संकट आलें आहे.

आयर्लंडमधल्या सीनफेन पक्षाचा पुढारी टॉमस ॲश याच्या मरणानिमित्त त्या लोकांची मिरवणूक निघाली होती. ते वेळीं पोलिसांचे अंगावर त्यांनीं दगड फेकले. पोलिसांनीं ही त्यांच्यावर गोळ्या झाडून कांहींना जखमी केलें.

अमेरिकेनें काढलेल्या लिबर्टी लोन नांवाच्या कर्जाच्या दुसऱ्या हप्त्याचे वेळीं ३० कोट डॉलरचें कर्ज पाहिजे होतें. पण तें ५० कोट डॉलर मिळाले.

अमेरिकेंत खाद्य द्रव्याच्या संरक्षणासाठीं जोराची चळवळ चालली आहे.

## मंगल ग्रंथी

### ( उदारचरित त्रयींची जयंति. )

गेला सोमवार ह्मणजे आक्टोबर १ ही तारीख तिघा राष्ट्रवीरांच्या वाढदिवसाची होती आणि त्या मंगल दिवसाच्या निमित्तानें शहरोशहरीं अभिनंदनाच्या सभा भरल्या होत्या. डॉक्टर सर सुब्रह्मण्य आयर यांच्या ७६ व्या वर्षाला, श्रीमती बिझांट देवी यांच्या ७१ व्या वर्षाला व सत्याग्रहाचे पुरस्कर्ते राजश्री गांधी यांच्या ५० व्या वर्षाला या तारखेस प्रारंभ झाला आहे. आकोल्याच्या त्या दिवशींच्या सभेंत राजश्री मोरोपंत परांजपे, वासुदेवराव चिपळूणकर, विनायकराव राजवाडे व नामदार राजश्री रामभाऊ महाजनी यांनीं आपापल्या भाषणांत वरील तिन्ही वक्तयांचे जे राष्ट्रावर उपकार झालेले आहेत त्यांचें स्मरण देऊन त्यांच्याच पुण्यप्रतापाच्या प्रकाशांत भावी मार्ग कसा सुखसेव्य होईल हें उत्कृष्ट प्रकारें सांगितलें. सार्वजनिक कर्तव्याविषयीं ही सांप्रतची जागृती पाहून कोणाही सहृदय मनुष्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहिल्यावांचून राहणार नाहींत.

## ऐक्याची ध्वजा.

कलकत्त्याच्या स्वागत कमिटीमध्यें जी विलक्षण फूट व दुही माजली होती व जिला मुंबईच्या कांहीं मंडळींनीं जोर आणला होता ती सर्व राष्ट्रभक्तीच्या खऱ्या प्रेमरसानें एकदम लयास गेली आणि तारीख ६ च्या ऑल इंडिया कांग्रेसच्या अलाहाबाद येथील सभेला अध्यक्ष निवडण्याचा प्रश्नच राहिला नाहीं. ही गोष्ट इंडियाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्या सारखी आहे. रायबहादुर वैकुंठनाथ सेन हे तपोनिधी स्वागत कमिटीचे अध्यक्ष व श्रीमती बिझांटबाई याच राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होतील ही एकच शुभवार्ता सर्वांचीं अंतःकरणें आनंदमय करून सोडील.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—टोकिया शहरीं ज्या अश्रुतपूर्व तुफानानें लक्षावधि लोक गृहहीन होतात त्याच तुफानाची मंद होत चाललेली लाट आपल्या देशांतही पर्जन्याचा अतिरेक करीत आहे कीं काय नकळे! सध्या पावसानें त्राहि त्राहि करून सोडलें आहे. एकंदर पाणी २८ इंचावर झालें. हवेंतली गर्मी, आकाशांतलीं अभ्रें व सूर्यास्ताच्या वेळचे क्षितिज वर्ण हीं पर्जन्याचा जोरच दाखवितात. पिकांची व मनुष्यांच्या शरीरांचीं आरोग्यें अर्थात् कमी समाधानकारक आहेत.

**प्लेग**—आकोलें शहरीं उंदरांचा सुळसुळाट अधिक दिसतो व प्लेगाचे तुरळक मृत्यूही झाले. गेल्या २९ सप्टेंबर अखेरच्या सप्ताहांत आकोला, बार्शीटाकळी, वाशिम कारंजा, पातूर, बाळापूर, मूर्तिजापूर व इतर खेडीं मिळून २७७ प्लेगाचे मृत्यू झाले. उमरावती जिल्ह्यांत उमरावती, बडनेरा, मोर्शी, चांदूर, मंगरूळ व इतर खेडीं मिळून हेंच मृत्यूचें प्रमाण १३३ होतें. यवतमाळ जिल्ह्यांत २९ मृत्यु असून यवतमाळ व दिग्रस येथें प्लेगाचा जोर आहे. बुलडाणे जिल्ह्यांत प्लेगाचा आजार सौम्य असून एकंदर मृत्यु ३२ आहेत.

लेफ्टनेंट कर्नल टी सी. ब्रावडन रजिस्ट्रेशन खात्याचे इन्स्पेक्टर जनरल यांस ९ महिन्यांची फर्लो व हक्काची रजा देण्यांत आली आहे.

रा. रा. दत्तात्रय बासुदेव गोखले ऑफिशिएटिंग इन्स्पेक्टर रजिस्ट्रेशन खातें पश्चिम वऱ्हाड यांस चालू महिन्यांपासून त्याच जागीं कायम करण्यांत आलें हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. भूपेंद्रनाथ घोष सबार्डिनेट जज्य यांची रजा संपतांच ते बुलडाणे येथील कोर्टावर दाखल होतील.

रा. रा. दामोदर अनंत गडबोले आफिशिएटिंग डेपाटि इन्स्पेक्टर वाशीम यांस आकोट रेंजला बदलण्यांत आलें.

रा. रा. गोपाळ सदाशिव सप्रे मुनसफ यांस उमरावतीस नेमण्यांत आलें.

नोव्हेंबर तारीख १ रोजीं व त्यानंतर ७ तारखेपर्यंत डिपार्टमेंटल परीक्षा नागपुरास होतील.

**युद्धकर्ज**—मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून २०७६६४७६ एवढी रक्कम वॉरलोनकडे २२ सप्टेंबर पर्यंत जमा झालेली आहे. या पैकीं पोस्टा कडील कर्जरोखे १३१८६३७६ रुपयांचे आहेत.

**त्रोटक योजना** – वारलोनचीं पोस्टल सर्टिफिकीटें दाखल केलीं असतां पोस्ट ऑफीस पैसा चुकविते असें सरकारांतून जाहिर झाल्याबरोबर पोस्ट ऑफीसाकडे कांहीं लोक गैरसमजुतीनें पैशाची मागणी करण्याला जातात. ज्यांनीं युद्धकर्ज दिलें आहे यांनीं आपलीं कर्जें परत मागूं नयेत. गरीबीच्या अनिवार्य कारणासाठीं आणि पोस्टल सर्टिफिकीटांचा दुरुपयोग होऊं नये ह्मणून पैसे परत देण्याची सरकारनें योजना केली आहे. ही त्रोटक व्यवस्था आहे हें कोणी विसरूं नये.

**आभार**—मध्यप्रांताच्या सरकारनें श्रीमती बिझांटबाईच्या संबंधाची आपली बंदी काढून घेतली याबद्दल सर्व प्रांत त्यांचा ऋणी आहे, आणि पुढील आठवड्यांत बाईंची स्वारी नागपूर मार्गानें मुंबईला जाणार आहे तेव्हां सहजीच दर्शन लाभ होईल.

**पैसाफंड**:— माहे आगष्ट व सप्टेंबर मधील पैसा फंडाची पोंच.

| माहिना | जमा |
|---|---|
| आगष्ट | ९॥=॥। |
| सप्टेंबर | २२।-॥। |
| | ३२४८॥ |

या पैकीं ।- ( पांच आणे ) रा. अभ्यंकर वकील यांजकडून आलेले असून बाकीची रक्कम रा. रत्नाकर यांनीं फंडाची पेटी फिरवून जमा केलेली आहे.

## नोटिस

नोटीस बेशमी सिताराम आत्माराम पाटील मुक्काम वर्धा

यांसः—

खालींल सही करणाराकडून नोटीस देण्यांत येते कीं, मुक्काम नागपूर येथें तारीख १२।८।१७ रोजीं तुह्मी आमचे जवळून ६० रुपये साठ उसणे घेतले. घरी गेल्यावर लवकरच रुपये आणून देतो ह्मणून ह्मणाले; परंतु आपण रुपये आणून दिले नाहींत. आह्मी नागपूर येथें तुमची पुष्कळ वाट पाहिली. शिवाय जानेफळाहून ही रुपये पाठविण्यासंबंधानें ता० ३१।८।१७ व १२।९।१७ रोजीं दोन पत्रें पाठविली. आपण रुपये ही पाठविले नाहींत व पत्राचा जबाब ही दिला नाहीं. करितां या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत रुपये ६० व्याजासह व नोटिसीचे खर्चासह मानिआर्डरनें पाठवावे. न पाठविल्यास रितीप्रमाणें कोर्टांत दावा करून रुपये ६० साठ व्याजासह आणि कोर्टाच्या व नोटिसीच्या खर्चासह वसूल केले जातील. कळावें ही नोटीस ता० ३।१०।१७ इ.

सही

कोंडापा तुकाराम आपा मिटकरी
दुकान जानेफळ द. खुद.

नो० नं० ४२४

## जाहीर नोटीस

नोटिस बेशमी मुक्ती मर्द संपत रा. उंद्री ता. चिखली जि. बुलडाणा हल्लीं रा. दिवठाणे ता. खामगांव जि. बुलठाणा मी जाहीर नोटिस देते ऐसाजे कीं माझा नवरा मरून सरासरी चार महिने झाले. त्याचा कोणी सख्खा वारस नसल्यामुळें मी दिवठाणे येथें आले व बळीराम वा॥ दर्याजी यांचा वडील मुलगा नामें दौलत यांच्यापाशीं मी गंधर्व विवाह भाद्रपद व॥ १० रोज बुधवारीं करणार आहे. माझ्यावर कोणाचा हक्क नाहीं. गंधर्व लागल्यावर दौलत हे माझे सर्वस्वी धनी होतील व त्यांनी केलेली आज्ञा मी मान्य करीत जाईन. या गंधर्व लावण्याचे कामांत कोणी आडथळा आणूं नये. आणल्यास त्यास मी जबाबदार धरीन. कळावें. ता. ७।१०।१९१७ दस्तुर उमरावसिंग वा॥ गुलाबसिंग द० खुद रा. दिवठाणे

सही

मुक्ती मर्द संपत नि॥ खु० आंगठा

नो० नं० ४२९

## नोटीस.

विद्यमान सब जज्ज साहेब यांचे कोर्ट मु॥ खामगांव

स. स. नं. १० सन १९१७

अर्जदार

१ भुलाबाई }
२ बनाबाई } मर्द दल्वा पाटील राहणार पिंपळगांव ता. खामगांव

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं, दल्बा वा॥ परसराम पाटील हे ता० ६।१२।१९ रोजीं पिंपळगांव ता. खामगांव मु॥ मयत झाला त्यास पुत्र संतान नसल्यामुळें व अर्जदार नं. १-२ ह्या त्याच्या बायका असल्यामुळें त्यांनीं असाम्याकडून कर्ज वसूल करून घेण्या करितां या कोर्टांत अर्ज दाखल केला आहे. तरी या बद्दल विरुद्ध पक्षकार गंगाबाई मर्द परशराम पाटील रा. पिंपळगांव नाथ ता. खामगांव पुताबाई मर्द सुकदेव कुणबी रा. ढोरपगांव ता. खामगांव शंकर वा॥ दवलत पाटील रा. पिंपळगांव नाथ व इतर कोणास या सर्टीफिकेट मिळण्याबद्दल तक्रार करणें असल्यास त्यांनीं नेमलेल्या तारखेस ह्मणजे १०।११।१७ रोजीं या कोर्टांत स्वतः येऊन हजर राहावें. आज ता. २८।९।१७

सही
R. M. Wathodkar
Sub Judge
Khamgaon

नो० नं० ४२३


## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हार्मोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर–हात पेटी सिंगल रीड २० ते २५
" डबल रीड ३०-३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५.
पाय पेटी सनक ३। ६० ते ८० रु
" " " ३॥ ८५ ते ९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु)
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बोसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा

नो. नं. २८४

अंगुरी
# हिंग.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३५, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पैंड, सेबाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५

नो० नं० ९

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील राहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रातिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४ हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H. L. Batliwala
Sons & Co. Ltd.
N. N. 6 Dadar Bombay

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गायांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन

कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.
डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स
पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

गरीबांस फुकट
## रामबाण मलम
( कोणत्याहि त्वग्रोगावर )
गुणकारी किं. ६ आणे.

## केशनाशक पूड.
( ९ आणे )
(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर. मुळे नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०

## रोल्डगोल्ड सोन्याचे
कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३-४; गोट जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-५. शिप्याचें मोतीं ल्हान मोठे वाटेल तसें. सराची २-३-४; अंगठी १; मळे अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी गिरगांव– मुंबई

नो० नं० ५

ॐ नमः श्रीगणेशाय.

## आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.

**मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धिवर्धक, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता गर्भासंबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मूत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट परमा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशाक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६१ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचे सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगांस हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना परमा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची लाला, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्हा० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रीची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत याशिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुंगधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमा कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो०-हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

जर्मनशाहीच स्वैर वर्तन करीत आहे आणि फ्रान्साचा दृष्टिकोन मात्र वैयक्तिक स्वातंत्र्याला खुला दरवाजा ठेवून राष्ट्राची घटना करूं पहात आहे. इंग्लंडचा इतिहासच सांगतो कीं ब्रिटिश राज्यशकट जुन्या रूळावर चालूं आहे आणि नव्या जुन्या कल्पनांचें संमिश्रण इंग्लंडांत होईपर्यंत प्रस्तुतच्या क्रांतीकालांत फ्रान्स सारखेंच राष्ट्र पुष्कळशा गोष्टी एकदम घडवून आणील आणि जगाला निराळे अनुभव व निराळें वळण लावून देईल. फ्रान्सची १८ व्या शतकांतलि लुइच्या वेळची राज्यक्रांति जगाला चकित करून सोडणारी होती, पण ती जशी यशस्वी व्हावयाला पाहिजे होती तशी झाली नाहीं. त्यावेळीं त्या शतकांत जे प्रयत्न फसले ते आतां पुनः ज्या त्या सुधारलेल्या लोकांची त्यांचीं त्यांचीं स्वराज्यें नव्या उन्नतीच्या श्रीसकट प्राप्त करून देतील आणि व्यक्तींचीं स्वातंत्र्यें खरीं जिवंत राहिलीं तर राष्ट्रें कशीं जिवंत व प्रगमनशील बनतात हें या ग्रंथकाराच्या मतें फ्रान्स राष्ट्र जगाला शिकविणार आहे. आतां जें प्रचंड महायुद्ध जगांतील सर्व चांगल्या चांगल्या गोष्टींना गिळंकृत करून टाकूं पहात आहे त्याच्या मूळ शीं व्यक्तींचें जीवन स्वातंत्र्य रसातळास नेणाऱ्या राष्ट्राराष्ट्रांचें प्रभुत्व सर्व मानवी सुधारणेच्या संस्कृतीला हद्दपार करून सोडीत आहे. हे उद्गार ऐकून आमच्या राज्यकर्त्यांना निराळी राजकीय दृष्टी प्राप्त होईल आणि त्यांचे गतानुगतिक दोष व व्यावहारिक शहाणपणाच्या नांवाखालीं मिरवणारी परंपरा हीं चलन पावतील तरच या प्रस्तुतच्या अदृष्टपूर्व संक्रमणाच्या कालीं ब्रिटिश साम्राज्याचें वैभव स्थीर राहण्याचा संभव आहे. सांप्रतच्या शीघ्रगमनाच्या कालाला ब्रिटिश राजकीय धोरण अगदीं कुचकामाचें आहे आणि त्याच धोरणाचें प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे हिंदुस्थानांतील सरकारी सिव्हीलियनशाही आणि लोकपक्ष यांच्या मधील चालू वादांत पडलेला सुधारणेचा झगडा होय. राज्यकर्ते या प्रसंगीं आपल्या स्थूलबलानें लोकपक्षाला उत्तरोत्तर जित पराजित करून नामशेष करण्याचा प्रयत्न चालू ठेवितील तर या नव्या घटनेच्या प्रसंगीं आम्हास फ्रेंच राष्ट्राच्या मध्यस्थीनें किंवा पंचाइतीनें ब्रिटिश राष्ट्राला खरी संस्कृती दर्शवून नवी राजनीती बदलण्याला भाग करावें लागेल. जेथें इंडियांत सरकारी पक्ष व लोकपक्ष असे एकमेकापासून विचाराच्या क्षेत्रांत इतके दूरवर जाऊन पडतात कीं हल्लीं इंडियांतील ब्युरोक्रसी ही पार्लमेंटाच्या हुकूमान्वयें इंडियन लोकांचे मालक नसून इंडियन लोकांचे सेवक आहेत ही गोष्ट झणझणीतपणें प्रस्थापित करण्यासाठीं सर्व राष्ट्रभर चळवळ चालू आहे. हल्लींची दडपशाही ही कितीही राज्यकर्त्यांस पायाशुद्ध वाटो; पण तिच्याच पायांत ही ब्युरोक्रसी म्हणजे लोकपक्षाचे सेवकगण असून हिनें लोकानुरंजन होईल अशाच पद्धतीनें वागलें पाहिजे असा पार्लमेंटाचा अखेर हुकूम निघाल्याशिवाय इंडियांतील राजकीय युद्ध संपणार नाहीं. स्वराज्यासाठीं जेथें इंडियन लोक आपल्या राज्यकर्त्यांकडे धाव घेत आहेत तेथें तें प्रस्थापित होईपर्यंत राज्यकर्त्यांच्या मागचें हें प्रचंड महायुद्ध यशस्वी होईल अशी आम्हास कोणत्याही दिशेनें आशा दिसत नाहीं. न्यायकोर्टांतलें एक तत्व आहे कीं जो आपल्याला न्याय द्या म्हणून म्हणतो त्यानें आपल्या स्वतःचे दोष दूर करून नंतर न्यायाची पायरी चढावी. तद्वत् दीडशें वर्षांच्या राज्यकारभारानंतर ही जेथें इंडियास स्वराज्य देण्याचें आमच्या राज्यकर्त्यांस इष्ट दिसत नाहीं तेथें त्यांची ती जर्मन दृष्टी क्षियाच्या वाटा कधींही साफसूफ करूं शकणार नाहीं. इंडियाला स्वराज्य द्या म्हणजेच त्या सत्कृतीनें पुनीत होणाऱ्या ब्रिटिश साम्राज्याला बेलज्यमचें स्वातंत्र्य परत संपादून देण्याचें ईश्वरी सामर्थ्य येईल, आणि युद्धाच्या अग्निशुद्धीनें उज्वल व सुसंस्कृत होत चाललेलें ब्रिटिश अंतःकरण आमच्या मातृभूमीची ही प्रार्थना ऐकण्याला लौकर सत्पात्र होईल.

## कांग्रेस आणि मुस्लीम लीग.

कांग्रेस आणि मुस्लीम लीग यांचें संयुक्त कॉनफरन्स ता. ६ रोजीं अलाहाबाद येथें झालें. मि. सुरेंद्रनाथ बॅनरजी हे अध्यक्ष होते. त्यांनीं प्रथम मिसेस बिझांटबाईच्या मुक्ततेबद्दल त्यांचें अभिनंदन करून ही मुक्तता कायदेशीर चळवळीचा मोठा विजय आहे तशीच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मुत्सद्दीगिरीची उत्तम साक्ष आहे असें सांगून नंतर यंदाची कांग्रेस कलकत्त्यास मिसेस बिझांट यांच्या अध्यक्षत्वाखालीं होईल असें जाहिर केलें. यानंतर मुंबईस झालेल्या ठरावाप्रमाणें सत्याग्रहाच्या प्रश्नासंबंधानें सर्व प्रांतिक कांग्रेस कमिट्यांकडून आलेले अभिप्राय वाचून दाखविले. मि. मांटेग्यु यांच्या आगमनामुळें तूर्त हा प्रश्न वगळावा असाच सर्वांचा अभिप्राय पडल्यामुळें तो प्रश्न वगळण्यांत आला. यापुढें मि. मांटेग्यु व व्हाइसराय यांचेकडे कांग्रेसकडून ३७ जणांचें एक डेप्युटेशन पाठविण्याचा ठराव ना. मि. जिना यांनीं पुढें आणिला. कांग्रेस आणि लीग यांच्या संयुक्त विचारानें ज्या मागण्या करण्याचें ठरलें आहे त्या मागण्या अर्जांत लिहून व त्यावर लाखों लोकांच्या सह्या घेऊन डेप्युटेशननें तो वरील अधिकाऱ्यांस सादर करण्याचें ठरलें. या डेप्युटेशनची सगळी व्यवस्था करण्याचें काम मि. सुब्राव, मि. वझीर हुसेन व मि सी. पी. रामस्वामी आयर यांचेकडे सोंपाविण्यांत आलें. कांग्रेसच्या मागण्यांचें पत्रक तयार करण्याचें काम एका कमिटीकडे देण्यांत येऊन ना. मि. चिंतामणि यांना त्या कमीटीचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें; व मि. महमदअली हे डेप्युटेशनमध्यें असावेत असें ही ठरविण्यांत आलें. यानंतर मिसेस बिझांट यांनीं असा ठराव आणिला कीं मि. महमदअली व मि. शौकतअली यांच्या संबंधानें उपलब्ध असलेल्या माहितीवरून ते राजद्रोही दिसत नसल्यानें व सध्यांचा असंतोष दूर करण्यास त्यांची मुक्तता करणें अवश्य असल्यानें सरकारनें त्यांना मुक्त करावें अशी या संयुक्त कॉनफरन्सची आग्रहपूर्वक प्रार्थना आहे. या मुक्ततेनें मुसलमानांच्या राजनिष्ठेची मात्रा वाढेल. विशेषतः सिनफेनरची सुद्धां मुक्तता सरकारनें केली आहे, तेव्हां सदर बंधूंची मुक्तता होणें अवश्य आहे. याप्रमाणें ठराव केल्यावर कॉन्फरन्सचें काम संपलें.

## ऑल इंडिया कांग्रेस कमिटी

हिची बैठक ही त्याचवेळीं मि. सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे अध्यक्षत्वाखालीं झाली. यंदाच्या कांग्रेसच्या अध्यक्षाच्या निवडणुकीचा प्रश्न कलकत्याच्या स्वागतमंडळीच्या चेअरमनाकडून कमिटीकडे निकाला करितां आला होता, पण त्या बद्दलचें पत्र सदर चेअरमन यांनीं मागें घेतल्यामुळें आतां त्या प्रश्नाचा विचार करावयास नको व मिसेस बिझांट ह्याच यंदाच्या अध्यक्ष ठरल्या असें जाहिर करण्यांत आलें. यानंतर मिसेस बिझांट यांनीं एक नवीच ठराव पुढें आणिला. तो असा होता कीं हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकार हिंदुस्थानांतल्या लोकांच्या स्वातंत्र्याचा अपहार करणारे कायदे करण्यानें त्यांना देण्यांत आलेल्या सत्तेचा दुरुपयोग करीत आहेत कीं काय या प्रश्नाची चौकशी करण्यासाठीं एक पार्लमेंटरी कमिशन नेमण्याची तजवीज करावी अशी विनंति स्टेट सेक्रेटरीस करण्यात यावी. हा ठराव पास झाल्यावर कमिटी बरखास्त झाली.

## हिंदुस्थानचें हौस ऑफ कॉमन्स.

उमरावतीचे सुप्रसिद्ध नागरिक रा. ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनीं हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत एक नवी सुधारणा सुचविली आहे. ज्या ठिकाणीं लोकसत्तेचें प्राबल्य आहे अशा पाश्चात्य देशांतून पार्लमेंटसारख्या संस्था स्थापित झाल्या आहेत, व या संस्थांत सभासद म्हणून प्रतिनिधि निवडून देण्याचा हक्क सामान्य लोकांना त्यांचे धंदे वगैरेंचा विचार न करतां दिलेला आहे. या संस्थेला हौस ऑफ कॉमन्स म्हणतात. असें हौस ऑफ कॉमन्स हिंदुस्थानांत निर्माण केलें असतां राज्यकारभारांत आपलें अंग आहे असा अभिमान प्रत्येक हिंदी माणसास वाटेल, आणि त्या बरोबर जबाबदारी ही कळूं लागेल. ज्याप्रमाणें आयर्लंडांत, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत ही अशी संस्था निर्माण करण्याची फार अवश्यकता आहे असें रा ब. चें मत आहे. त्यांनीं असें सुचविलें आहे कीं या नव्या संस्थेंत निदान ४० ते ५० सभासद असावे, व ते पुढील संस्थांनीं निवडून द्यावे—(१) हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या कायदेकौंसिलांतले बिनसरकारी सभासद यांनीं एकपंचमांश; (२) हिंदुस्थानांतलीं मुख्य मुख्य शहरें; (३) जमीनदार; (४) आयात व निर्गत व्यापार करणारे व इतर व्यापारी; (५) मोठाले कारखानदार; व (६) युनिव्हर्सिट्या. या संस्थांनीं कोणत्या तत्त्वावर सभासदांची निवडणूक करावयाची, मत देण्याचा हक्क कोणास द्यावयाचा, निवडणूक कशा रीतीनें करावयाची वगैरे खुलासा रा. ब. मुधोळकर यांनीं अद्याप केला नाहीं. पण मूळ तत्त्वाची गोष्ट मान्य झाल्यास हा तपशील तयार करतां येईल. यंदाच्या कांग्रेसनें हा विषय हातीं घेण्यासारखा आहे.

## खाजगी शाळा.

हिंदुस्थानांत खाजगी शाळांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे ही गोष्ट गंभीरपणें विचार करण्यासारखी आहे असें आम्हांस वाटतें. सरकारी रिपोर्टांतले आंकडेच याची साक्ष देत आहेत. १९११-१२ सालीं खाजगी शाळांची संख्या ४०१२१ होती ती १९१५-१६ सालीं ३८२४६ झाली. ही संख्या इतकी कमी होण्याचें कारण शाळांवर देखरेख ठेवणाऱ्या सरकारी इन्स्पेक्टरांचा फाजील कडकपणा हें होतें, किंवा लोकाश्रयाचा अभाव, शिक्षणाचा हलका दर्जा व मुलांच्या पालकांचा गैरविश्वास वगैरे कारणें झालीं तें कळण्यास मार्ग नाहीं. पहिलें कारण असेल तर एकट्या सरकारी इन्स्पेक्टरांकडे खाजगी शाळांची तपासणी करण्याचें काम देण्याचे ऐवजीं सरकारी इन्स्पेक्टर व स्थानिक खाजगी बिनसरकारी गृहस्थ यांची कमिटी नेमून तिच्याकडे हें काम सरकारानें सोपवावें. इंग्लंडमध्यें अशीच व्यवस्था आहे, व तशा प्रकारची व्यवस्था इकडे कां सुरू होऊं नये तें कळत नाहीं. लायक शिक्षकांच्या अभावामुळें लोकांचा विश्वास खाजगी शाळेवर बसत नसेल तर अमुक एक परीक्षा पास झाल्याशिवाय त्याला कोणत्या ही खाजगी शाळेंत शिक्षक नेमूं नये असा कांहीं तरी नियम सरकारी अधिकारी व बिनसरकारी गृहस्थ यांच्या संयुक्त परिषदेनें ठरवून सरकारानें तो अमलांत आणावा. द्रव्याचे अभावीं शाळांची संख्या कमी झाली असेल तर लोकांना शिक्षणाची खरी किंमतच अद्याप कळूं लागली नाहीं असें म्हणावें लागेल. पण ही गोष्ट आम्हांस संभवनीय दिसत नाहीं, कारण कीं सरकारी शाळांतून विद्यार्थ्यांची इतकी गर्दी झालेली दिसते कीं विद्यार्थ्यांची संख्या मर्यादित करावी लागली आहे कांहीं ही असो. खाजगी शाळा चालल्या पाहिजेत व त्या उत्तम रीतीनें चालाव्या म्हणून लोकांनीं स्वार्थत्याग करण्यास व सरकारी अधिकाऱ्यांनीं तपासणीचे वेळीं फाजील कडकपणा न ठेवण्यास शिकणें जरूर आहे.

## महायुद्धाची प्रगति.

अलीकडे घडलेल्या कित्येक गोष्टींनीं इंग्रज लोकांचा युद्धाविषयींचा उत्साह द्विगुणित झालेला दिसतो. अशा गोष्टींत अग्रस्थान जनरल स्मट्स् यांच्या भाषणाला दिलें पाहिजे. जनरल स्मट्स् हे योद्धे आहेत, मुत्सद्दी नाहींत. त्यांना लष्करी डावपेच व युद्धाची स्थिति स्थूलमानानें जशी कळेल, तशी इतरांना कळणें शक्य नाहीं. वॉर क्याबिनेटचे ते सभासद ही आहेत, व शिवाय स्पष्टवक्ते आहेत. त्यांच्या व मि. लॉइड जार्ज यांच्या भाषणाचा मतलब एकच असला—आणि तो हाच कीं इंग्रजांना सध्याची स्थिति अत्यंत अनुकूळ व उत्तेजनकारक आहे— तरी अशा विषयांत मुत्सद्यापेक्षां खऱ्या वीराचे शब्द अधिक प्रमाण मानिले पाहिजेत येवढें लोकांना समजतें. त्याच्या भाषणाची साक्ष पटविणाऱ्या गोष्टी ही एकीमागून एक घडत गेल्यामुळें लोकांची त्यांच्या शब्दावरची श्रद्धा दृढ झाली आहे. मार्शल हेग हे फ्लांडर्स

रणभूमीवरचीं एकामागून एक ठाणीं शत्रूच्या हातून सोडवीत चालले आहेत. पश्चिम रणक्षेत्रावर ब्रिटिशांचा जो नुकताच मोठा विजय झाला त्यामुळें त्यांची श्रेष्ठता आतां निर्विवाद प्रस्थापित झाली आहे. गतवर्षीच्या उन्हाळ्यापासून जर्मन शत्रूला एकसारखे पराजयच मिळत गेले आहेत; आणि मित्रराष्ट्रांच्या सैन्याकडून जर्मनीला सारखा धरमधक्का बसत आहे. शत्रूची चिकाटी जबर म्हणूनच त्यानें इतके दिवस टिकाव धरला आहे. पण आतां ज्यास्त दिवस टिकाव धरून राहणें त्याला अशक्य आहे.

## जर्मनीची स्थिति.

जर्मनीची सध्याची स्थिति 'ऊपरसे खूप बनी, अंदरकी बात राम जाने' या हिंदी म्हणी सारखी झालेली आहे. जमीनीवरच्या लढाईत सारखें अपयश येत चाललेलें पाहून सबमरीननें ब्रिटिश जहाजांचा नाश करून भेवडावण्याची युक्ति कांहीं दिवस साधली. पण अलीकडे ती ही निष्फळ झालेली दिसूं लागतांच आतां सबमरीनचें नांव सुद्धां निघत नाहीं. अलीकडे विमानांतून बांब टाकून इंग्लंडच्या किनाऱ्यावरच्या लोकांना भेववण्याचा प्रयत्न त्यानें करून पाहिला, पण तो ही फसला. त्यानें भिऊन इंग्रज लोकांनीं इंग्रजी मुत्सद्यांना सळो कीं पळो करून सोडलें तर नाहींच, पण उलट मात्र परिणाम झाला. म्हणजे ब्रिटिश सिंह वैमानिक हल्ल्याला तुच्छ समजून स्वस्थ निजलेला होता तो मात्र जागा झाला, आणि 'शठे शाठ्यं समाचरेत्' या वाक्याचा अंगीकार करण्याचा निश्चय जो इतके दिवस डळमळीत होता तो मात्र पक्का झाला याप्रमाणें जर्मनीचे बेत सर्व बाजूंनीं फसून डाव उलट त्याच्याच अंगावर आला. इतके दिवस युद्धाच्यापायीं किती शिपायांचा संहार होतो याविषयीं शत्रु बेगुमान होते. पण असें किती दिवस चालणार. लाखों प्राणांची निष्कारण आहुति दिल्यावर आतां त्या प्राणांची किंमत त्याला कळूं लागली आहे. आतां पिछेहाट चाललेली पतकरली, पण निष्कारण दुसऱ्याचे जिवावर उदार होऊन धाडस करावयाचें नाहीं असें धोरण जर्मनीनें स्वीकारलेलें दिसतें.

## अमेरिकन विमानें.

जर्मनी वैमानिक हल्ले करून मित्रराष्ट्रांना सतावीत आहे हें पाहून अमेरिकेनें विमानें बांधण्याचें काम झपाट्यानें चालविलें आहे. परवाच अमेरिकेच्या युद्धमंत्र्यानें जाहिररीतीनें सांगितलें कीं आम्ही निरनिराळ्या जातींचीं वीस हजार विमानें बांधीत आहों, व तीं चालविणारे वैमानिक ही शिक्षण देऊन तयार करीत आहों. ही जंगी मदत मिळाल्यावर मित्रराष्ट्रांच्या श्रेष्ठतेबद्दल खुद्द शत्रूला सुद्धां शंका राहणार नाहीं. इकडे ब्रिटिश लोकांचीं ही विमानांची संख्या वाढविण्याची व जर्मनींत जाऊन तेथील शहरें उध्वस्त करण्याची तयारी सुरू आहे. सारांश, जर्मनीचे भाग्याला आतां उतरती कळा खास लागली आहे.

## रशिया.

गेल्या दोन तीन महिन्यांपासून रशियाची अंतःस्थिति बिघडल्यामुळें त्याच्याकडून मदत मिळेल अशा विषयीं मित्रराष्ट्रांतल्या लोकांच्या तोंडून निराशेचे उद्गार ऐकूं येतात. पण ही निराशा निराधार आहे असें रशियन प्रेसब्युरो सांगत आहे. त्याचें म्हणणें असें आहे कीं जर्मन लोक राज्यक्रांतीच्या वेळेपेक्षां आतांच रशियामध्यें ज्यास्त आहेत व शत्रूचा तोफखाना ही वाढला आहे असें असून रशियानें आपली बाजू संभाळली आहे इतकेंच नाहीं तर उत्तरेकडे रशिया निकरानें शत्रूंशीं झगडत आहे. रिगा घेतल्यानंतर जर्मनीचें पाऊल थोडेंसे सुद्धां पुढें पडलें नाहीं. शिवाय रशियांत आपलें सैन्य नेल्यास न जाणो राज्यक्रांतीचें वारें त्या सैनिकांत संचरेल कीं काय अशी ही भीती कैसरला वाटत असली पाहिजे. म्हणून पेट्रोग्राडवर चाल करून जाण्याचे ऐवजीं रूमानियावर चाल करण्याची म्याकेनसन याची तयारी चालली आहे असें म्हणतात. आपण रशियावर चाल केल्यास रशियांतील फूट नाहींशी होऊन भिन्नभिन्न पक्ष एक होतील त्यापेक्षां आपण त्यांच्या वाटेस न जातां त्यांनाच परस्पराचे गळे कापूं द्यावे असें ही कदाचित् कैसरचें धोरण असेल. रशियांत सध्यां विलक्षण दुफळी माजली आहे. इतकी कीं रशियांत सोसीयालिस्ट लोकांचीच सबंध क्याबिनेट झाल्यास आपण आपल्या जागेचा राजीनामा देऊं अशा धाक दाखविणें मॉ० केरेंझस्की यांस भाग पडलें. यावरून तेथील स्थितीची कोणाला ही कल्पना करतां येईल.

## मेसोपोटेमियांतील हालचाल.

या रणक्षेत्रांत लवकरच मोठी धामधूम होईल असें सर्वांना वाटत आहे. जनरल मॉड या रणभूमीवर फार उत्कृष्ट कामगिरि बजावीत आहेत. रामेडी येथें त्यांनीं नुकताच जो विजय संपादन केला त्यामुळें बगदादवर शत्रु हल्ला करील ही भीती पुष्कळच कमी झाली आहे. ही भीती यापुढें किती निराधार झाली आहे तें जरी सांगतां आलें नाहीं, आणि फाल्केन हेन यांनीं जरी बगदादवर चाल केली तरी त्यामुळें ज० मॉडच्या विजयाची किंमत कमी होणार नाहीं.

## जर्मन पूर्व आफ्रिका

गेल्या सप्टेंबर महिन्यांत बेलज्यन लोकांनीं ताबरा हें ठिकाण घेतलें तेव्हांच या प्रदेशाच्या उत्तर भागांतील जर्मनीची सत्ता उठून पडली, आणि जेव्हांपासून ब्रिटिश व बेलज्यन हे जर्मनांना घेरून टाकण्याचा यत्नांत आहेत. रुफिगी नदीच्या त्रिकोणांतून जर्मनलोकांना मागेंच हाकून लावण्यांत आलें. ब्रिटिशांनीं तंबा नदी ओलांडली व शत्रूला पेंचांत धरलें हां होतें, पण ब्रिटिशाची डावी बाजू थोडी लंगडी पडल्यामुळें शत्रु निसटून गेला. पुढें झालेल्या गोष्टींचा तपशील देणें कंटाळवाणें होईल. पण इतकें सांगितलें म्हणजे पुरे आहे कीं आतां ईस्ट आफ्रिकेंत जर्मनांच्या हातांत महत्त्वाचीं ठिकाणें माहेज, लिवेल व मासासे हीं तीनच राहिलीं आहेत, बाकीची सगळीं ब्रिटीश व बेलज्यन यांनीं घेतलीं. आतां जर्मन लोकांना या प्रांतांतून पळण्याची इतकी घाई झाली आहे कीं रणांगणावर साधारण जखमी झालेल्या शिपायांना सुद्धां ते टाकून जऊं लागले आहेत! यावरून काय अनुमान काढावयाचें तें सांगावयास नकोच

## प्लेग व उंदीर.

१९१६ च्या आरोग्याच्या वार्षिक रिपोर्टांत प्लेगासंबंधीं बरीच चर्चा आहे आणि आज पर्यंतचा अनुभव त्यांत संकलित केलेला आहे. लोकांचा व पुष्कळशा डॉक्टरांचा समज असा आहे कीं प्लेग व उंदीर यांचा अन्योन्य संबंध फार विलक्षण आहे आणि सानिटरी कमिशनर कर्नल रॉबिन्सन यांनीं तर असा सिद्धांत काढला आहे कीं उंदीरांचा अभाव तेथें प्लेगाचा ही अभाव असतो. लेफ्टनंट कर्नल बुकॅनन यांच्या मनांत हें तत्व इतकें बिंबलें आहे कीं ते जेथें जेथें जातात तेथें तेथें उंदरांची शिकार मोठ्या प्रमाणावर करीत असतात. उंदरांचा संहार करावयाचा म्हणून ते विषाच्या गोळ्या घालण्यास ही लोकांस उपदेश करितात आणि मांजरें घरोघर पुष्कळशीं पाळावीं म्हणजे आपोआप ती उंदरांचा प्रवेश होऊं देणार नाहींत. गेल्या सप्टेंबर पासून डिसेंबर अखेरच्या ४ महिन्यांत सागर शहरांत १६९९२ उंदीर मारले गेले. नागपूरला ही अशा तऱ्हेचा उपाय करून पाहण्यांत आला होता; पण जेवढा पैसा खर्च होतो व जेवढे उंदीर मृत्युमुखीं पडतात त्या मानानें प्लेगापासून व्हावा तसा बचाव होत नाहीं असा अनुभव आलेला आहे आणि प्लेग जेव्हां कडाक्यानें सुरू होतो तेव्हां त्याच्या जहालपणाचें किंवा मृत्यूच्या संख्येचें मान बिलकूल कमी असें दिसून पडलेलें नाहीं. कर्नल डेनिस यांचा विचार असा पडतो कीं प्लेगाच्या जितक्या पिसवा अधिक तसा तो वाढत असतो ह्या पिसवा प्रथमतः उंदराला प्लेग आणतात, व उंदीर भराभर मरूं लागतात. आणि जोंपर्यंत उंदीर प्लेगानें मरण्याला जिवंत आहेत तोंपर्यंत प्लेग मनुष्याकडे धाव घेत नाहीं. या रीतीनें उंदीर हे प्लेगाचे जंतु प्रसूत करतात. तरी मूळचे जंतू वर्षांतून कांहीं ऋतूंत स्थलभेदानें पुष्कळसे वाढतात आणि त्यांची वाढ खुंटविण्याची मुख्य गोष्ट अद्याप भिषक्वर्यास कळून आलेली नाहीं. उंदीर नाहींसे करणें बहुतेक अशक्यच आहे, आणि जेव्हां ते पुष्कळसे होऊं लागतात तेव्हां त्यांची वाढ व प्लेगाच्या जंतूची वाढ या दोन्ही मनुष्याच्या आटोक्या बाहेरच्या आहेत, त्या शिवाय या प्लेगाच्या पिसवांचा हंगाम जसा संपत जातो तसा प्लेग ही आपोआप नाहींसा होत जातो. शास्त्रदृष्ट्या असें दिसतें कीं जर उंदीर जिवंत पकडून त्यांना प्लेगाची लस टोंचण्यांत येईल आणि असे देवी काढलेले उंदीर जेथें जेथें पुष्कळसे असूं शकतील तेथें तेथें प्लेगाची मजल माणसापर्यंत येऊन पोचणार नाहीं. पण मांजराच्या गळ्यांत घंटा बांधण्या इतकीच उंदराला ही देवी टोंचण्याची कल्पना कठीण जवळ जवळ अशक्य आहे. प्लेगाच्या जंतूंचा एक विशेष आयुष्यक्रम दिसतो. हे जंतू जेव्हां अंडीं घालतात तेव्हां त्या अंड्यांचे जंतू होण्याला सरासरी एक वर्षाचा काल लागतो. त्यामुळें जेथें एकवेळ पावसाळा किंवा हिंवाळा या ऋतूंत हे जंतू प्लेग प्रसृत करतात तेथें पुनः एक ऋतु संपल्यावर लागलीच दुसऱ्या ऋतूंत प्लेग उद्भवत नाहीं आणि कडक उन्हाळा सुरू झाला असतां या जंतूंची वाढ खुंटते व कांहीं आपोआप नाहींसे होतात. कर्नल डेनिस यांचा अनुभव असा ही आहे कीं दुसऱ्या गांवाकडून प्लेग आणला जातो असें म्हणत असतात; पण त्यापेक्षां ही गोष्ट विशेष खरी दिसते कीं जेथें एकदां प्लेग होऊन संपला तेथें कांहीं उंदीर प्लेगाचें जंतू प्रसृत करण्याला मागें शिल्लक असतात आणि नवा जेव्हां प्रारंभ होतो तेव्हां प्लेगाच्या पिसवा त्या त्या उंदरावर जाऊन बसतात आणि अर्थातच हे उंदीर पुन्हां प्लेग प्रसृत करण्याची मुख्य मुख्य द्वारें बनतात. पुष्कळदां बाहेर गांवचे प्लेगाचे रोगी येऊन मरतात तरी देखील नव्या गांवीं प्लेगाचा उद्भव व्हावा तसा होत नाहीं, पण याच्या उलट एकदा रोगी बाहेरून येऊन मेला तरी त्या बरोबर जर या पिसवा आल्या तर लागलीच प्लेग बळावत जातो. जशी माणसाला आयुर्मर्यादा असते तशी प्लेगालाच काय पण प्रत्येक रोगाला आयुर्मर्यादा आहे. आणि इतक्या वर्षांच्या अनुभवाने आम्ही फारसे या बाबतींत पुढें गेलो आहों असें दिसत नाहीं. लोकांची आतां पक्की खात्री होऊन चुकली आहे कीं स्थानत्याग हाच प्लेगाला रामबाण उपाय होय. उंदीर मरू लागले म्हणजे तत्काळ घरें सोडावींत आणि प्राण वांचवावे ही गोष्ट आतां कोणास अधिक जोरानें सांगावी लागत नाहीं. प्लेगाच्या देवीचाही उपाय उत्तरोत्तर अधिक सुखसेव्य होत चालला आहे; पण तो कृत्रीम उपाय असून दुसऱ्या दर्जाचा उपाय आहे व मृत्यूच्या सदनांत वस्ती केल्याशिवाय जेथें निर्वाह नाहीं तेथें लोकांनीं त्याचा स्वीकार करण्यास चुकूं नये. १९१६ सालीं एक लक्ष लोकांस देवी टोंचण्यांत आल्या आणि सरकारतर्फे जर देवी टोचलेल्या इसमांचा अनुभव विचारण्यांत येईल, आणि त्यांच्या नोंदीवरून निघणारे सामान्य सिद्धांत प्रसिद्ध होतील तर या उपचाराचो अधिक बढती होत जाईल.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामानः—** सूर्य चित्रेला येतो आणि पर्जन्यसत्र संपतें. लागलींच वनस्पतींची सृष्टी तीव्र उन्हांत आनंदानें डोलू लागते व रात्रीच्या दंवाच्या अमृतानें अत्यंत तेजस्वी व जोमदार होऊं लागते. हा ऋतूंतला पालट आरोग्याच्या संपदा वाढवील व प्लेगाच्या आपदा दूर होतील असा भरंवसा वाटतो.

**त्रागाः—** राजकीय सभांना गेल्याबद्दल कांहींजणास वर्षभर हाकलून देण्यांत येते आणि सहानुभूतीनें सर्व विद्यार्थी संप करून घरीं बसतात व लागलीच सरकार आपल्या

शाळा बंद करते. ही नागपूरची हकीकत वाचून सरकारचा त्रागा अत्यंत शोचनीय वाटेल. एकाच्या पायांतला काटा काढण्यासाठीं दुसऱ्याच्या चांगल्या डोळ्यावर शस्त्रक्रिया करण्या सारखेंच हें कृत्य होय. पालकांचे होमरूल काढून घेणारें रिस्ले सर्क्युलर व त्यावर रचलेली विद्यानीति या दोहोंचा धन्यवाद गाण्याला कोणत्याच राष्ट्रांत अद्याप कवि निर्माण झाले नाहींत हें सरकारचें दुर्भाग्य होय!

**पैसाफंड**— गेल्या मार्च महिन्यांत प्लेग असल्यामुळें मामूल वहिवाटीप्रमाणें पैसा फंड वर्ष प्रतिपदेचे दिवशीं गोळा करण्यांत आला नाहीं. यंदा तो विजया दशमीचे दिवशी गोळा करण्यांत येईल. तरी स्वयंसेवकांनीं गांव कमेटीचे सेक्रेटरी रा. बळकृष्ण हरी काणे यांना त्यापूर्वीं भेटावें.

**महोत्सव**—येत्या दसरा-मोहरमच्या सुट्टींत मध्यप्रांत व वऱ्हाड येथील चेंडू खेळणारांची मजलस येथील **मित्र समाजाच्या** आश्रयाखालीं होणार आहे व त्या वेळेला येथील बोटक्लबच्या करमणुकीला त्याचवेळीं प्रारंभ होणार आहे. त्याशिवाय मित्रसमाजांतील कांहीं हौशी व गुलजार मंडळी एक नाटकाचा प्रयोग ही करणार आहेत. ° विनोदेन कालो गच्छति धीमताम्.

**नाट्यरुची**—गंधर्व नाटक मंडळीनें आपल्या स्वयंवर, मानापमान, मृच्छकटिक, सौभद्र इत्यादि खेळांनीं लोकांच्या नाट्यरुचीला ओनस्वी केलें आहे. मनुष्य फार गायनलोलुप आहे आणि ह्मणूनच नाटकगृह सदा गजबजलेलें असतें. एकच्या बाल गंधर्वानें ही क्रांती करून सोडली आहे ही आनंदाची गोष्ट होय. राजश्री राजहंस हे उत्तम नाट्यशिक्षक आहेत, किंबहुना त्यांच्या चांगलीं नाटकें पाहून त्यांच्यापासून ललितकला कशी शिकावी आणि पुरुष मंडळींनीं आपल्या ओबड धोबड मनोवृत्तींना खरी रसिकता आणणाऱ्या या कलेचें अभिनंदन करण्याची संधी दवडू नये. जोंपर्यंत सिनेमाच्या पडद्यावर त्या त्या वेळची निरनिराळीं दृश्यें लोकांच्या दृष्टीपुढें मांडण्याची रीत अमलांत आलेली नाहीं तोंपर्यंत प्रेक्षकांच्या हातांशीं पद्यावली ठेवून त्यांच्या मनाचा रसभंग न होईल अशी तजवीज या नाटक मंडळीनें करावी असें आह्मी सुचवितों.

**जुने मित्र**—रा. रा. गणपतराव सोडक बी. ए. येथील हायस्कूलांतील माजी शिक्षक हे येथें आपल्या नव्या एजन्सीच्या कामानिमित्त आले आहेत. हे सौराष्ट्राच्या इतिहासाचे कर्ते आहेत व क्रिकेटचे मोठे शौकी आहेत. कांहीं वर्षांपूर्वींच्या राजकीय धामधुमींत यांना आपल्या मतस्वातंत्र्यासाठीं क्लिष्ट वर्षें देहदंड ही भोगावा लागला आहे. गृहस्थ [illegible]दार आहेत, आणि त्यांच्या या भेटीमुळें पुष्कळांस आनंद होईल.

**प्रश्न विनोद**—एका थोर गृहस्थानीं सहजीं विचारणा केली कीं होमरूलचे सभासद कोण कोण आहेत आणि त्या प्रश्नाचें उत्तर त्यांनींच देण्यास सुरवात करून तुमच्या गांवचे ते रावबहादूर, ते राव साहेब, फलाणे ते नामदार हे होमरूलचे सभासद नसले पाहिजेत असें ह्मटलें. आह्मी येथील स्वराज्य संघाच्या सेक्रेटरींना विचारतों कीं त्यांच्या हा उत्तराचा आडाखा खरो खरच खरा आहे कीं काय?

**दर्शन लाभ**—श्रीमती बिझांट व राजश्री टिळक या दोन्ही मूर्ती राष्ट्राला आपल्या ध्येयाच्या सन्मूर्ती वाटतात आणि ह्मणूनच अलाहाबाद, कलकत्ता आणि मुंबई येथें त्यांच्या दर्शनलाभाताठीं जीं अश्रुतपूर्व स्वागतें झालीं तीं इतिहासांत प्रथमच त्याहावीं लागतील. या लोकांच्या अंतःकरणांतील राजाचा संदेश झणेज अभिषिक्त राजांचें खरें राजगुह्यच होय. राजश्री मॅंटेग ही राष्ट्रगीता ऐकून आपलें संजयाचें कार्य उत्कृष्ट करीत. सध्या श्रीमती बिझांटबाई ह्या आपल्या प्रांतांत न येतां सिमल्याकडे जात आहेत, तेव्हां हा सुयोग राष्ट्रीय पुढें दिहोईपर्यंत लांबणीवर पडल्या[illegible] कायमचा

मंगळवार[illegible] नाहीं. [illegible]त्या तारखेस येथें जाहीर सभा भरून रा. महमदअल्ली मॉस्लेम अलीचे भावी अध्यक्ष यांस त्यांच्या बंधूस आधमुक्त करण्यासंबंधानें जाहीर सभा भरून सरकारास विनंती करण्यांत येणार आहे.

**कॅपटन** जेम्स मॉरिसन यांस गेल्या सोमवारीं नागपुरास ख्रिस्ताज्ञा झाली. हे गृहस्थ पेन्शन घेईपर्यंत सरकारी वैद्यकखात्यांत विशेष नावाजलेले होते; पण त्यापेक्षांही प्लेगाच्या देवी काढण्याचा पुरस्कार त्यांच्या इतका आमच्या प्रांतांत कोणी केला नसेल आणि ही त्यांची लोककल्याणाची गोष्ट लोक विसरणार नाहींत.

**सर्कसः**-- जमखिंडी संस्थानाकडील पटवर्धन सर्कस येथें आली असून तिचे खेळ काल पासून सुरू आहेत. सद्गुणांची येथें मोठी चहा असते असा आकोल्याचा लौकिक आहे तेव्हां येथील सर्कसची परीक्षा पाहून पटवर्धन मंडळी खूष होतील असा आह्मास भरंवसा आहे.

**परिचयः**— प्रांतीय सहकारी पेढ्यांचे गव्हर्नर नामदार रा. ब. नारायण कृष्ण केळकर यांची स्वारी आकोल्याच्या पेढ्यांची तपासणी करण्यासाठीं येथें ३ दिवस होती. पेढ्यांच्या सार्वजनिक कार्यांत जीव ओतण्यासाठीं यांनीं स्वार्थत्याग करून आपल्या अंगावर हें काम घेतलें आहे आणि भावी कार्याच्या दिशा लोकांना समजून सांगण्यासाठीं यांनीं पुष्कळाच्या गांठी घेतल्या. आमच्या जिल्ह्यांतील या संस्था त्याना चांगल्या जोमदार वृक्षाप्रमाणें वाटतात व त्यांच्या पुष्पाची व फळाची बहार इतर संस्थांना आदर्शभूत होईल अशी आह्मास उमेद आहे. नामदार केळकर काल पारसला जाऊन पुढें खामगांवकडे वळणार आहेत. ठिकठिकाणीं मंडळी त्यांचें स्वागत करितील तेव्हां स्वाभाविकपणेंच त्यांच्या परिचयानें सहकारी मंडळ्यांच्या कामाला जोर येईल.

---


## पटवर्धन सर्कस

### जाहिरात

हायस्कूलांतील व इतर इंग्रजी शाळेंतील विद्यार्थ्यांकरितां ब. रु.५ व ३ व मराठी शाळेंतील विद्यार्थ्यां करितां बक्षीस रु. ३ व २ विद्यार्थिनी करितां बक्षीस रु. ५ व ३ 'सर्कस व ती पाहाण्यापासून फायदे, अथवा तोटे' या विषयावर ज्याचा निबंध उत्तम ठरेल त्यांस वरील प्रमाणें बक्षिसें मिळतील. निबंध मराठींत वृत्तपत्राच्या दोन कॉलमाहून मोठा नसावा. शाळेच्या दाखल्या व पत्त्यासह ता. २० आक्टोबरचे आंत पोस्टानें किंवा समक्ष म्यानेजर याजकडे पाठवावा.

एल्. बी. काटदरे
म्यानेजर पटवर्धन सर्कस

दिवाळी करितां सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

# आर्यवनौषधालय—मुर्डी.

## दीपावली. ॐ नमः श्रीगणेशाय. दिवाळी.

### अति उंच सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

प्रत्येक पेटीची किंमत पोष्ट ख. सह (१॥१२)

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादि अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधि उटणें, गंधाचे रवे, स्त्रियांकरितां लाजभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगंधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगंधि माल फार उत्तम ठेविला असून तो सर्वांना बेग्यास जरूर वाटूं नये ह्मणून अह्मी आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटी. किंमत पो. ख. सह अवघी १॥१२ ठेविली आहे. या पेट्या एकदम पांच घेणाराला एक पेटी, व आठ घेणाराला दोन पेट्या, चौदा घेणारास चार पेट्या कामिशन दाखल फुकट देऊं. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगंधि माल लक्षपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल.

### उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या.

पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये. (३)

ही पेटी सागाच्या लाकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केली आहे. या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरिता कुंकू, हळद व काजळ असे एकंदर अकरा बादशाही सुगंध पदार्थ ठेविले आहेत. इतके असून ही या पेटीची किंमत अवघी अल्प पो. ख. सह ३ ठेविली आहे. पेटींतील प्रत्येक मालाचें निरीक्षण केल्यास आमची ही ठेविली किंमत फारच अल्प ठरेल, ती सर्वांनीं या पेट्यांचा भरपूर उपयोग करावा. या पेट्याहि एकदम पाच घेणाराला एक पेटी, व आठ घेणाराला दोन पेट्या कमिशनदाखल देऊं. पेटींतील सर्व माल अति उंची वापरण्यालायक आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

### राजविलासी बादशाही अत्तरें.

| | | | |
|---|---|---|---|
| सुरंगी नं. १ | मालती, | गंधराज | लक्ष्मीविलास |
| दर तोळ्यास ३ रुपये | पुष्पराज | राजविलास | मदनविलास |

वरील अत्तरें आमच्या सौगंधिक कारखान्यांत विशेष मोठ्या प्रमाणावर तयार केलेली असून तीं अतिसौगंधिक आहेत. या अत्तरांची प्रसिद्धि सर्वत्र झालेली असल्यामुळें विशेष वर्णन करण्याची जरूर नाहीं. ही अत्तरें पाव तोळ्यापासून पाहिजे तितकीं मिळतील व तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावीं.

### उत्तम सुगंधी अत्तरें.

गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया, वाळा (खस), जाई, सोनचांफा, बकुळ दवणा, पाच, पारिजातक केशर दर तोळ्यास १॥८

**जीवनपुरी तेलें**—बेलिया चमेली हीना मव्वा वगैरे तेल दर १० तो. १ रु०

वरील सुगंधी मालाच्या किंमती फारच अल्प ठेविल्या मुळें या वस्तूंना कमिशन मिळणार नाहीं. अत्तरें पाव तोळ्यापेक्षां कमी मिळणार नाहींत.

### अगोदर हें वाचा. फायदा आहे ! !

वरील सर्व सुगंधी माल दिवाळीचे सणाकरिताच अल्प किंमतीस द्यावयाचा आहे व त्याचा लाभ श्रीमंतांपासून गोरगरीबांपर्यंत सर्वांनी घ्यावा व दिवाळीसारखा आनंदी सण आनंदात घालवावा हिच आमची इच्छा असल्यामुळें यंदा हा माल फारच स्वस्त केला आहे त्याचा लाभ सर्वांनी जरूर घ्यावा. नकली मालास किंवा नकली वर्णनास भुलूं नये व फसूं ही नये. हि० पो० नं० पाठवू.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी
नों० नं० ४३१ पो० मुर्डी जि० रत्नागिरी

४० रोगावर एकच जालीम औषध

**सुधासंजीवनी**



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तकाल गुण येतो.

याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -।।- अनुपान पत्रकसोबत गावोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन आजच पत्र लिहा.

सुधासंजीवनी डेपो
खामगांव (वऱ्हाड)

## नोटीस.

नोटीस बेशमी बाजीराव बाळकृष्ण जोशी राहणार तुतगांव ता। आकोट जि. आकोला

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझी जंगम जिनगी, खालीं लिहिल्या प्रमाणें तुह्मी आकोलखेड ता० आकोट जि० आकोले येथून आणिली. ती तीन महिन्यापासून मी तुह्मास, मागत आहे, परंतु तुह्मी मला थापा देऊन आज पावेतों आणून दिली नाहीं तरी ही नोटीस मिळाल्या तारखेपासून आठ दिवसाचे आंत आणून दिल्यास ठिक आहे नाहीं तर दावा करण्यांत येईल.

| मालाचें नांव | किंमत |
|---|---|
| सोन्याची आंगठी तोळे ४ | १०५ |
| बैलाची जोडी १ | २५० |
| दमणी एक | ६० |
| गंजमोठे २ लहान २ ( पितळी ) | ७५ |
| गुंड २ वजन शेर १० ( अंदाज ) | ३० |
| बेग तांब्याची वजन शेर ५ अंदाज | १५ |
| गंगाळ ३ एक पितळी व दोन तांब्याचे वजन शेर १५ अंदाज | ४५ |
| तार्टे ६० वजन शेरं ६० | १८० |
| वाट्या ६० (पितळी) वजन ८ | २४ |
| तांबे ५० वजन शेर ५० | १५० |
| कोपर १ वजन अंदाज ४ शेर | १२ |
| समया ३ वजन अंदाज शेर २१ | ६३ |
| बैलाची साज वजन शेरं ८ | २४ |
| गीलास २५ | १२ |
| जातं २ | १० |
| तांब्याच्या घागरी २ वजन शेर १४ | ४२ |
| भरणे तांब्याचे दोन शेर ५ अं. | १५ |
| कपडा | |
| येवले पितांबर २ साधे | १५० |
| येवले जरीचे ४ | ३०० |
| लुगडे नागपुरी कोरे ४ | ६० |
| चोळ्याचे खण अंदाज २० | ५० |
| दुशाले २ | २५ |
| रोख नगदी जमीनीच्या मसाल्याकरितां रु. ५०० | ५०० |
| या शिवाय चिल्हर सामान | २०० |
| | २३४७ |

येणें प्रमाणें जंगम माल तुह्मी वर लिहिल्या मुदतींत आणून द्यावा कळावे तारीख १३-१०-१७ इ.

सही

चंद्रभागा नवरे केशव भट रा.
आकोलखेड ता० आकोट द. खु.

नो. नं ४

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रातिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १।८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

Dr. H L. Batliwala
Sons & Co. Ltd.
N. N. 6 Dadar Bombay

## लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळणाच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, स्टांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स
पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

गरीबांस फुकट

**रामबाण मलम**

( कोणत्याहि त्वग्रोगावर )
गुणकारी किं. ६ आणे.

**केशनाशक पूड.**

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर. मुळे
नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०

**रोल्डगोल्ड सोन्याचे**

कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४–५. शिंप्याचें मोतीं लहान मोठें वाटेल तसें. सराची २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

**केंस काळे करण्याचा साबण.**

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाकसची किं. १॥ रु.

पत्ता– मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव– मुंबई

नो० नं० ५

ॐ नमः श्रीगणेशाय.

नेहकर येथ आल्याचें जाहीर

**आर्यवनौषधींचा कारखाना:—मुर्डी.**

...चे खालील औ **मदनामृतसंजीवनी.**

धातुवर्धक, अत्यंत ...मोत्तेजक व पौष्टीक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक कांतिबुद्धि...क, सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक व...मिश्र अद्भुत गुटिका.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे इंद्रियशिथिलता ...संबंधी मुरलेले विकार मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींत रोग हात, पाय मुत्रमार्ग व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य; मस्तकशूल, मुळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार बाळांतरोग, मधुमेह, जुनाट पर्मा, मुष्टीमैथुनानें आलेली कृशता इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनते. पचनशक्ती व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची शुद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें, व मनास उत्साह देतात. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें यांत उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केले असल्यामुळें त्यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून वरील विकारांवर अत्यंत गुणकारक आहेत, करितां गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटा मिळाल्या व नित्य मिळतात. पथ्यसेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत. एका रुपयांचे आंत मिळणार नाहींत. एकदम ४ रुपयांच्यावर कितिही घेणारास टपालखर्च माफ आहे. चार रुपयाचें आंत वेगळा टपालखर्च ५ आणे पडेल दर एकदम ३५ गो० १ रु० ७५ गो० २ रु० १६५ गो० ४ रु० २७५ गो० ६ रु० ५५० गो० १० रुपये.

१. **अपूर्व नेत्रांजन**—यानें वडस, सारा, फुलें, खुपऱ्या, बिंदु, काच, इ० नेत्रांचें सर्व विकार त्वरित बरे होऊन दृष्टि तीव्र व थंडगार राहते. या रोगास हें अंजन खरें रामबाण आहे. १॥ तो. ड. १ रु.

२. **परम्यावर अपूर्व मिश्रण**—कोणत्याही नवा जुना पर्मा व तज्जन्य दाह तीडक, मुत्रांची लाला, संकोच, पुयस्राव, रक्तस्राव इत्यादि विकार पथ्य नसत सात दिवसांत जातात. तिडीक एका घटकत जाते. असे रामबाण औषध कोठेंच मिळत नाहीं. बा० किं० १ रु० १ भार २ रु० सर्व औषध व्ही० नें पाठवूं.

सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा. तो फुकट पाठवूं. औषधांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून तीं पूर्ण खात्रींची असल्याबद्दल असंख्य सर्टिफिकिटें आहेत या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें, थोक्त रसायनें, भस्में, पाक गुटिका आसवें, तेलें व सुगधी अत्तरें वगैरे माफक दरानें मिळतात. अनु० ख० सो० ट० ख० वे० पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं. प्रकृतिमान कळविल्यास रोग्याचें निदान व चिकित्सा कळवूं. माल मागविण्याचा पत्ता—

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी, पो० हर्णे, जिल्हा रत्नागिरी

नो० नं० २२

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-N. No150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१] आकोला—सोमवार तारीख २२ माहे आक्टोबर सन १९१७ ई० [अंक ४२

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या शर्तीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल.

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज ...ही नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } Lyon Scott
आकोला ९।९।०९ } एजंट
नो नं १

---

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २५

" डबल रीड ३० ३५-४०-५०

तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५.

पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.

" " " ३॥ ८५ ते ९५ रु.

" " " ३॥। १०४-११५ रु)

" " " ३॥। तीन लाइनी क्यांझरेल सुराची १८० ते २१० रु.

पत्ता—रामचंद्र बीसनसा हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा

नो. नं. २८४

---

## नोटिस

रा० रा० यशवंतराव गोविंदराव देशमुख राहणार हात तालुके बाळापूर पोष्ट निंब

यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिशीचें उत्तर देण्यांत येतें कीं तुह्मास पूर्वी तारीख ७-९-१७ चे नोटिशीनें स्पष्टपणें कळविले कीं ताबा तुमचा आहे. तुमचे शेताशीं आमचा कांहीं संबंध नाहीं असे असतां त्या शेताची कांहीं व्यवस्था न करितां तुह्मी तशी पडीत पडूं दिल्यास त्याजबद्दलची जबाबदारी कायद्याप्रमाणें आमचेवर नाहीं. तुमचे नुकसान तुह्मी आपण होऊन करीत असल्यास त्याजबद्दल खालीं सही करणारास कांहीं इलाज नाहीं आह्मी तुह्मास जाहीर नोटिशीनें कळविल्यापासून त्या शेताची मेहनत मशागत करून चांगले पीक काढतां आले असते. तसें तुह्मी न केल्यास त्याजबद्दल आमचे कडेस कांही दोष नाहीं तारीख १८-१०-१९१७ इसवी.

सही

चुन्नी मर्द गोपालसिंग रजपूत राहणार हात निशाणी खुद

नो० नं० ४३०

---

## नोटीस

नोटिस बेशमीः कृष्णाजी वा॥ हसाजी भोई राहणार चांदूर तालुके मलकापूर जि. बुलठाणा

यांसीः—

नोटिस देणार जसोदी मर्द कृष्णा भोई राहणार हल्लीं मुक्काम पिंपळगांव राजा तालुके खामगांव जिल्हा बुलठाणा नोटीस देते कीं तुमचेशीं माझे लग्न होण्यास अजमास नऊ वर्षे झालीं. मी वयांत येण्यास तीन वर्षे झालीं, त्यांत मी वयांत आल्यापासून दोन वर्ष तुमचे जवळ होतें, परंतु दोन वर्षांत तुह्मी माझेशीं नीट संसार केला नाहीं व माझेशीं संबंध ठेविला नाहीं. एक वर्षा पासून मी माझा भाऊ चहादू वा॥ मल्हारी भोई याचे येथें राहत आहे. त्यांत माझे अन्नवस्त्राबद्दल माझे भावाचे साठ रुपये झाले आहेत, तरी ते साठ रुपये आठ दिवसानी ह्मणजे नोटिस पावल्यापासून आठ दिवसानी रुपये आणून देऊन माझी फारकती देऊन मजला मोकळे करावे. मजला नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत मोकळे न केल्यास व माझे भावाचे साठ रुपये न दिल्यास मी तुमचेवर फिर्याद करून कोर्ट खर्च जो लागेल तो तुमचे जवळून घेतला जाईल. तरी नोटिस पावल्यावर आठ दिवसांत मजला फारकती आणून देऊन मोकळे करावे. ही नोटिस दिली सही

तारीख १०।१०।१७ इसवी

१ जसोदी मर्द कृष्णाजी भोई नि॥ खुद बांगडी दस्तुर विष्णु गणेश

नो० नं० ४२ ४३१

---

## पत्रव्यवहार

रा० रा० वऱ्हाड समाचार कर्तेः— यांस

सा० न० वि० वि०

१ मेहकर (वऱ्हाड) येथें तारीख १४-१०-१७ रोजीं जंगी जाहिर सभा होऊन मेहकर येथें तालुका काँग्रेस कमिटिची स्थापना झाल्याचें जाहीर करण्यांत आले. सदरहु काँग्रेस कमिटीचे खालील अधिकारी मंडळ नेमण्यांत आले.

चेअरमन

रा० रा० यादव माधव काळे बी. ए. एल्. एल्. बी.

व्हाइस चेअरमन

रा० रा० गिरिधर सखाराम दिक्षीत बी. ए एल्. एल्. बी.

सेक्रेटरी

रा० रा० रघुनाथ मार्तंड राजदेरकर बी. ए, एल्, एल्, बी,

जॉइंट सेक्रेटरी

रा० रा० व्यंकटेश केशव सोमण

खजिनदार

रा० रा० सुंदरसा गोविंदसा सावजी तालुका काँग्रेस कमिटीचे मेंबर होण्याबद्दल विनंती करण्यांत आली व त्याप्रमाणें मेंबर मिळत आहेत.

२ त्याच सभेंत काँग्रेस व मॉस्लिमलीग यांनीं तयार केलेली सुधारणेची योजना व त्याचप्रमाणें १९ नामदार लोकांनी जी योजना ठरविली आहे ती या सभेस मान्य आहे व ती योजना अमलांत आणण्याबद्दल स्टेट सेक्रेटरी मि० मॉंटेग्यु यांस अर्ज द्वारा विनंती करण्यांत यावी असा ठराव सर्वानुमतें मंजूर झाला.

३ सदरहू ठरावावर रा० काळे, सोमण दिक्षीत, राजदेरकर, सावजी वकील व जगन्नाथ शेटजी यांची फार कळकळीचीं व माहितीनें भरलेली भाषणें झाली. मि० गांधी यांनी ठरविलेल्या अर्जावर फार उत्साहानें व झपाट्यानें सह्या होत आहेत. जाहीरसभेचा परिणाम फार उत्साहजनक असा झाला. सभेचे लोकप्रिय व वयोवृद्ध अध्यक्ष रा० तात्यासाहेब सोमण यांनीं ही फार कळकळीनें उपदेश केल्यानंतर सभा बरखास्त झाली. मेहकर येथील मंडळी सर्व तालुकाभर फिरून लोकमताची जागृति करीत आहेत.

आपला

व्यं. के. सोमण

---

वऱ्हाडसमाचार

आश्वीन शुद्ध ७ पिंगल संवत्सर १८३९

## नेमस्त कोण?

हल्लींच्या काळीं नेमस्त पक्ष अस्तंगत झाला आहे याबद्दल मद्रासमेल, स्टेटस्मन् वगैरे पत्रें नक्राश्रु गाळीत आहेत. जहालपक्ष सुरतेच्या कांग्रेसनंतर कित्येक वर्षेपर्यंत कांग्रेसपासून दूर झालेला होता, व एकटा नेमस्त पक्ष राजकीय अंगणांत होता; त्याला मुसलमानांचेंही त्यावेळीं असावें तसें पाठबळ नव्हतें अशा स्थितींत ज्या आंग्लो-इंडियन पत्रांनीं त्याला यत्किंचित् ही साह्य केलें नाहीं, त्याच पत्रांनीं सध्याचे प्रसंगीं आपणांस बिझांट पक्षाच्या विरुद्ध ओरड करण्याचे कामीं नेमस्ताचें पाठबळ नाहीं याबद्दल विलाप करीत बसावें हें पाहून या पत्रकर्त्यांच्या मतलबी काव्याबद्दल कोणाला तिरस्कार वाटणार नाहीं? मद्रासमेलकर्त्याच्या दृष्टीनें नेमस्तपक्षाच्या मनुष्याचे अंगीं कोणते गुण असावेत व त्यानें काय करावें तें पाहण्यासारखें आहे. पहिला गुण ह्मणजे त्यानें एकदम कोणता ही फेरफार होऊं देण्याच्या व भलत्याच महत्त्वाकांक्षा धरण्याच्या विरुद्ध असावें. पण एकदम फेरफार कशाला ह्मणावयाचें त्यासंबंधानें फार मतभेद आहे. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत एकदम फेरफार असे कोणते आजपर्यंत झाले आहेत? किंवा होऊं घातले आहेत? १८५८ सालच्या राणीसरकारच्या जाहिरनाम्याला आणखी तीन महिन्यांनीं ६० वर्षे होतील. त्या जाहिरनाम्यांत दिलेलीं अभिवचनें अजून सगळीं यथार्थपणें पाळलीं जात नाहींत, तीं पाळा असें ह्मणणें ह्मणजे एकदम फेरफार करण्यास सांगणें आहे काय? हिंदुस्थानांत विलायते प्रमाणें सिव्हिलसर्व्हिसची परीक्षा घेण्यांत यावी असा पार्लमेंटानें २५ वर्षांपूर्वी ठराव मंजूर केला असतां त्याला अजून सरकारी अधिकारी मूर्त स्वरूप देत नाहींत, तें द्या असें ह्मणणें हा एकदम फेरफार ह्मणावयाचा काय? कांग्रेस आज ३० वर्षे अस्तित्वांत आहे व तिच्या पहिल्या वर्षाच्या मागण्यांपैकीं अद्याप एक ही पूर्णपणें मिळाली नाहीं. तीस वर्षांच्या अवधींत जपानच्या राज्यकारभारांत उलथापालथ होऊन तें राष्ट्र पहिल्या प्रतीच्या राष्ट्र मालिकेंत जाऊन बसलें; पण हिंदुस्थानच्या लोकांना मात्र या अवधींत

खऱ्या खऱ्या अधिकाराचा लवलेश सुद्धां प्राप्त झाला नाहीं हें पाहून सुद्धां हिंदुस्थानच्या लोकांनीं स्वस्थ राहावें व जे तसे राहतील ते नेमस्त असा त्या शब्दाचा अर्थ मद्रास-मेल व दुसरीं आंग्लोइंडियन पत्रें घेत असतील तर आतां हिंदुस्थानच्या ३१ कोटि प्रजेंत त्यांना असा नेमस्त औषधाला सुद्धां मिळावयाचा नाहीं व तो आढळेल अशी अपेक्षा ही कोणीं करूं नये असें आह्मी साफ सांगतों. हिंदुस्थानच्या लोकांनीं महत्त्वाकांक्षा न धरतां साहेब लोकांचे बूट पुशीत राहावें हें नेमस्तांच्या कर्तव्यांचें पुराण आंग्लोइंडियन पत्रकर्त्यांनीं आतां गुंडाळूनच ठेविलें पाहिजे. सर मायकेल ओडवायर सारख्यांनीं केलेलें उद्दाम भाषण ऐकून चीड न मानतां त्याची तारीफ करण्या इतके दुधखुळे आतां हिंदुस्थानांत राहिले नाहींत हें आतां खूप लक्षांत ठेवावें.

आंग्लो इंडियन पत्रकर्त्यांच्या दृष्टीनें नेमस्तांचा दुसरा गुण ह्मणजे बिझांटपक्षाचा द्वेष हा असला पाहिजे. बिझांट बाईचीं मतें सर्वस्वी ज्यांस मान्य नाहींत किंवा त्यांची पद्धति ही ज्यांस पसंत नाहीं अशीं माणसें सध्या नाहींत असें आह्मी ह्मणत नाहीं. त्यांना कांग्रेसचे अध्यक्ष करण्याविरुद्ध कलकत्याचे व मुंबईचे ही कांहीं पुढारी होते ही गोष्ट सर्वांस श्रुतच आहे. पण किती ही मतभेद असला तरी सरकारनें त्यांची स्वतंत्रता हरण करून त्यांना अटकेंतच राहूं द्यावयास पाहिजे होतें असें ह्मणणारा खऱ्या हाडाचा एक ही हिंदी निघणार नाहीं. हिंदुस्थानासाठीं त्या स्वराज्याचे हक्क मागत आहेत यांत त्या काय गैर करीत आहेत? लेकांत राजकीय, धार्मिक, नीतिविषयक व शिक्षणविषयक जागृति उत्पन्न करून स्वराज्य प्राप्तीची पात्रता त्या आणीत आहेत व त्यासाठीं आजपर्यंत कोणी ही केला नहीं येवढा स्वार्थत्याग त्या करीत आहेत, या गोष्टीबद्दल सर्व मत बाजूला ठेऊन गुणग्रहण करावयाचें सोडून त्यांचा उलट द्वेष करण्यास आंग्लो इंडियन पत्रें शिकवीत असतील तर ही शिकवणी कोणता स्वाभिमानी हिंदी पुरुष किंवा स्त्री ऐकून घेईल? बिझांट बाईची मुक्तता करा असें सरकारास प्रार्थनापूर्वक ह्मटल्यानें नेमस्तांचें नेमस्तत्व कसें नाहींसें होतें तें आंग्लो इंडियनपत्रकर्तेंच जाणत. स्वराज्याचें अंतिम ध्येय कबूल केल्याबद्दल मि. मांटेग्यु साहेबांचा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यानंतर तें ध्येय लेकांना उपदेशणाऱ्या बिझांट बाईना अटकेंत ठेवण्यास योग्य सबब तरी कोणती सरकारला दाखविली असती? बाईची मुक्तता करण्यांत सरकारनें चूक केली असें लोकांनीं ह्मणावें व सरकारावर रागावण्यांत आंग्लो इंडियनांना सामिल व्हावें याचा अर्थ नेमस्तपणा असा असेल तर तो नेमस्तपणा हिंदुस्थानांत सध्या तरी एकाही व्यक्तीच्या अंगीं नाहीं हें आह्मी खात्रीनें सांगतों. सध्या नेमस्तांतले नेमस्त ह्मणजे ना. मि. वाच्छा, समर्थ, सुरेंद्रनाथ बॅनर्जी व मदन मोहन मालवीय हे गणिले जातात. पण बाईला घातलेल्या अटकेचा निषेध या नेमस्ताग्रणींनीं जितक्या तीव्रपणानें केला तितका दुसऱ्या कोणीं हीं केला नसेल. अर्थात् मद्रास मेलसारख्या पत्रांच्या दृष्टीनें हे ही नेमस्त नव्हेतच. या पत्रकर्त्यांच्या पसंतीस पडणारा समजा एखादा नेमस्त निघालाच तर त्याच्या पदरीं ही काय पडणार आहे हें इतिहासज्ञास सांगावयास नकोच. मग नेमस्तपणा दाखवून लाभ तरी कोणता? कुत्रें सुद्धां हाड चघळतें तें चरबीचा थोडातरी स्निग्धपणा ज्यांत असेल असेंच हाड चघळतें. कुत्र्या इतकी ही अक्कल हिंदुस्थानच्या सुशिक्षितांत नाहीं असें हे पत्रकर्ते समजतात काय? समजत असतील तर हिंदुस्थानांत असा अस्सल शंभर नंबरी गद्धा कोणी राहिला नाहीं याबद्दल त्यांनीं खुशाल आक्रोश करावा. त्यांच्या आक्रोशाकडे कोणी ही हिंदी मनुष्य लक्ष देणार नाहीं.

## शिष्यमाला.

(सुंदरराव पांडे यांचा स्तुत्य प्रयत्न.)

कैलासवासी श्री वासुदेवानंद सरस्वती महाराज हीं एक आपल्या महाराष्ट्रांत थोर विभूति होऊन गेली. यांच्या पुण्यप्रभावानें पुष्कळशा संसारी मंडळीस ऐहिक व पारमार्थिक असे दोन्ही नीतिपथ लाभले आहेत. महाराजांच्या कृपेंतील शिष्यवृंद फार मोठा आहे व तो बहुत स्थळीं पसरलेला आहे. तेव्हां अशा मंडळीची एक यादी संपूर्ण नांव, आडनांव, जात, वय, धंदा राहण्याचें ठिकाण व वार्षिक उत्पन्न इतक्या माहितीसह तयार करून प्रसिद्ध करावी अशी स्फूर्ति आमचे मित्र रा. रा. सुंदर नीलकंठ पांडे वकील दर्यापूर यांस झालेली आहे आणि ते त्या उद्योगाला तत्परतेनें लागलेले आहेत. तेव्हां ठिकठिकाणच्या शिष्य मंडळींनीं ह्मणजे पुरुषांनीं तसें स्त्रियांनीं देखील आपापली माहिती सदरहु गृहस्थाकडे पाठविण्याची त्वरा करावी. अशी नामावळी हातांत असली ह्मणजे गांवोगांव सफर करण्याचा योग आल्यास शिष्यवर्गास परस्परांची चांगली मदत होते आणि महाराजांच्या सेवेंत गेलेल्या पूर्व आठवणींची स्मृती होऊन नव्या नव्या सत्कार्यांत ही परिचय अधिक वडत जातो.

## ब्रह्मानंद

(प्रजननाचें विद्याध्ययन)

आमच्या वऱ्हाड प्रांताचा जनन मरणाचा १९१६ चा जमाखर्च पाहतां जन्मापेक्षां मृत्यूच १४ हजारांनीं अधिक आहेत. एकंदर लोकसंख्या ३०५७१६२ सन १९११ सालीं होती. ३० लक्ष लोकवस्ती मागें १॥ लक्ष लोकमृत्यू हें प्रमाण फार मोठें आहे. या प्रांताचें क्षेत्रफळ १७७७६ चौरस मैल असून दर चौरस मैली १७२ लोकसंख्या पडते. आणि या मानानें हा प्रांत जरी पातळ वस्तीचा नाहीं तरी तो इतक्या दाट वस्तीचा ही नाहीं कीं ज्याच्या योगानें मृत्यूचें प्रमाण वाढावें. असा जेथें आयापेक्षां व्यय अधिक आहे तेथें सृष्टीच्या नियमांचें उल्लंघन विशेष होतें हें निर्विवाद होय. लोकांस प्रजानिर्माण शास्त्राची माहिती चांगलीशी नाहीं आणि त्यामुळें प्रजननाच खटाटोपही या प्रांतांत दांडगा आहे आणि आरोग्य शास्त्राचे नियम जन्मापासून जसे पाळले जावेत तसे पाळण्यांत येत नाहींत त्यमुळें मृत्यूंची संख्या ही दांडगी आहे. जर आपण चांगलीं पिकें यावीं ह्मणून धान्याचीं व कपाशीचीं प्रदर्शनें उभरतों तर लहान अर्भकांचीं प्रदर्शनें जरूर भरवलीं पाहिजेत. निदान ६-६ महिन्यांनीं प्रत्येक गांवांतील वर्षभराच्या आंतील मुलें १-२ तास एकत्र करून त्यांचें प्रदर्शन मांडावें ह्मणजे हिंदुस्थानच्या भावी वैभवाला न शोभणारीं अशीं किती तरी अपत्यें दृष्टीस पडतील आणि त्या त्या वेळीं त्यांच्या आईबापांच्या प्रणय विकासाचें दर्शन न होतां त्यांच्यांतील कलहात्मक मनोवृत्ती, अयुक्त चेष्टा व अकालीं मैथुनप्रसंग यांची मूर्तिमान चित्रेंच पुष्कळशीं पहाण्यास मिळतील. सुतार लांकडाची वाटेल तशी सुंदर मूर्ती बनऊ शकतो, पाथरवट बिनआकाराच्या आवड धोबड दगडाच्या रमणीय देवमूर्ती बनवितो आणि सुवर्णकार तसाच लोहकार आपल्या हातांतील अशोधित धातूपासून ही मनोहर चित्रें निर्माण करतो तेव्हां या निर्जीव पदार्थावर उत्कृष्ट कारागिरी करणारीं माणसें आपल्या सारख्याच मनोवृत्तीच्या मानव कोटींतल्या उन्नत स्त्रीवर्गाशीं संयोग पावतात तेव्हां त्यांची कुशलता व कारागिरी लुप्तप्राय व्हावी व आंधळ्या काशिबिरींतल्या खेळासारखे प्रजानिर्माणाचें पवित्रकार्य इतकें वेडेविद्रे होत असावें ही गोष्ट मनुष्याच्या पशुवृत्तीचीच साक्ष देते. जेथें देशाच्या मर्दुमकीचा, पाणीदारपणाचा व त्याच्या भावी ओजाचा प्रश्न येतो तेव्हां आह्मा प्रमाणें प्रत्येक विचारी माणसास प्रजनन शास्त्राच्या शाळा निघाल्या पाहिजेत आणि तेथें मनुष्याचें अज्ञान दूर होऊन त्याला नवे नवे उन्नतीचे सोपान चढण्याच्या विद्या शिकविण्यांत आल्या पाहिजेत असेंच वाटेल. प्रजननाची विद्या सर्व विद्यामध्यें श्रेष्ठ आहे आणि तिच्या संबंधाची मूकवृत्ती व दुर्बोधता असूं देणें विचारी माणसास पसंत पडणार नाहीं. किंबहुना जसे लोक उद्योग धंद्याला लागण्याच्या पूर्वीं निरनिराळ्या परीक्षा देऊन आपली लायकी शाबीत करीत असतात त्याप्रमाणें गृहस्थाश्रमांत येणारे स्त्री पुरुषांचे वर्ग ब्रह्मचर्यांत उपलब्ध होणाऱ्या विशिष्ट ज्ञानाचे अभ्यासक असले पाहिजेत असें आह्मास वाटतें. स्पार्टन लोकांमध्यें अशा धोरणावर शाळा काढलेल्या असत आणि तेथें दुर्बल स्त्री पुरुषांचा संयोग होऊं नये अशाविषयीं विशिष्ट कायदे असत. आमच्या पूर्वीच्या शास्त्राच्या मर्यादा व आज्ञा अशाच पद्धतीच्या आहेत, पण जेथें पाश्चात्य सुधारणे बरोबर धर्मश्रद्धा नष्ट झाली तेथें प्रजानिर्माणशास्त्राचे धडे उच्च वर्गाच्या क्रमिक पुस्तकांतून जरूर ठेवले पाहिजेत. आजपर्यंतचा या विषयांतला अबोला किंवा मौन हें थोर पिढीनें तरुण पिढीशीं ठेवतां कामा नये आणि जशी विद्या संप्रदायानें एकापासून दुसऱ्याला लाभते तशी ही गृहस्थाश्रमांतली अत्यंत पवित्र विद्या लग्नकार्यें, गर्भाधानें, पुंसवन संस्कार इत्यादि धर्म कृत्याच्यावेळीं तरी तज्ज्ञ शास्त्रज्ञांच्या हातून शिकविण्याविषयींचा नवा प्रघात घातला पाहिजे; किंबहुना आपल्या जुन्या विद्या नव्या विचारांच्या वेशमध्यें पुनः तेजस्वी करून प्रचलित केल्या पाहिजेत.

## सहकारी पेढ्या.

यवतमाळच्या सेंट्रल बँकेचा ९ वा वार्षिक रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झालेला आहे त्यावरून पाहतां बँकेची चांगली भरभराट आहे. बँके जवळ ३० हजार रुपये शेअर्सचें भांडवल आणि सरासरी तितक्याच रकमेच्या ठेवी असून त्या शिवाय पाऊण लाख रुपयांचें प्राव्हिन्शियल बँकेचें कर्ज आहे. आमच्या मतें या कर्जाऐवजीं शेअर्सचें भांडवल व लोकांच्या ठेवी याच पुष्कळ वाढल्या पाहिजेत आणि तीच बँकेची खरी अभिवृद्धी होय. यवतमाळच्या होमरूल संस्थेची जी आह्मी महती ऐकतों त्या मानानें ही सेंट्रल बँक पुष्कळ मागें आहे. तेथील राव बहादुर मुंडले, यशवंतराव देशपांडे, मुलचंद गुलराज, अभ्यंकर, भट, खानझोडे, देशमुख व कर्णिक इत्यादि मंडळींनीं होमरूलच्या मंडळींना या कार्यांत सामील करून घेण्याचा पहिला उद्योग केला पाहिजे. ह्मणजे त्यांच्या विनामूल्य कामाला चांगली तेजी येईल आणि निदान या सार्वजनिक कार्यांत सरकारी व बिनसरकारी लोकांस आपले विचार कार्यवाही करण्यास चांगली संधी मिळत जाईल. 'संहतिः कार्य साधिका' हा लोकमान्य टिळकांचा सर्व राष्ट्रास संदेश आहे आणि ह्मणूनच ते आकोल्यास आले असतांना येथील सेंट्रल बँकेच्या आफिसांत जाऊन आपले सुविचार लोकांस कळविले होते. जी गोष्ट आह्मी यवतमाळकरांस करण्यास सुचवीत आहों तीच गोष्ट आमच्या येथील बँकेचे पुरस्कर्ते व थोर हितचिंतक राजश्री बापूसाहेब जठार रावबहादुर दामले, राजश्री बाळासाहेब खोलकुटे, गोविंद भगवंत देशपांडे, चौबळ, नरगोलवाला, विष्णु गणेश कुळकर्णी, महाजनी, धर्माधिकारी, खानझोडे, भिकाजी परशराम भोड, रावसाहेब सूर्यभान जानजी केळीवेळी, बन्सीलाल हातरूण, अहमदखान पातूर इ. इ. गृहस्थांनीं अद्याप अंमलांत आणावयाची आहे हें विसरतां कामा नये. या सहकारी संस्था जितक्या व्यापक व लोकांच्या व्यवहारांतल्या व्हावयाला पाहिजेत तशा त्या नाहींत. त्यांच्यातील तो सरकारी बागुलबोवा लोकांचें जसें संमिश्रण व्हावें तसें होऊं देत नाहीं.

## मुंबई इलाख्यांत मोडी लिपी.

थोड्याशा युरोपियन ऑफिसरांच्या सुखासाठीं सरकार लाखो लोकांना अडचण करणारी व त्यांच्या मनाला दुखविणारी गोष्ट हट्टानें करण्यास कसें तयार होतें याचें उत्तम उदाहरण ह्मणजे मुंबई इलाखा व मध्यप्रांत यांतून सरकारी व्यवहारांत मोडी लिपीचें उच्चाटन करण्यासाठीं झालेले प्रयत्न हें आहे. मुंबई इलाख्यांतला या प्रश्नाचा इतिहास थोडक्यांत असा आहे कीं गेल्या पांचचारशें वर्षांत तरी महाराष्ट्रांत सरकारी पत्रव्यवहार सगळा मोडी लिपींत चालत असे. मध्यंतरीं मुसलमानांचें राज्य झालें तरी त्यांनीं मोडी लिपीचें उच्चाटन करण्याची गोष्ट मनांत आणिली नाहीं पण

१९०७ सालीं मराठीचे महापंडित व इतिहासज्ञ ह्मणविणारे सुप्रसिद्ध मि. किंकेड साहेब यांच्या डोक्यांत ती कल्पना आली, व त्यांनीं पुण्यास नजाचे जागीं असतांना आपल्याच अधिकारांत मोडी लिपि बंद करून बाळबोध लिपि सुरू केली. पुढें रत्नागिरीचे कलेक्टर मि. मेकॉन की यांनीं १९०९ सालीं आपल्या जिल्ह्यांतून मोडीची हकालपट्टी केली. सुदैवानें १९१० सालीं मि. मेकॉनकी यांची बदली तेथून होऊन मि. घोसळ तेथें अ.के. ते स्वतः हिंदी असल्यामुळें त्यांना हिंदी प्रजेच्या मनोवृत्तींना अशा रीतीनें दुखाविणें बरें वाटलें नाहीं व एक वर्ष मोडीच्या जागीं बाळबोध चालू ठेविल्यापासून दुष्परिणाम ही त्यांनीं सरकारास कळवून पुनः मोडीची प्रस्थापना केली. इतकें झालें तरी मि. मेकॉनकी याचे डोळे उघडले नाहींत. जणूं काय रत्नागिरीस गेलेली आपली इज्जत नाशिकास तरी परत मिळावावी ह्मणून त्यांनीं नाशिकास पुनः तोच प्रयोग केला. त्यांच्या मागून नाशिकास बदलून आलेले मि. बेकर हे एक पाऊल आणखी पुढें गेले, आणि ते व त्यांच्या हाता खालचे अधिकारी यांच्यांत एकवाक्यता नसतां त्यांनीं सरकाराकडे रिपोर्ट करून सान्या मध्यभागांतून मोडीचें उच्चाटन करविणारा हुकुम त्यांचेकडून सोडविला. येवढा मोठा फेरफार करतांना सरकारनें इतर अधिकाऱ्यांचीं मतें विचारलीं नाहींत, किंवा महाराष्ट्र साहित्यपरिषदे सारख्या लोकसंस्थांच्या अर्जास भीक घातली नाहीं ना. मि. उपासनी यांनीं या संबंधाचा ठराव मध्यंतरी कौंसिलापुढें आणिला होता, पण तो त्यांनीं परत घेतला. तथापि निरुत्साह न होतां ना. मि. परांजपे यांनीं तोच ठराव ता. १३ रोजीं पुण्यास भरलेल्या कायदेकौंसिलापुढें आणिला, तेव्हां बराच वादविवाद होऊन अखेर बहुमतानें तो पास झाला. मुंबई सरकारचें अनुकरण मोडी लिपि बंद करण्यापुरतें आमच्या मध्यप्रांताच्या सरकारानें व कोल्हापूर दरबारानें ही केलें आहे. पण परवाच्या कौंसिलांत या प्रश्नाचा अखेर निर्णय लागलेला पाहून त्यांना ही आतां आपला विचार बदलण्याची बुद्धि होते कीं नाहीं हें पहावयाचें आहे. आमच्या मध्यप्रांतांत कोणी ना. परांजपे नाहींत काय?

## आयुर्वेदिक व युनानी वैद्यकाचा अभिमान बाळगणारांस इषारा.

गेल्या आठवड्यांत मुंबई सरकारच्या कायदे कौंसिलापुढें एका महत्त्वाच्या विषयावर बराच कडाक्याचा वाद दोन दिवसपर्यंत सारखा चालला होता. या वादांत आपली बाजू सावरून धरण्याकारितां मुंबई सरकारानें मुद्दाम तीन गृहस्थांना येवढ्या वादापुरते नामदार करून मदतीस घेतले होते, आणि त्यांच्याच मतांचा भर पडल्यामुळें सरकारचो बाजू सावरली गेली. आयुर्वेदिक व युनानी वैद्यक विरुद्ध पाश्चात्य वैद्यक असें या वादाच्या प्रश्नाचें स्वरूप होतें. देशी वैद्यकी पद्धतीनें आज लाखो लोक रोगमुक्त होत आहेत, व कित्येक वेळां इंग्रजी औषधापेक्षां ही देशी औषधें अनुभवानें सरस ठरली आहेत या गोष्टी विरुद्ध पक्षाला कबूल ही कराव्या लागल्या, तथापि त्या जुन्या वैद्यकांची स्थिति साचलेल्या पाण्याच्या डबक्यासारखी आहे. त्यांना चालन मिळालेलें नाहीं व त्यांतील औषधांचें रासायनिक पृथक्करण करण्याचे यत्न आतां पर्यंत कोणीं केले नाहींत. सबबीवर चरक सुश्रुतांसारख्या ग्रंथांस नाकाडोळ्याच्या वैदूंच्या पंक्तीला ना. सर माधवराव चौबळासारख्या वैद्यकीज्ञानशून्य आफिसरांनीं बसविलेलें पाहून अल्पज्ञानाच्या मोडीला अधिकार असला ह्मणजे माणसाची जिव्हा गरळाचे फूत्कार सोडण्यास कशी सामर्थ्यवान होते याची उत्तम प्रचीति आली. नाकाडोळ्यांचे वैदू हे केवळ वनस्पत्यौषधि गोळा करून विकणारे असतात. पदिक वैद्य किंवा हकीम नसतात. त्यांना शास्त्रज्ञान बिलकूल नसतें ही गोष्ट ना. सर माधवराव पाहतात कशाला? अशा रीतीनें चाललेल्या वादांत डॉ० सर नरिमान, व डॉ० राव यांच्यासारख्या डाक्तरांच्या विरुद्ध अभिप्रायांची भर पडल्यावर मग आयुर्वेदिक व युनानी वैद्यकाची कौंसिलांत पूर्णपणें विटंबना झाली यांत आश्चर्य काय? पण या वादविवादापासून या जुन्या पद्धतीच्या वैद्यकांचा अभिमान बाळगणारांनीं एक इषारा अवश्य घेण्यासारखा आहे. तो हा कीं त्यांनीं एक फंड उभारून रसायनशाळा उघडावी व देशी औषधांची रासायनिक- परीक्षा करून त्यांची श्रेष्ठता स्थापित करावी. हें काम करणारा उत्तम रासायनिक आपले देशांत उपलब्ध न झाल्यास अमेरिकेंतून आणावा, पण स्वस्थ बसून आपल्या प्राचीन वैद्यकाची अशी विटंबना झालेली पाहूं नये. आज रजिस्टर्ड डाक्तरांनीं या वैद्यकाशीं नुसता संबंध ठेविणें अपराध मानिला जात आहे. उद्यां सान्याच जनतेनें देशी वैद्यक हे महारोगासारखें वर्ज्य करावें असें फर्मान काढण्याविषयीं कोणी सरकारचें मन वळविणार नाहीं कशावरून? लॉर्ड हार्डिंज साहेबांनीं देशी वैद्यकाची किती ही तारीफ केलेली असली तरी ते व्हाइसरायाचे पदावर होते तोंपर्यंत त्यांच्या शद्धांना मान होता. आतां त्यांना कोण विचारतो? असा प्रकार जेथें आहे तेथें विरुद्ध पक्षाचें त्यांच्याच किल्ल्यांत आक्रमण करून त्याला चीत करणें हें लढणाराचें कर्तव्य आहे. देशी वैद्यकाला शास्त्रीय तत्त्वावर करण्यांत आलेला विरोध त्याच शास्त्रीय तत्त्वांचा पुरावा मिळवून दूर करणें अवश्य आहे.

## कापसाची लागवड.

हिंदुस्थानांत लांब धाग्याच्या कापसाची लागवड करण्याचा प्रश्नाचा विचार करण्याकरितां हिंदुस्थानानें नुकतीच एक कमिटी नेमिली आहे. ही कमिटी या प्रश्नाचा विचार हिंदी शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीनें करील व लांब धाग्याचा कापूस पिकाविण्यांत म्यांचेस्टरची सोय किंवा गैरसोय हें न पाहतां हिंदुस्थानचा त्यांत लाभ आहे असें दिसून आल्यास तसें करण्याविषयींच्या व्यावहारिक सूचना करील अशी आह्मी उमेद बाळगतों. हिंदुस्थानांतले शेतकरी लांब धाग्याचा कापूस कां पिकवीत नाहींत याचा आमच्या दृष्टीनें हें कारण आहे कीं हा कापूस पिकविण्यास हिंदुस्थानची जमीन असावी तितकी अनुकूळ नाहीं, त्याला पैसा व परिश्रम अधिक लागतात, व तिसरें कारण, हिंदुस्थानांतल्या गिरण्या तलम सूत काढण्याइतक्या स्थितीला अद्याप आल्या नसल्यानें लांब धाग्याचा कापूस पिकविल्यास गिऱ्हाइकीसाठीं म्यांचेस्टरकडे पहावें लागेल अशी त्यांना भीती वाटते. हिंदुस्थानांतील सामान्य जनता जाडेभरडे कापड वापरणारी आहे, व अशा कपड्यास आंखुड धाग्याचा कापूस चालतो. तो येथल्या येथें पिकवून येथल्या येथें गिरण्यांस देणें शेतकऱ्यांस सोयीचें पडतें व येथील गिरण्यांस साह्य करण्यानें आपण देशी उद्योगास उत्तेजन दिलें असें समाधान ही त्यांस वाटतें. लांब धाग्याचा कापूस पिकाविल्यास त्याचा उपयोग इकडील गिरण्यांना न होतां परदेशी गिरण्यांना होईल हा मुद्दा आमच्या दृष्टीनें विचार करण्यासारखा आहे

## शेतकऱ्यांचें अज्ञान.

हें ही लांब धाग्याच्या कापसाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्याच्या आड येईल असें आह्मांस वाटतें. लांब धाग्याच्या कापसाच्या लागवडीस बीं उत्तम जातीचें व निर्भेळ असावें लागतें. प्रथम कांहीं वर्षें सरकारनें अशा बियांचा पुरवठा केला तरी कालांतरानें अडाणी शेतकरी भेसळ केल्यावांचून राहावयाचे नाहींत, व अशा मिश्र बीजापासून पिकणारा कापूस धड लांब धाग्याचा नाहीं व धड आंखुड धाग्याचा नाहीं असें होऊन सदर कापसाला गिरणीवाले विचारीतनासे होतील त्यामुळें शेतकऱ्यांचें नुकसान होण्याचा संभव आहे. भेसळ न होऊं देण्याबद्दल सरकारला कायद्याच्या द्वारें तजवीज करतां येईल ही गोष्ट खरी आहे. पण अशा कायद्याच्या कचाटींत सांपडून दंड भोगण्यापेक्षां चालत आलेली परंपरा सोडूं नये असें शेतकऱ्यांना वाटण्याचा विशेष संभव आहे. ही अडचण दूर करण्यास उत्तम उपाय ह्मणजे शेतकऱ्यांमध्ये शिक्षणाचा प्रसार जितका लवकर करतां येईल तितका करणें हा आहे. पण लांब धाग्याचा कापूस इकडे पिकविण्या विषयीं सरकारची जितकी आतुरता दिसते तितकी शेतकऱ्यांना शिक्षण देऊन शहाणे करण्याविषयीं दिसत नाहीं ही शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे.

## हिंदी तरुणांस उपदेश.

गेल्या आठवड्यांत एकाच वेळीं मुंबईचे गव्हर्नर ना. लॉर्ड विलिंग्डन यांनीं पुण्याच्या डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांना व मुंबईस मिसेस बिझांट बाईनीं तेथील तरुणांना राजकारणसंबंधीं उपदेश केला. दोघांची ही दृष्टि विद्यार्थ्यांच्या हिताकडेच होती यांत शंका नाहीं. तथापि ध्येय एकच असलें तरी तें साधण्याचे मार्ग भिन्न भिन्न प्रकारचे असूं शकतात. तशी भिन्नता या दोन्ही उपदेशांत चांगली दिसून येत आहे. लाटसाहेबांनीं आरंभींच हिंदुस्थानच्या राजनिष्ठेबद्दल व हिंदुस्थानचें ध्येय त्याला नबाबदार राज्यपद्धती देण्याचें आहे याबद्दलचा उल्लेख करून हल्लीं पुढारी वाटतील तशी निराधार विधानें करतात याबद्दल खेद प्रदर्शित केला आणि विद्यार्थ्यांनीं परप्रत्ययनेयबुद्धि न होतां स्वतः महत्त्वाच्या विषयावर विचार करावा असा उपदेश केला. उपदेश स्तुत्य आहे, आणि तो समयोचित ही आहे. परंतु विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रश्नासंबंधानें विचार करण्यास लागणारी साधनें मिळविण्याच्या आड सरकारची सर्क्युलरें येत असतात ही स्थिति कायम राहील, आणि तरुणांना त्यांच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचीं व्याख्यानें ऐकण्याची सुद्धा बंदी राहील तों पर्यंत त्यांनीं विचाराचीं साधनें कशीं मिळवावयाचीं या प्रश्नाचा उलगडा लॉटसाहेबांनीं करावयास पाहिजे होता. हल्लीं या सरक्युलरामुळें एकतर्फी विचार त्यांना कळतात, पण खुद्द त्यांचे राष्ट्रीय पुढारी कोणत्या दृष्टीनें प्रचलित विषयाकडे पाहत आहेत हें कळण्यास त्यांना मार्ग नाहीं, आणि असें जोंपर्यंत आहे तोंपर्यंत स्वतंत्र विचार करतां येणें त्यांना शक्यच नाहीं. ह्मणजे विचाराच्या बाबतींत ही परदेशीयांची गुलामगिरी पतकरली पाहिजे असें होत नाहीं काय? मिसेस बिझांट यांचा उपदेश योग्य जबाबदारी ओळखून केलेला व राष्ट्रहितसाधक असा होता. हल्लीं जगांत सर्वत्र लोकसत्ता वाढविण्याची चळवळ कशी जोरानें सुरू आहे त्याविषयींची थोडीशी कल्पना श्रोत्यांना करून देऊन त्यांनीं सांगितलें कीं या चळवळीचें प्रतिबिंब हिंदुस्थानच्या प्रचलित राजकीय चळवळीवर स्पष्टपणें पडलेलें आहे अशा वेळीं हिंदुस्थानच्या तरुणांनीं आपलें कर्तव्य करण्यास पुढें झालें पाहिजे. स्वतंत्रता ही फुकाची गोष्ट नाहीं. ती दीर्घपरिश्रम व जबाबदारीचें ज्ञान यांनींच प्राप्त होत असते. लोकांसाठीं कायदे करण्यापूर्वी लोकस्थितीची खडानखडा माहिती करून घ्यावयास पाहिजे. आरोग्याचा प्रश्न फार महत्वाचा आहे. अर्भकांच्या मृत्यूचें प्रमाण भयंकर झालें आहे. या प्रश्नांविषयींची माहिती मिळवा, तिच्यावर विचार करा. हिंदुस्थानचा खराखरा हिंदी लोकांनीं लिहिलेला इतिहास वाचा, आणि पूर्वजांचा अभिमान धरून त्यांना शोभेल असें वर्तन करा. माझी कातडी गोरी असली तरी मी अंतःकरणानें हिंदीच आहे, आणि पुढचा जन्म हिंदुस्थानांत मिळावा अशी परमेश्वरास प्रार्थना करतें. लाट साहेबांचा एकतर्फी, तात्विक आणि निर्जीव उपदेश कोणीकडे आणि बिझांट बाईचा हा व्यावहारिक आणि सोज्वळ उपदेश कोणीकडे!

## विद्यार्थ्यांची लढाई

**( सत्याग्रहाचा उपक्रम )**

रिस्ले सर्क्युलरइतकी मोठी घोडचूक क्वचितच सरकारच्या हातून घडली असेल आणि या मृतप्राय सर्क्युलराला पुनः जीव आणण्याचा जो सरकारी दांडगा प्रयत्न चालू आहे त्याचीं विषफळें आतां सर्वत्र दिसूं लागलीं आहेत. या अंकुशानें विद्यार्थ्यांना हत्तीसारखें राजकीय समांतून बाहेर काढतां येते. या सरकारी नियमनाबद्दल विद्यार्थ्यांचा पालकवर्ग प्रतिकूळ आहे; पण

दुसरा मार्ग खुला नाहीं ह्मणून निरुपायास्तव तरुण पिढीच्या कल्याणदृष्टीनें पालकांना या रिस्लेदंडापुढें मान वाकवावी लागत आहे. आमच्या राष्ट्रांतील जे कांहीं अद्भुत कायदे आहेत त्यांपैकींच हा विद्यार्थ्यांचा कायदा होय. पृथ्वीवरील कोणत्याही राष्ट्रांत असा कायदा नाहीं, आणि सरकार जेव्हां विद्यार्थ्यांना राजकीय सभास गेल्याबद्दल त्यांना दंडाची शिक्षा सुनावतात, त्यांना शाळेबाहेर हाकलून देतात. किंवा विद्यामंदिरें बंद करितात तेव्हां सरकारच्या या विद्याखात्याला पोलिसखातें ह्मणावे किंवा तुरुंग खातें ह्मणावें हें कळत नाहीं. विद्यार्थ्यांचीं मनें विकास पावतील असें हें रिस्ले सार्कीलर नाहीं इतकेंच नव्हेतर विद्याखात्याच्या मौलीभूत तत्वज्ञानाला येथें तिलांजलीच दिली जाते.

या सार्कीलरानें विद्यार्थी व त्यांचे पालक यांच्यामध्यें वैमनस्य आणलें आहे. जेथें पालक आपल्या राष्ट्रांतील थोर थोर महात्म्यांचें विचारामृत पिण्यासाठीं धाव घेतात त्या सभांना त्यांना आपल्या चिरंजीव मंडळीस तो सुखसोहळा पाहण्याला देखील नेतां येत नाहीं. अशा या कृत्रीम शिस्तीच्या दडपणाखालीं विद्यार्थीवर्ग चुरडून जात चालला आहे आणि पितृवर्गाकडून जेथें आसेचा किरण ही मार्गावर प्रकाश पाडीत नाहीं व सरकारी ही रिस्ले शिस्त इतकी बोकाळते कीं विद्यार्थी निराश व निर्गीतिक हारिणाप्रमाणें होऊन सरकारी शिकारीपुढें सैरावैरा धावूं लागले आहेत.

खुद्द नागपूर येथील डायरेक्टर साहेबांच्या प्रत्यक्ष नेतृत्वा खालीं चाललेलीं विद्यामंदिरें विद्यार्थ्यांच्या या सैरावैरा वृत्तीमुळें ओस पाडावीं लागलीं आहेत. नागपूरचें हिस्लॅाप कॉलेज, मॅारिस कॉलेज, न्यू इंग्लिश स्कूल, नीऊसिटी हायस्कूल, यू. एफ. चर्च मिशन स्कूल इत्यादि शालागृहें कुलुपें लावून बंद करण्यांत आलीं आहेत. प्रत्येक गोष्टीला मर्यादा असते, तशा या सरकारी पद्धतीला ही कांहीं मर्यादा असल्या पाहिजेत. ज्या विद्यापद्धतींत प्रेमाची नीति नाहीं ती विद्या खरी पावनी नसून कधींही यशस्वी होणार नाहीं. विद्यार्थ्यांच्या मनांतल्या बीजशक्ती जेथें अंकुर पावत नाहींत व त्या सडून जातात तेथें विद्यादानाच्या खऱ्या मर्यादा सुटल्या असें ह्मटल्या वांचून राहावत नाहीं. सरकारी हा रिस्ले प्रयोग आतां मर्यादे बाहेर पोचला आहे तेव्हां विद्याखात्याची पुनर्घटना नव्या नव्या उज्वल तत्वावर पुनः लवकर झाली पाहिजे.

जो प्रकार नागपुरास घडून आला तसाच जबलपूरच्या रॉबर्टसन कालेजांत घडत आहे असें कळतें. येथील कांहीं विद्यार्थी राजश्री टिळकांच्या व्याख्यानाला गेले होते ह्मणून त्यांना शाळेबाहेर अटक करण्यांत येणार आहे व प्रसंगीं सर्व विद्यार्थीच ही अटक कबूल करून शाळा सोडतील कीं काय अशी भीती आहे. वर्धेलाही असाच प्रकार घडला. यवतमाळच्या हायस्कूलासंबंधानें ही कांहीं गडबड ऐकूं येते आणि बाकीच्या ज्या ज्या प्रांतिक शाळांच्या रंगभूमीवर हें नाटक दृष्टीपुढें आलेलें नाहीं तेथें विद्यार्थ्यांच्या मनानें हें नाटक कितीदां तरी होऊन गेलेलें त्यांच्या बोलण्या चालण्यावरून दिसून येतें. हें रिस्ले सर्कीलर वय आणि गुण यांच्यामध्यें बिलकुल भेदभाव ठेवीत नाहीं. प्राथमिक शाळेंतल्या शिशुवर्गापासून तर कॉलेजांतल्या एम. ए. एल्. एल्. बी. च्या विद्यार्थ्यांपर्यंत हें सार्कीलर दरवेशाप्रमाणें सर्वांना पशूंच्या कोटींत आणून बसविते.

या सर्किलराचा खरा परिणाम निराळाच घडला आहे. विद्यार्थ्यांची कुतूहलदृष्टी सर्व पृथ्वीवर सारखीच असते. अमुक गोष्ट नको ह्मटलें कीं त्यांची जिज्ञासा त्याच गोष्टीकडे अधिक धाव घेते आणि या रितीनें हल्लींच्या राजकीय गोष्टी विद्यार्थ्यांना वाचनद्वारां व पृच्छेच्या द्वारानें अधिक माहित झाल्या आहेत. श्रीमती बिझांटबाई आदिकरून थोर थोर व्यक्तींना अटक होते आणि ती अटक दूर होत नाहीं ह्मणून जसे राष्ट्रांतले लोक निःशस्त्र प्रतिकाराचा ब्युगल वाजवितात त्याप्रमाणें आमच्याच पाऊलावर पावलें टाकून विद्यार्थ्यांनीं जर आपल्या पवित्र व उच्च वातावरणांत सत्याग्रहाचा निश्चय केला तर त्यांत गैर तें काय बरें! गेल्या १३ तारखेला नागपुरास सुमारें हजार प्रौढ विद्यार्थ्यांची सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं राजश्री अबदुल हमीदखान बि. ए हे होते. हे एम. ए. व बि. ए या परीक्षांचा अभ्यास करीत असतात. त्याच सुमाराला श्रीमती बिझांटबाई नागपूरला यावयाच्या होत्या. विद्यार्थी या सभेंत रिस्ले सार्कीलराचें सुदर्शन काढून घेण्याविषयीं श्रीमान् सरकारास विद्यार्थी विनंती करतात आणि योग्य मुदतींत नीट उत्तर न मिळाल्यास आह्मी राजकीय सभास हजर राहूं असें ही विद्यार्थी जाहीर करतात. हा विद्यार्थ्यांचा सात्वीक सत्याग्रह ह्मणा किंवा क्रांतिकारक बंड ह्मणा; पण त्यांना हा मार्ग स्वीकारावा लागला आणि त्यांनीं जो मार्ग स्वीकारला तोच सर्व हिंदुस्थानांतलेच काय पण पृथ्वीवरील सर्व विद्यार्थी आपल्या सद्वर्तनानें व उन्नत आकांक्षांनीं राजमार्ग ह्मणून निःसंशय चालू लागतील. इंग्लंडचे प्रधान राजश्री लॉईड जॉर्ज यांनीं ह्मटल्या प्रमाणें हा प्रस्तुतचा काल इतका अद्भुत आहे कीं ज्या गोष्टी शेंकडो वर्षांत आह्मी शिकलों नाहीं त्या आतां अगदीं थोड्या काळांत आह्मी शिकत आहों आणि सांप्रतच्या प्रचंड लढेबरोबर आह्मा प्रमाणेंच सरकारनें ही या तरुण पिढींत उदय पावणाऱ्या भावी राष्ट्रास सुधारणेच्या शिखराकडे नेण्याला प्रेमानें कंबरा बांधून तयार राहिलें पाहिजे.

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांतली मोठी महत्वाची गोष्ट ह्मणजे बालटिक समुद्रांतली जर्मन लोकांची चळवळ ही होय. दोन तीन आठवड्यांपूर्वी रशियांत भरलेल्या डेमोक्रॅटिक सोशियालिस्ट कॉनफरन्समध्यें मॉ. केरेंझस्की यांनीं एक जंगी जर्मन काफिला फिनलंडकडे येत असल्याची बातमी सांगून लोकांना आश्चर्यचकित करून सोडलें होतें. ती बतमी खरी ठरली. जर्मन काफिला फिनलंडपाशीं येऊन पोहोंचला व शत्रूंनीं अरेन्सबर्ग वगैरे काहीं ठिकाणें सर केलीं. शत्रु येत आहे ही आगाऊ बातमी असतां ही त्याला प्रतिबंध करण्याची कांहीं तजवीज रशियाला करतां आली नहीं यावरून अंतःस्थ अशांततेमुळें रशियाला आलेली दुर्बलता मात्र स्पष्ट दिसते. पेट्रोग्राडवर जामिनीवर चाल करून जाण्याचे यत्न शत्रूंनीं पूर्वी एक दोन वेळां करून पाहिले, पण ते निष्फळ झाले. ह्मणून समुद्राच्या बाजूनें शत्रूनें या खेपेस चाल करून पाहिली आहे असें कित्येकांचें ह्मणणें आहे. पारिसच्या टॅम्प्स पत्राला तशी भीती वाटत नाहीं. जर्मन आरमाराच्या या चालीचा उद्देश रिगाच्या आखातांतलीं व्यापारी जहाजें नष्ट करण्याचा आहे असें हें पत्र ह्मणतें. दुसरी अशी ही शंका येते कीं फिनलंड व कोरलंड यांच्यावर शत्रूचा कटाक्ष असावा. ही शंका केवळ निराधार असेल असें फिनल्यांडच्या आतांपर्यंतच्या इतिहासावरून वाटत नाहीं.

---

## फिनल्यांडचें स्वातंत्र्य.

ज्या खाडीच्या मध्यभागीं रशियाची राजधानी पेट्रोग्राड आहे त्याच खाडीच्या एका किनाऱ्यापासून तों स्वीडनपर्यंत फिनलंडचा प्रदेश पसरलेला आहे. रशियाचे सम्राट दुसरे निकोलस पदभ्रष्ट झाल्यापासून या प्रांतांतल्या लोकांचे स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं यत्न चालले आहेत; पण रशियन सरकारनें जबरदस्तीनें त्यांना दास्यांत ठेविलें आहे. त्यानंतर मध्यंतरीं बरेच दिवसपर्यंत तिकडची कांहीं बातमी आली नव्हती, पुनः अकस्मात् बातमी आली कीं हल्लींच्या रशियन सरकारनें फिनल्यांडला प्रजातंत्री राज्यपद्धति देऊन त्याचें स्वातंत्र्य कबूल केलें. याप्रमाणें पोलंडसारखा हा ही प्रदेश रशियाचे राज्यांतून अलग निघाला ही बातमी दोन तीन ओळींतच आल्या कारणानें फिनल्यांडला हे स्वातंत्र्य कसें मिळालें, त्यावर राज्य करण्यास रशिया असमर्थ झाल्यामुळें कीं जर्मनीचा प्रभाव फिनिश लोकांवर पडल्यामुळें हें घडून आलें याचा कांहींच उमज पडेना. मागें रशियानें पोलंडला ही स्वातंत्र्य दिलें होतें. पण केव्हां? जर्मन सैन्य पोलंडमध्यें घुसून त्याची राजधानी वार्सा बावर चाल करण्यास निघालें आणि तो प्रदेश आपल्या स्वाधीन राखण्यास रशिया अगदीं असमर्थ झाला तेव्हां. फिनल्यांडच्या स्वातंत्र्य प्राप्तीचें ही असेंच कांहीं रहस्य आहे कीं काय न कळे. त्यानंतर आतां तेथें जर्मन काफिल्यानें आक्रमण केल्याची व कांहीं शहरें ही घेतल्याची बातमी येते. यावरून फिनल्यांडला मिळालेल्या स्वातंत्र्याशीं या जर्मन आक्रमणाचा संबंध जोडून देण्यास लोकांना एक आयती संधी मिळालेली दिसते.

---

## परीक्षेची वेळ.

जर्मन काफिल्यानें एसेल व डागो बेट घेतल्याचें मागेंच प्रसिद्ध झालें आहे. पण रिगाच्या आखाताचा पश्चिम मार्ग हस्तगत झाल्याशिवाय रिगा घेण्यापासून शत्रूचा कांहीं एक फायदा होणार नाहीं असें पेट्रोग्राडमधल्या लोकांचें मत आहे. हा मार्ग रशियन लोकांनीं दोन वर्षांपूर्वी हातीं लागलेलीं जर्मन जहाजें दगड व सीमेंट भरून समुद्राच्या तळाशीं सोडल्यामुळें बंद करून टाकिलेला आहे. एसेल व डागो हीं ठिकाणें जर्मन वैमानिकांना मात्र केंद्र ह्मणून चांगलीं उपयोगीं पडतील. या केंद्रापासून पेट्रोग्राडवर झेपलिनचें आक्रमण सुलभ होण्याचा संभव आहे. जर्मन काफिला येणार अशी नक्की बातमी मॉ० केरेंझस्की यांना कळल्याबरोबर आतां आपल्या परीक्षेची वेळ जवळ आहे असे उद्गार त्यांनीं काढले होते, ती परीक्षेची वेळ आतां आली आहे. आतां रशियन आरमार या प्रसंगाला कसें काय तोंड देते तें पाहणें आहे.

---

## पश्चिम रणक्षेत्रांत.

पश्चिम रणक्षेत्रांत ब्रिटिश, फ्रेंच, बेलज्यन, व कदाचित् अमेरिकन इतकीं सैन्यें मित्रराष्ट्रांच्या वतीनें लढत आहेत. पैकीं अमेरिकन सैन्याचें नांव कोठेंच ऐकूं येत नाहीं. बेलज्यन सैन्याच्या कामगिरीबद्दल क्वचित् एखादे वेळीं बातमी येते. फ्रेंच सैन्य मधून मधून चांगली कामगिरी करतें. पण ब्रिटिश सैन्याच्या विजयाच्या बातम्या मात्र अलीकडे वरचेवर येत असत. या रणक्षेत्रांत तोफखान्यांचें भीषण युद्ध आज कित्येक महिने सारखें चाललें आहे, आणि ब्रिटिश फौज बहुतेक प्रसंगीं यशस्वीच होत आली आहे. तथापि ब्रिटिश फौजेचें पाऊल फारच संथपणानें पुढें पडत आहे. गेल्या आठवड्यांत मात्र वादळी व पावसाळी हवेनें खराबा केला, आणि ब्रिटिश फौजेच्या हातातोंडाशीं आलेला एक विजय तिला मिळूं दिला नाहीं.

---

## महत्त्वाच्या बातम्या.

जर्मन कैसर कान्स्टांटिनोपल येथें लवकरच सुलतानाच्या भेटीला जाणार आहे. बगदादकडे चाललेल्या लढाई संबंधानें निरीक्षण करून कांहीं बेत ठरविण्याचा पुढचा विचार कदाचित् असेल.

शत्रूला रेल्वेचे वगैरे रस्ते करण्याकरितां लागणारी खडी पुरविल्यानें हालंडनें तटस्थ वृत्तीचा भंग केल्यावरून ग्रेट ब्रिटन व हालंड यांच्यामध्यें मनोमालिन्य उत्पन्न झालें होतें, पण तें मिटलें अशी बातमी मुंबईंत एका खाजगी व्यापारी कंपनीकडे आली आहे.

बेलो, टर्मेल व आणखी कांहीं इसम यांच्यावर फ्रेंच सरकारनें राजद्रोहाचा आरोप ठेविला असून त्यांची चौकशी कोर्ट मार्शल मार्फत होण्याचें ठरलें आहे. बोलो याचा वर्तमानपत्राशीं संबंध असून यानें जर्मनीकडून लाच घेऊन वर्तमान पत्रांत लेख लिहविले असा आरोप आहे. टर्मेल यानें जर्मनीला गुरें विकलीं असा त्याचेवर आरोप आहे.

मागच्या शनिवारीं लंडनच्या बाजारांत चहा, साखर, तांदूळ, लोणी, वगैरे जिंनस कोठें ही मिळेनात अशी स्थिति झाली होती.

पार्लमेंटची बैठक पुनः सुरु झाली. सध्यांच्या पार्लमेंटची मुदत संपत आल्या कारणानें आणखी ६ महिने ती वाढविण्यासंबंधाची सूचना येणार आहे.

मुंबईच्या पोस्टमनांचा संप संपला व ते कामावर गेले तरी त्यांच्यांतल्या सगळ्या लोकांना बढती मिळाली नाहीं व संपाच्या दिवसाचा पगार ही कोणाला देण्यांत येणार नाहीं. या दोन गोष्टीमुळें पुनः ते लोक संप करतील अशी बातमी हिंदुस्थान सरकारला लागल्यावरून त्यांनीं एक पत्रक काढून असें जाहिर केलें आहे कीं पुनः संप झाल्यास तो मोडण्यासाठीं फार कडक उपायांची योजना करण्यांत येईल.

नजरबंद केलेल्या लोकांपैकीं ९० बंगाली तरुणांना आपापल्या घरीं जाऊन तेथें पोलीसच्या नजरेखालीं राहण्याची परवानगी मिळाली आहे अशी बातमी आहे.

राजपुतान्यांतलें थंड हवेचें ठिकाण मौंट अबू हें सिरोही राज्यांत होतें तें हिंदुस्थानसरकारनें त्या संस्थानापासून घेतलें आहे असें कळतें.

दरसाल दोन हिंदी साहित्यसंमेलनें भरवावीं पैकीं एकानें केवळ हिंदी भाषेच्या उन्नतीच्या उपायांचा विचार करावा व दुसऱ्यानें केवळ हिंदी भाषेचा प्रसार करण्याचें काम करावें अशी एक सूचना करण्यांत आली आहे.

बहारप्रांतांत बकरीइदच्या दिवशीं झालेल्या दंग्यांचा संबंध पायोनियर प्रभृति इंग्रजी पत्रांनीं मि. गांधी व मिसेस बिझांट यांच्याशीं कसातरी जोडून मोठें अकांड तांडव चालविलें आहे. जपानानांत जें जंगी वादळ होऊन लाखो लोक उघडे पडले तेही मिसेस बिझांट यांची सुटका केल्यामुळेंच असें पायोनियरनें म्हटलें असतें तरी तितकेंच शोभलें असतें.

# व-हाडवृत्त.

**हवामानः**— चित्रेच्या उन्हानें पिकें फोफावत चालली असून प्रस्तुत सृष्टि सौंदर्य डोळ्यांना आपलें साफल्य करण्यास शिकवीत आहे. आरोग्य संपदा ही वाढत्या प्रमाणावर आहे.

**प्रांतिक मागणीः**— व-हाडची मागणी रा. मांटेग यांच्यापुढें मांडण्यासाठीं काल रोजीं उमरावतीस सभा भरून प्रांतिक कांग्रेस कमेटीचा विचार होण्याचें ठरलें आहे.

रा. रा. एफ्. जी. स्लाय हे चंपारण्याकडील कमिशनचें काम पुरें करून पुनः येथील सेक्रेटरीअटमध्यें स्पेशल कामावर रुजू होतील.

रा. रा. रामचंद्र सिंह तहशीलदार खेरागड यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर करून यवतमाळला बदलण्यांत आलें.

रा० रा० दामोदर बळवंत फाटक यास बाळापूरचे नायब तहशीलदार राजश्री नुरुद्दीन हे रजेवर गेल्याकारणानें तेथेंच नायब तहशलिदार नेमलें आहे हें कळविण्यास आनंद वाटतो.

रा. रा. जोन्स, मारिस कालेजचे प्रिन्सीपाल यांस वायव्य सरहद्दीवर बदली देण्यांत आली.

रा. रा. सैफुद्दीनखान लालखान ए. असि कमि. नरसिंगपूर यांस नागपुरास बदललें.

रा. रा. मॉ साहेब कमिशनर नागपूर यांच्या कडेसच इन्स्पेक्टर— जनरलचें जादा काम देण्यांत आलें.

**सलामीः**— सर हेनरी जान स्टानिअन आडि. जुडिशिअल कमिशनर हे आजपासून पेनशनदार होतील आणि तेव्हां त्यांच्या झणझणित पण दोषदृष्टीच्या निवाड्यांची आठवण बुजली तरी त्यांचें कायदेपांडित्य स्मरणीय राहील. त्यांस विश्रांतीचीं सौख्यें लाभोत असें म्हणून आम्ही त्यांस सलाम करितों.

रा. रा. शहामहमद इषाख तहशीलदार, चिखली यांस एक्स्ट्रा असि. कमिशनर करून उमरावतीला नेमिलें ही आनंदाची गोष्ट होय.

**गंगाजली मंडळः**— प्रांतिक कौन्सिलाची फायनान्स कमिटींत तीन बिनसरकारी सभासद निवडण्याची सभा नागपुरास १२ नोवेंबरला होणार आहे तेव्हां खंबीर लोकच पुढे येवोत.

रा. रा. दशोत्तर, मुनसिफ यांस उमरावतीच्या स्मालकाज कोर्टाला जज्ड अधिकारी नेमिलें.

बेंच—माजिस्ट्रेटीवर नेमून खालील गृहस्थांस गौरवांनें या लोककार्याला बोलाविले आहेः—

**अंजनगांव**— रा. रा. राजाराम तुकाराम
वल्लभदास चुनिलाल राठी.

**दर्यापुर**— रायसाहेब हरलाल रामसुक
दिनाजी बिठोबा.
गणपतराव भगवंतराव देशमुख.
यशवंत भिकाजी देशमुख
कुवारसिंग मोहनसिंग

रा. रा. सय्यद अबदुल कादर तहशीलदार यांस रजा संपतांच चिखलदऱ्यास नेमिलें.

नामदार कर्नल राबिनसन इनस्पेक्टर जनरल हे आज येथें येऊन गुरुवारीं मूर्तिजापुराला व नंतर यवतमाळाला जातील. आरोग्याच्या गोष्टी ह्यांच्या हातांत आहेत.

**युद्ध-कर्ज**— व-हाड व मध्यप्रांत यांची या कर्जाकडे वर्गणी २० कोटी ८७ लक्षावर ६ अक्टोबरलाच पोंचली आहे.

**राष्ट्रदिन**—स्थानिक अधिकाऱ्यांनीं येत्या १२ डिसेंबरचा महोत्सव भव्य प्रमाणावर करण्याचा संकल्प केला असून पोटसभांचीं कामें आखलीं जात आहेत.

**गंधर्व-बहारी**—आकोल्यास हीं संगीत नाटकें अधिक सरस व मनोहर होत असून चाहू ललितेत्सर्वांत गुण लुब्ध प्रेक्षकजन गर्क आहेत. राजश्री राजहंस यांस त्यांच्या नैपुण्याबद्दल सरकस कंपनीच्या मालकांनीं गेल्या शनवारीं पदक बक्षिस दिलें. येत्या बुधवारीं मूकनायकाचा प्रयोग होईल.

**सिंहाचें साम्राज्यः**—येथील पटवर्धन सरकस कंपनीनें लहान मुलांची कसरत व सिंहासारख्या श्वापदापासून उंदिरापर्यंतचें प्रेमसाम्राज्य हीं दाखवून प्रेक्षकाकडून धन्यवाद मिळविले आहेत.

**नाट्यव्याकोशः**— अखेर 'झुंझुरावा'चा प्रयोग येथील कांहीं मित्र मंडळीच्या प्रसादानें श्रीराम रंगमंदिरांत पाहण्यास मिळाला. विद्वान लोक रंगभूमीवर येतात तेव्हां त्यांनीं नाटक मंडळ्यास आदर्शभूत होऊन कवीच्या हृदयांत शिरण्याची कला लोकांस शिकविली पाहिजे. करमणुकीचे खानगी उत्सव खानगीच राहावे. तिकिटें लावून लोकांस त्यांचे मूल्य ठरविण्यास सांगू नये. नाट्यकला ही नववधू सारखीच असून आडदांड खेळाडूंना वश होणारी नाहीं. बाकी व्यक्तिशः रा. हातवळणे व डॉ. भिडे यांनीं आपलें नैपुण्य वाटेल त्याच्याबरोबर रंगून मलीन होऊं देऊं नये.

**परग्रामस्थः**— हे आकोल्यास आले असतांना येथील म्युनसिपल सडका, रोषनाई, रेल्वेच्या ३ ऱ्या वर्गाचें विश्रांति गृह, भाड्याचे टांगे इत्यादि विषयींच्या लोकांच्या अडचणी दूर करण्याविषयीं येथील म्युनिसिपालिटीस व रेल्वेस विनंती करीत आहेत, तसेच येथील लायब्ररीत वर्गणीदारांशिवाय इतरांस मज्जाव होत असतो तो काढून टाकण्याविषयीं व लायब्ररीची उपयुक्तता खुल्या दिलानें वाढविण्याविषयीं त्यांची शिफारस आहे.

**जाहिर प्रार्थना**—गेल्या मंगळवारीं आमचे येथील तरुण पुढारी रा० रा० नाना साहेब दाते यांच्या अध्यक्षते खालीं श्रीराम थिएटरांत जाहिर सभा भरून रा० रा० महमद अली व शौकत अली आणि तसेच इतर अटकेंतील गृहस्थ यांस मुक्त करण्याविषयीं सरकारास जाहिर प्रार्थना करण्यांत आली आणि कांग्रेसच्या मुख्य धोरणाला अनुसरून पुढील कार्यदिशा निश्चित करण्यात आल्या. राजश्री महमदयुसफ महमद नाजिरुद्दीन, दिवे, बापट, चिपळूणकर, व अध्यक्ष यांचीं संभाषणें मोठीं प्रोत्साहनपर झालीं.

**पंक्तिप्रपंच**—एक प्रतिज्ञेवाले शिक्षक उमरावती जिल्ह्यातील जिल्हा बोर्डाच्या ताब्यांतील शाळा शाळांमधून होणाऱ्या अन्यायाच्या बदल्या संबंधानें फार कळकळीनें लिहित आहेत तेव्हां मेहरबान इन्स्पेक्टर साहेब याबद्दल विशेष चौकशी करून यथागुण ज्याचें त्याला वेतन पोचते करतील असा आम्हांस भरंवसा वाटतो.

रा० रा० सी० जे० लेक्टवीच दारूगोळ्याचे कंट्रोलर मध्यप्रांत यांनीं असें जाहिर केलें आहे कीं दगडी कोळसा जो मंजूर केलेल्या इन्डेंटाप्रमाणें पुरविण्यांत येत असे तो यापुढें ही मुंबईच्या व नागपूरच्या कंट्रोलरनीं मंजूर केलेल्या इंडेंटाप्रमाणें देतांना जितका अवश्यक तितकाच तो पुरविण्याची तजवीज केली जाईल.

## नोटीस

(१) (नोटिस) जनाब कीबला. अमदी सा० १ मीरसादतअली. २ व मीरवशारतअली बा॥ इस्माईलअली रा. मौजे काळी ता. पुसद जि. यवतमाळ

यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आपली त्रिवर्गाची स्थावर व जंगम मिळकत अद्याप एकेच ठिकाणीं आहे. आणि रिकार्ड ऑफ राईटच्या प्रकर्णांत इस्टेट एकेच ठिकाणीं असल्याचे व माझा एक त्रितीयांश हिस्सा वाटून देण्याचा आहे असें आपण कबूल केल्यावरून सदर्हू प्रकर्णाचा निकाल सन १९१४ सालांत झाला आहे. व आपण तिचांचे नांवानें नोंदणी बुकांत नोंद ही झाली आहे.

(२) दुसरे वरील तक्रारी प्रकर्णांत वि॥ सब डिवीजन ऑफिसर साहेब तालुके पुसद यांचे समक्ष तारीख १८।३।१९ इ. रोजीं तुम्ही करारनामा दाखल केला कीं, आम्ही एकेच ठिकाणीं आहोंत. व मजला एक त्रितीयांश हिस्सा सर्वत्र स्थावर जंगम मिळकतींतून देण्याचा आहे म्हणून दाखल केला आहे तो मिसलेंत सामील आहेच, त्यावरून तारीख १८।३।१९ इ. रोजीं तक्रारी प्रकर्णाचा निकाल झाला आहे.

(३) स्थावर जंगम इस्टेट जी कांहीं आहे तिची आम्ही कांहींच अफरातफरी व छपावणो वगैरे लबाडीनें करणार नाहीं व मीरआफजलोद्दीन (नोटिस देणार) यांस बरोबर वाटून देऊं अशा बद्दल खानेखुदा म्हणजे मसजीदींत पंचा समक्ष तारीख ११।५।१७ इसवी रोजीं इमान केले. व हिस्सा बरोबर वाटून देण्याचे कबूल केले.

(४) वर इमान केल्याप्रमाणें मौजे पोखरी मुक्कामीं इजारा मौजे कोनदरी येथील जमीन पंचाचे समक्ष माझे हिश्याची जमीन व घरें वाटणी करून दिली परंतु ताब्यांत दिली नाहीं.

(५) त्याच प्रमाणें मौजे काळी येथील सर्वत्र स्थावर जंगम मालाचा व मौजे कवडगांव मौजे पेढी माळवाकद बोंढारा वगैरे स्थावर जंगम मालाचा हिस्सा करून ठराव ता. २३।६।१७ इसवीस झाला कीं, वाटणी पत्रकाची नोंद होईपर्यंत माझा हिस्सा पंचाचे मार्फत देण्याचा ठरला व पंचांनीं मजला त्याजबद्दल जिम्मेपत्रक ही लिहून दिलें होते.

(६) नंतर आपण उभयतांनीं पुसदास जाऊन वाटणी पत्रकाकरितां २१ पंचवीस रुपयाचा जनरल स्टांप खरीद करून त्याजवर वाटणीपत्रक लिहिले. व उभयतानीं सह्या केल्या व ता. २९।६।१७ रोजीं पुसद येथील सब रजिष्टर साहेबाचे कचेरींत नोंदण्याकारितां वाटणीपत्राक दाखल केले व ता. १७-९-१७ रोजीं नोंदलें गेलें आहे. एवढा प्रकार होऊन ही तुम्ही माझा हिस्सा अद्याप माझे ताब्यांत दिला नाहीं. करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत वाटणी पत्रकांत दाखल केले प्रमाणें माझा हिस्सा माझे ताब्यांत देऊन माझे सहीची पावती घ्यावी. अगर तसे तुमचेकडून न झाल्यास दोताचे पीकाचे नुकसानीसुद्धां व सर्व हिश्याचा तुमचेवर दिवाणी कोर्टांत दावा करून कोर्ट खर्चासुद्धां व या नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेतले जाईल हे खुब समजावे कळावें. ता. १५।१०।१७ दस्तुर मीरआफजलोदीन वा॥ तुराबोदीन रा० पेढी ता. पुसद

सही

मीरआफजलोदीन वा॥ तुराबोदीन रा० पेढी ता. पुसद जि. यवतमाळ द.खु.

नो. नं. ४३३

## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३–४; गोट जोडी २–२॥; पाटल्या जडी २–२॥; वज्रटीका ३–४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४–५. शिंप्याचें मोतीं ल्हान मोठें वाटेल तसें. सगची २–३–४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २–२॥. सरी ४

## केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— मगनलाल के आणि कंपनी
गिरगांव– मुंबई

नो० नं० ९

---

### दिवाळ करितां सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

# आर्यवनौषधालय—मुर्डी.

## दीपावली. ॐ नमः श्रीगणेशाय. दिवाळी.

### अति उंच सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

**प्रत्येक पेटीची किंमत पोष्ट ख. सह (१८१२)**

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादि अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधि उटणें, गंधाचे रवे, स्त्रियाकरितां लालभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगांधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगंधि माल फार उत्तम ठेविला असून तो सर्वांना घेण्यास जबर वाटूं नये ह्मणून आह्मी आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटी किंमत पो. ख. सह अवघी १८१२ टोवली आहे. या पेट्या एकदम पांच घेणाराला एक पेटी, व आठ घेणाराला दोन पेट्या, चौदा घेणारास चार पेट्या कमिशन दाखल फुकट देऊं. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगंधि माल लक्ष्यपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल.

### उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या

**पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये. (३)**

ही पेटी सागाच्या लांकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केलें आहे. या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरितां कुंकू, हळद व काजळ असे एकंदर बारा बादशाही सुगंध पदार्थ ठेविले आहेत. इतकें असूनहि या पेटीची किंमत अगदीं अल्प पो. ख. सह ३ ठेविली आहे. पेटींतील प्रत्येक मालाचे निरीक्षण केल्यास आह्मी ही ठेवलेली किंमत फारच अल्प ठरेल, तरी सर्वांनीं या पेट्यांचा अवश्य उपयोग करावा. या पेट्याहि एकदम पांच घेणाराला एक पेटी, व आठ घेणाराला दोन पेट्या कमिशनदाखल देऊं. पेटींतील सर्व माल अति उंची वापरला आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

### राजविलासी बादशाही अत्तरें.

| | | | |
|---|---|---|---|
| **सुरंगी नं. १**<br>दर तोळयास ३ रुपये | **मालती,**<br>**पुष्पराज** | **गंधराज**<br>**राजविलास** | **लक्ष्मीविलास**<br>**मदनविलास** |

वरील अत्तरें अमच्या सौगंधिक कारखान्यांत विशेष मोठ्या प्रमाणावर तयार केलेली असून तीं अतिसौगंधिक आहेत. या अत्तरांची प्रसिद्धि सर्वत्र झालेली असल्यामुळें विशेष वर्णन करण्याची जरूर नाहीं. हीं अत्तरें पाव तोळ्यापासून पाहिजे तितकीं मिळतील व तीं खालील पत्त्यावर बिनचूक मागवावीं.

### उत्तम सुगंधी अत्तरें.

गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया. वाळा (खस), जाई, सोनचांफा, बकुळ दवणा, पाच, पारिजातक केशर दर तोळयास १८८

**जीवनपुरी तेलें**—बेलिया चमेली हीना मसाला वगैरे तेल दर १० तो १ रु०

वरील सुगंधी मालाच्या किंमती फारच अल्प ठेविल्या मुळें या वस्तूंना कमिशन मिळणार नाहीं. अत्तरें पाव तोळ्यापेक्षां कमी मिळणार नाहींत.

### अगोदर हें वाचा. फायदा आहे ! !

वरील सर्व सुगंधी माल दिवाळीचे सणाकरितांच अल्प किंमतीस द्यावयाचा आहे व त्याचा लाभ श्रीमंतांपासून गोरगरीबांपर्यंत सर्वांनी घ्यावा व दिवाळीसारखा आनंदी सण आनंदांत घालवावा हिच आमची इच्छा असल्यामुळें यंदा हा माल फारच स्वस्ता केला आहे त्याचा लाभ सर्वांनीं जरूर घ्यावा. नकली मालास किंवा नकली वर्णनास भुलूं नये व फसूं हीं नये. व्हि० पी० नें० पाठवूं.

कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी

नो० नं० ४३१ पो० हर्णै जि० रत्नागिरी

---

४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तत्काल गुण येतो.

याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -॥- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

सुधासंजीवनी डेपो
खामगांव (वऱ्हाड)

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या ह्या रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, हैरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विक तावडतोब दूर होतात किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली, खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जें. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay

---

# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आह्मी येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे समान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपण बद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट
मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

---

अंगुरी

# हिंग.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पैंड, सेवाचा मुरब्बा २ पैं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ५**

नो० नं० ९

---

### गरीबांस फुकट

# रामबाण मलम

### ( कोणत्याहि त्वग्रोगावर )

गुणकारी किं. ६ आणे.

# केशनाशक पूड.

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर. मुळे
नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०

---

## नोटीस

रा. रा. सावजी सोनाजी देशमुख शेगांव ता० खामगांव जि० बुलडाणा

यांस:—

खालीं सही करणार या नोटिशीनें कळवितो कीं शेगांव येथील सर्वे नंबर ११४४ पैकीं २ हा पोट हिस्सा सालीम १३२७ ते सन १३३३ पावेतो सात पिकाकरितां पट्टेखताने वहितीस घेतला आहे ह्मणून यंदा शेताची किस्तकारी केली व पेरणी केली व डवरणें ही केले. मग असे समजलें कीं तुह्मी शेत डवरले त्यावेळेस मी निमगांव येथें दोन महिने आजारी होतो. मग येथें शेत पाहण्याकारितां आलो तेव्हां असे समजलें कीं तुह्मी कांहीं डवरणे दिली आहेत तें तुह्मी देण्याचे कारणें काय? तुमचे जवळ कांहीं लेखी असल्यास कळवावे आह्मी किस्तकारी केली तेव्हां मुळी व कोणी हटकले नाहीं व हरकत ही केली नाहीं तरी या नोटिशीनें कळावितो कीं तुमचेवर पिकाचे नुकसानीचा दावा करून खर्चासुद्धां व नोटीस खर्चासुधा सर्व रुपये भरून घेतले जातील ही नोटीस लिहून दिली कळावे तारीख १२-१०-१७ इ. सही

संपत येकोबा पाटील राहणार
रामपूर दस्तुर खुर्द

नो. नं. ४३२

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd-N. No 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar-Samachar.

वर्ष ५१ ] आकोला---सोमवार तारीख २९ माहे आक्टोबर सन १९१७ ई० [ अंक ४३

## जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान दोन हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहीले त्यांस काढतां येईल

ता. १ जुलै पासून पुढें आणखी प्रसिद्ध होईपर्यंत व्याज दरसाल दर शेकडां ४ रुपये याप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र दहा हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ नो नं १ — Lyon Scott एजंट

---

## अनुभवानें खात्री



पटेल !! जर आपणास आपले हारमोनीयम अगदीं वाईट स्थितींतील नव्या प्रमाणें माफक दरांत दुरुस्त करून घेणें असेल तर आजच खालीं लिहिलेल्या पत्यावर व्यवहार करा. अनुभवानें खात्री पटेल. शिवाय नव्या पेट्या आमचे जंगी कारखान्यांत ऑरडर प्रमाणें अडव्हान्स आल्यास तयार मिळतात. त्याचे दर—हात पेटी सिंगल रीड २० ते २५
" डबल रीड ३०-३५-४०-५०
तीनलाइनी क्याझरेल सूराची किं. रु. ९५.
पाय पेटी सतक ३। ६० ते ८० रु.
" " " ३॥ ८५ ते ९५ रु.
" " " ३॥। १०४-११५ रु)
" " " ३॥। तीन लाइनी क्याझरेल सुराची १८० ते २१० रु

पत्ता—रामचंद्र वीसनता हार्मोनियम मेकर व रिपेअरर नांदुरा जि० (बुलडाणा)

नो. नं. २८४

---

## जाहिरात

या लेखावरून कळविण्यांत येते कीं वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ११६ (१) जे आणि ११६ (१) (२) या अन्वयें वाशीम मुनिसिपालटीचें हद्दींत इमारतीची रचना आणि पुनर्रचना करण्याकरितां नियम आलिशान चिफ कमिशनर सोहेब बहादूर यांनीं मंजूर करून सी० पी० ग्याझेट नोटीफिकेशन नंबर १९६, ३३३ अ ता० २३-७-१७ यांत प्रसिद्ध केले आहेत. पूर्वीचे नियम आलिशान रेसिडेंट सोहेब बहादूर यांनीं मंजूर करून रेसिडेंटसी आर्डर नोटीफिकेशन नंबर १८२ तारीख २०-४-१८९९ यांत प्रसिद्ध केलेले नियम रद्द करून त्या ऐवजी हे नवीन नियम केले आहेत. नियमाचा मसुदा वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचे कलम ४७ अन्वये सर्व लोकांचे माहिती करितां प्रसिद्ध करण्यांत आला आहे.

सही
विनायकराव विष्णु गोखले
व्हाइसचेअरमन
म्युनिसिपल कमेटी वाशीम

### नियमाचा मसुदा

(१) कोणी इसम ज्याचा इरादा एखादी इमारत बांधवयाची किंवा तिची पुनररचना करावयाची असेल किंवा ज्यास सार्वजनिक रस्त्यावर किंवा दुसरी म्युनिसिपालिटीची किंवा नझुलची जमिन यावर दरवाजा बांधावयाचा असेल त्याची पुनररचना करावयाची असेल किंवा नवीन दरवाजा पाडावयाचा असेल किंवा नाली अथवा मोरी करावयाची असेल सदर्हुप्रमाणें इमारतीची रचना किंवा पुनररचना करण्याचें अगोदर किंवा नाली किंवा मोरी किंवा वर निर्दिष्ट केलेलें दुसरें काम बांधण्याचे पुनररचना करण्याचें किंवा नवीन उघडण्याचें पूर्वी आपला इरादा या नियमास जोडलेल्या नमुन्याप्रमाणें लेखी नोटीस देऊन कमेटीस कळविला पाहिजे मात्र जेव्हां कोणता ही भाग ज्यास्त वाढवणें त्यांत फेरबदल करणें किंवा रचना करणें यांच्या योगानें अस्तित्वांत असलेल्या इमारतीच्या अंतर्गत स्थितींत याचा बदल होतो व तिची बाहेरील व मुख्यरचना बदलली जात नाहीं तेव्हां अशी नोटीस देण्याची जरूर नाहीं.

टीपः— एखादे इमारतीची रचना करणें या उल्लेखाचा अर्थ वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ यांतील खुलाशांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ समजला जाईल.

(२) नियम १ प्रमाणें जो प्रत्येक इसम नोटीस देईल त्यानें त्या नोटिशीबरोबर खालील कागद द्यावेत.

१ वीस फुटास एक इंच या स्केलवर काढलेल्या जागेच्या नकाशाच्या दोन प्रती. या नकाशांत खालील माहिती दिली पाहिजे.

(अ) अस्तित्वांत असलेली इमारत जर असेल तर आणि अर्जदाराचे मालकिची किंवा त्याचे वहिवाटींत असलेली जागा.

(ब) ह्या जमिनीवर बांधावयाचे किंवा पुनररचना करावयाचे इमारतीची व तदंगभूत बाहेर इमारतीची स्थिती.

(क) ह्या जमिनीवर बांधावयाचें किंवा पुनररचना करावयाचें इमारतीचें आणि बाह्य इमारतीचे आपले जाणारे जागाचें क्षेत्रफळ.

(ड) शेजारच्या सडका, रस्ते, व गल्ल्या यांचीं नांवें असतील तर व रुंदी व शेजारचे इमारतीची स्थिती.

(ई) अस्तित्वांत असलेल्या जाण्या किंवा नवीन करावयाचे पायखाने किंवा मोऱ्या आणि

२ दहा फुटास १ इंच या स्केलवर काढलेला नकाशा सक्सेशनसह त्याच्या दोन प्रती यांत खालील माहिती असावी.

(अ) ज्या लेव्हलवर इमारतीचा पाया व सर्वांत खालील जमिन किंवा जोते घालावयाचें असेल त्या लेव्हल शेजारच्या सडका व रस्ते यांच्या लेव्हल

(ब) किती मजले बांधावयाचे आहेत त्यांची संख्या आणि

(क) इमारतींत प्रत्येक खोलींत उजेड आणि हवा या संबंधानें करावयाच्या व्यवस्था,

(१) मात्र जर नोटिस देणारा एखादा मनुष्य सेक्रेटरी किंवा त्या कामा करितां कमेटीनें नेमलेला दुसरा अंमलदार याची खात्री करून देईल कीं इमारतीस खर्च ५०० रुपयाहून कमी लागेल तर प्यारा १ ।।२ यांत मागितलेली माहिती देणारा साधा नकाशा पुरे होईल. मात्र जागेच्या नकाशांत कोणते ही स्थितींत ज्या जागेवर किंवा जागेच्या पायांवर इमारती किंवा बाह्य इमारती उभारावयाच्या असतील तिची स्थिती व लांबी रुंदी बरोबर रितीनें दाखविली पाहिजे.

आणखी त्या नकाशांत मंजूर झाले नंतर इमारत बांधणोरे इसमाची त्यांत फेरबदल करावयाची इच्छा असेल तर इमारतीच्या बाह्य किंवा मुख्य रचनेच्या फेरबदलामुळें कांहीं हरकत येत नसेल तर किंवा म्युनिसिपाल कमेटीनें वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ अन्वयें दिलेल्या लेखी हुकूमांत कोणते ही रितीनें त्या फेरबदलामुळें प्रत्यवाय येत नसेल तर त्याफेरबदला संबंधानें कमेटीस पुन्हा नोटीस देऊन त्यांची मंजुरी घेण्याची जरूरी नाहीं.

### कारवाई.

(३) नियम १ प्रमाणें आलेल्या नोटिसा या कामा करितां ठेवलेल्या एका रजिष्टरांत नोंदल्या जातील.

(४) नोटीस व तिज बरोबर असलेला नकाशा आणि त्यासंबंधाचे कागद एकदम वार्ड मेंबरकडे त्यांचे मता करितां पाठविले जातील व वार्ड मेंबर त्याजकडे कागद पोंहचल्यापासून सात दिवसाचे आंत ते कागद आरोग्य आणि इतर मुद्या संबंधानें आपले मत व शेरा देऊन सेक्रेटरीकडे परत करतील.

(५) वार्ड मेंबरकडून कागद आलेवर सेक्रेटरी व्हाईसचेअरमन किंवा चेअरमन सॅनिटेशन कमेटी किंवा कमेटीनें नेमलेला दुसरा अंमलदार यानपुढें ते कागद ठेवतील व व्हाईसचेअरमन सॅनिटेशन कमेटीचे चेअरमन किंवा कमेटीनें नेमलेला अंमलदार ते कागद सब कमेटीपुढें आपले रिपोर्टासह ठेवितील. सब कमेटी ती इमारत योजल्याप्रमाणें बांधण्याची मंजूरी देतील किंवा त्यास योग्य वाटल्याप्रमाणें प्लयान आणि खुलासा यांत कांहीं फेरबदल किंवा दुरुस्ती करण्याचें शर्तीवर परवानगी देतील किंवा वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ प्रमाणें इमारत बांधण्याची परवानगी नामंजूर करण्याकरितां आपले रिपोर्टासह तें प्रकरण पाठवितील.

(६) जेव्हां सॅनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी इमारतीस आपली अखेर मंजूरी देतील तेव्हां सेक्रेटरी यांनी लेखी इमारत बांधण्याचे परवानगीचा दाखला द्यावा. हा दाखला दिल्याचे तारखेपासून १ वर्ष पावेतो अंमलांत राहील. या दाखल्या बरोबर मंजूर केलेला नकाशा दिला जाईल या नकाशांत मुळचें नकाशांत सॅनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग सबकमेटी यांनीं केलेले फेरबदल किंवा दुरुस्त्या दाखविल्या जातील.

(७) प्रकरणाचा निकाल झालेवर मंजूर केलेला नकाशा व सूचना यांची नक्कल सेक्रेटरी यांनीं पुढील दाखल्याकरितां म्युनिसिपल ऑफिसांत दप्तरीं ठेवावी.

(८) सेक्रेटरी किंवा दुसरा अंमलदार यास म्यानेजिंग कमेटी किंवा सॅनिटेशन कमेटी नेमतील त्यांनीं इमारत बांधणें सुरू असतांना तिची तपासणी करावी आणि जर त्यास असें वाटेल कीं मंजूर केलेला नकाशा आणि सुचना याप्रमाणें अंमलबजावणी केली नाहीं तर त्यांनीं सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी यांचेपुढें निकाला करितां तो विषय एकदम ठेवावा.

(९) ज्या इसमास इमारत बांधणेंकरितां परवानगी मिळाली आहे त्यास एखादा म्युनिसिपालटीचा अमलदार हुकुम देईल तर त्यांनीं आपला परवानगीचा दाखला व मंजूर केलेला प्लॅन आणि सुचना त्या अमलदारांचें तपासणी करितां दाखल करावयात.

### नमुने व प्लॅन

(१०) नियम १ प्रमाणें नोटिसीचा नमुना मागितला असतां किंमत न घेतां

सेक्रेटरीचे ऑफिसांत दिला जाईल.

(११) नियम २ दोन अन्वयें लागणारा नकाशा मागितल्यास कमेटीचें ऑफिसांत इमारत बांधणारा किंवा तिची पुनररचना करणारे इसमाचे खर्चानें तयार केला जाईल व तो खर्च कमेटी वेळोवेळीं ठरवील त्या दरानें घेतला जाईल.

(१२) नियम १ ते ९ मोडल्याचो शाबीती माजिस्ट्रेट पुढें झाल्यास त्याबद्दल ५० रुपयापेक्षां जास्त नाहीं इतका दंड केला जाईल आणि जेव्हां नियम मोडणें चालूं राहणारें असेल. तेव्हां पहिले दिवसानंतर जितके दिवस नियम मोडणें चालू राहिल तितक्या प्रत्येकें दिवसाबद्दल दररोज पांच रुपयाप्रमाणें आणखी दंड केला जाईल.

सेक्रेटरी

## नोटीस

सेक्रेटरी म्यु. कमेटी वाशीम यांस

मी खालीं सही करणार वऱ्हाड म्युनीसिपल कायद्यांचें कलम ११६ (१) (जे) अन्वयें केलेलें नियमास अनुसरून या नोटीसीनें कळवितो कीं भाग मध्यें जवळ असलेले हल्लीं नंबर ची इमारत मजल्याची बांधावयाची आहे किंवा तिची पुनररचना करावयाचा माझा इरादा आहे. नियमाप्रमाणें अवश्य असलेले प्लॅन सेक्शन आणि एलिव्हेशन आणि दुसरा तपशील दाखविणारे कागद याच्या दोन प्रती सोबत दिल्या आहेत.

सही

पत्ता

सन १८८६ चे वऱ्हाड म्युनिसिपल कायद्याचें कलम ८९ अन्वयें इमारत बांधण्याची किंवा तिची पुनररचना करण्याची नोटीस देणारें कोणा इसमास कमेटीस देतां येतील असे लेखी हुकूम.

(१) ज्या इमारती नवीन बांधावयाच्या आहेत त्या संबंधानें खालील हुकूम अमलांत राहील.

(अ) जी जमीन भरून काढली आहे किंवा जी घाणेरडे पदार्थ किंवा मेलेल्या जनावरांचीं प्रेतें किंवा दुसरे घाणेरडे किंवा त्रासदायक पदार्थ टाकण्याकरितां उपयोगांत आणली आहे त्या जमिनीवरील असले पदार्थ कमेटीचे पसंतीप्रमाणें पूर्णपणें काढून टाकल्याशिवाय अशा इमारतीचा कोणताही पाया त्या जागेवर घातला जाणार नाहीं.

(ब) मनुष्याचे वस्ती करितां उपयोगांत आणावयाचे इमारतीचा सर्वांत खालील मजल्याची जमीनीचे (सभोंवतालच्या) जमिनीचे सपाटीहून दीड फुटापेक्षां कमी उंच नसावी.

(क) प्रत्येक इमारतींत वस्तीकरितां उपयोगांत आणावयाचें खोलीचें सपाटीचें क्षेत्रफळ ८८ चौरस फुटापेक्षां कमी नसावें व त्या खोलीस कमींत कमी एक दरवाजा वरील हवेंत उघडणारा असावा किंवा जे सायवान किंवा खोली बाहेरील हवेंत उघडली जातात. हा सायवानांत किंवा खोलीमध्यें उघडणारें असावें.

(ड) अशा प्रत्येक इमारतींत वस्तीकरितां उपयोगांत आणावयाची प्रत्येक खोली ती त्या इमारतीचे छावणींतील खोली नसल्यास प्रत्येक भागामध्यें जमिनीपासून छता पर्यंत कमींत कमी आठ फूट उंच असावी आणि छावणींतील प्रत्येक खोली पांचफूट असावी.

(इ) हवा मोकळी वहावी म्हणून किंवा सफाईचें कामाची सोय व्हावी म्हणून किंवा आगीचा प्रतिकार व्हावा म्हणून सॅनिटेशन सब कमेटी किंवा म्यानेजिंग सब कमेटी नविन होणारे इमारत व. शेजारची नवीन इमारत यांच्यामध्यें ३ तीन फुटाहून कमी नाहीं इतकी जमीन सोडण्याकरितां खुली सोडण्याकरितां हुकूम करूं शकतील.

(फ) नवीन काढलेल्या सडका किंवा अस्तित्वांत असलेल्या सडका जेथें अधिक रुंद किंवा सरळ करावयाच्या असतील तेथें सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग कमेटी विरुद्ध हुकूम न करतील तर नवीन बांधले जाणाऱ्या इमारतीच्या पूर्ण लांबीभर ६ सहा फुटांपेक्षां कमी नाहीं इतक्या रुंदीची जागा ह्या इमारतीचे सर्वांत जवळ असणारें हद्द किंवा सडकेच्या बाजूची नाली यांच्या दरम्यान सोडावी लागेल.

(२) सडकेचे नालीचे बाजूनें कोणी इसम इमारत बांधण्यास किंवा तिची पुनररचना करण्यास इच्छील तर सदरहु नाली व नालीस लागून सर्वांत जवळ असणारे इमारतीचा भाग यांचे दरम्यान कमींतकमी १॥ दीड फूट रुंद जमीन त्यांस सोडावी लागेल.

(३) खालील सूचनाप्रमाणें नवीन कावयाची किंवा उंच करावयाची इमारतीची उंची ज्या सडकेवर ही इमारत असेल त्या सडकेच्या रुंदीचे मानानें ठरविण्यांत येईल.

१ जर सडकेची रुंदी २६ फुटापेक्षां ज्यास्त नसेल तर ती सडकेच्या मानानें दीड फुटापेक्षां जास्त उंच केली जाणार नाहीं किंवा तिची असलेली उंची वाढवितां येणार नाहीं.

२ सडकेची रुंदी २६ फुटाहून ज्यास्त असून ४० फुटांपेक्षां जास्त नसेल तर इमारत ४० फुटापेक्षां जास्त उंच केली जाणार नाहीं किंवा तिची उंची वाढली जाणार नाहीं.

३ जर सडकेची रुंदी ४० फुटाहून अधिक असेल तर इमारत सडकेच्या रुंदीपेक्षां जास्त रुंदी केली जाणार नाहीं किंवा तिची उंची वाढवितां येणार नाहीं.

(४) जर इमारत दोन सडकांस लागून असेल तर तिची उंची जितका तिचा भाग अधीक रुंदीचे सडकेवर असेल तितक्या भागाची उंची त्या अधिक रुंदीचे सडकेचे मानानें करितां येईल व त्या इमारतीचा भाग कमी रुंदीचे सडकेवर असून अधिक रुंद सडकेपासून ८० फुट अंतरापर्यंत ती त्याच मानाने करितां येईल. मनुष्यांचे वस्ती करितां उपयोगांत आणावयाची कोणतीही खोली जुन्या किंवा नव्या पायखान्यावर बांधिली जाणार नाहीं.

(५) कमेटीचें मताप्रमाणें नालीचें पाणी जमा करण्याची व तेथून तें वाहून नेण्याची अवश्यक असणारी योजना केल्याशिवाय इमारतीचे कोणतेहि भागाचा स्नान करण्याकरितां व कपडे धुण्याकरितां व घरांतील भांडीं धुण्याकरितां कोणताही इसम उपयोग करणार नाहीं किंवा दुसऱ्यास उपयोग करूं देणार नाहीं.

(६) वरील हुकमामध्यें कांहीं सांगितलें असेल तथापि कमेटीस योग्य वाटेल तर लेखी परवानगी देऊन खालील हुकूम करण्याचा कमेटीस अखत्यार राहील.

(अ) एखादे इमारतीच्या संबंधानें नियमाप्रमाणें अवश्य लागणारे लांबीमध्यें फेरफार करण्याचा हुकुम करणें.

(ब) तीन महिन्यापेक्षां जास्त मुदतीपर्यंत ठेवावयाचे नाहीं अशा कोणत्या ही हंगामी इमारतीस वर लिहिलेले हुकूम किंवा त्यांपैकीं एखादा हुकूम त्याचें अमलबारी करण्यापासून माफी करणें परंतु प्रत्येक इमारती संबंधानें घ्यावयाची परवानगी किंवा माफीही त्यांस योग्य वाटतील अशा शर्तीनिशी देण्याचा कमेटीस अखत्यार राहील.

### पायखान्याची रचना.

(७) कमेटीनें पसंत केलेल्या जागेखेरीज कोणत्या ही जागेवर पायखाना नवीन केला जाणार नाहीं साधारणपणें घरांत राहणारे वयांत आलेले बारा मनुष्याकरितां एक खोली पुरविली जाईल.

(८) पायखान्याची खोली किंवा त्याचा पाया किंवा त्याची एखादी नाली किंवा मोरी जिचा उपयोग मैलापाणी वाहण्याकरितां केला जाईल अशी मातीची किंवा विटा आणि मातीचे बांधिली जाणार नाहीं.

(९) प्रत्येक पायखान्यास वरचे बाजूनें चार चौरस फुटांपेक्षां कमी नाहीं इतकी एकंदर क्षेत्रफळाची किंवा अधिक छिद्रें ठेविलीं जातील.

### नाल्याची रचना

(१०) इमारतीस लागून असणाऱ्या सांडपाण्याच्या आणि मैलापाणी जाण्याच्या सर्व नाल्या यांची रचना अशी केली जाईल कीं म्युनीसिपालीटीचे अमलदारांस सहज रितीनें तपासतां यावयात आणि सॅनिटेशन कमेटी आणि म्यानेजिंग कमेटी यांच्या विशेष लेखी परवानगी शिवाय त्यांचे अच्छादन केलें जाऊं नये. मनुष्यांचें राहण्याकरितां ज्या खोलीचा उपयोग व्हावयाचा असेल त्या खोलींतून मैल्याची नाली किंवा मैला पाणी जाणें करितां नालीचा नळ नेला जाणार नाहीं.

(११) जरूरीचे वेळीं व्हाइस चेअरमन किंवा सॅनिटेशन कमेटीचे चेअरमन किंवा कमेटीनें दिलेला दुसरा अमलदार यांनीं वार्ड मेंबरचे शिफारसी वरून कमेटीचे हुकूमावर अवलंबून कोणती ही इमारत अथवा दुसरें काम सुरू करण्याची परवानगी घ्यावी परंतु त्याचा हुकूम सॅनिटेशन कमेटी किंवा म्यानेजिंग सब कमेटी यांचे पसंतीवर व मंजुरातीवर अवलंबून राहील.

नो. नं. ४३४


# लक्षांत ठेवा.

कीं येथें आमचेकडे कमिशनचे (अडतीचे) काम चालत असून आम्ही येथें मिळणारा कापड, किराणा, स्टेशनरी, कांचसामान, दळण्याच्या गिरण्या **जीन व प्रेसचें सामान** वगैरे वगैरे सर्व प्रकारचा माल माफक कमिशन घेऊन भावाची पूर्ण चौकशी करून पाठवितो. व बाहेर गांवाहून विक्री करितां आलेला माल विकून देतो तसेच सायकल, व सायकलला लागणारे सर्व सामान मोटारचे व घोडे गाडीचे गाद्यांचे कापड, व दुसरे लागणारे सामान, खिशांतील विजेचे दिवे, व दुसरे विजेचे सामान, ल्यांपस् वगैरे तेल पुरवितो. एकवेळ आरडर देऊन कामाचे चोखपणाबद्दल खात्री करून घ्या.

डब्ल्यु. व्ही. पिंगळे आणि सन्स

पत्ता— ठाकुरद्वार रोड, काळकादेवी पोष्ट मुंबई नंबर २

नो. नं. ३९८

४० रोगावर एकच जालीम औषध

## सुधासंजीवनी



यानें अजीर्ण, खोकला, दमा, संधीवात, प्रमेह, प्रदर, धुपणी, संग्रहणी, अतीसार वगैरेवर तत्काल गुण येतो.

याची एक बाटली जवळ ठेवणारास वैद्याची गरज राहणार नाहीं. एकदाच खातरी करा किंमत रु. १ टपाल खर्च निराळा. नमुना -॥- अनुपान पत्रकसोबत. गांवोगांव एजंट पाहिजेत. भरपूर कमीशन. आजच पत्र लिहा.

सुधासंजीवनी डेपो

खामगांव (वऱ्हाड)

## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलें आहे. पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हा रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारेंसे वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रुपया

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें थागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें मान त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात किं रु. १८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुनली, खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. यु. वरकी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

**Dr. H L. Batliwala Sons & Co. Ltd.**

N. N. 6 Dadar Bombay


वगैरे

वऱ्हाडसमाचार

आश्विन शुद्ध १९ पिंगल संवत्सर १८३७

## कृषिशिक्षण.

हल्लीं युद्धाच्या सबबीवर पुष्कळ अवश्य सुधारणा ही लांबणीवर टाकण्यांत येत असतात. पण कृषिशिक्षणासंबंधानें तरी सरकारचें धोरण कांहीं निराळें असावें असें हिंदुस्थान सरकारनें कृषिशिक्षणासंबंधानें सर्व प्रांतिक सरकारांस उद्देशून काढलेल्या सर्क्युलर पत्रावरून दिसतें. विलायतेंत येथल्यापेक्षां युद्धाचे परिणाम ज्यास्त जाणवत असून व तेथील सरकारचें मन येथल्यापेक्षां हें युद्ध विषयक गोष्टींत ज्यास्त व्यग्र असतां ही तेथें मि. फिशर सारखे शिक्षणाधिकारी शिक्षणपद्धतीचा प्रश्न इतक्या उत्साहानें हातीं घेत आहेत व त्याकरितां इतक्या सढळ हातानें खर्चाला मंजुरी देत आहेत कीं त्याचा तो दूरदर्शीपणा व इकडच्या अधिकाऱ्यांची संकुचित दृष्टी याच्यांतला विरोध कोणाला ही आश्चर्यकारक वाटेल. हिंदुस्थान सरकारनें आपलें धोरण बदललें असलें व सर्क्युलर पत्रांत नमूद केलेल्या सुधारणेच्या गोष्टी तत्काळ अंमलांत आणण्याचें ठरविलें असेल तर खरोखर त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. या पत्रांत सूचित केलेल्या सुधारणांपैकीं पहिली गोष्ट ह्मणजे प्रत्येक जिल्ह्याला एकेक शेतकीचें हायस्कूल व त्याच्या निरनिराळ्या भागांतून शेतकीविषयक मिडलस्कुलें स्थापन करणें ही आहे. या शाळा स्थापन करण्यास अगोदर पुष्कळसे लायक शिक्षक मिळाले पाहिजेत ही अडचण आहे. पण सरकारानें सध्याच्या शेतकी कॉलेजांत स्कॉलर्शिपा देऊन याच कामासाठीं मुद्दाम कांहीं विद्यार्थी ठेविले तर ही अडचण एक दोन वर्षांतच दूर होण्यासारखी आहे असें आह्मांस वाटतें. हे शिक्षक तयार करतांना त्यांना नुसतें पुस्तकी शिक्षण देऊन मात्र चालवयाचें नाहीं. त्यांनीं प्रत्यक्ष हातानें शेतकीचीं कामें चांगलीं करतां आलीं पाहिजेत तरच त्यांचा कांहीं उपयोग होईल. त्याच प्रमाणें केवळ पाश्चात्य पद्धतीचें कृषिशिक्षण न देतां हिंदुस्थानच्या परिस्थितीस योग्य असे फेरफार केले पाहिजेत. असें झाल्यास त्यापासून शेतकऱ्यांच्या मुलांना फायदा होईल व हिंदुस्थानच्या शेतकीचें स्वरूप पालटेल. दुसरी सुधारणेची गोष्ट ह्मणजे शेतकी कॉलेजें युनिव्हर्सिटीला जोडणें ही आहे. सरकारी खात्याच्या मुठींत शेतकी कॉलेजें व हायस्कुलें राहण्यापासून शिक्षकाचे हातपाय इतके बांधले जातात कीं त्यांना कोणतेंही उपयुक्त कार्य करून दाखवितां येत नाहीं. युनिव्हर्सिटीच्या कारभारांत लोकमताचा थोडा बहुत तरी प्रतिध्वनि निघत असल्यानें लोकांना काय हवें आहे त्या धोरणानें कॉलेजांतून व शाळांतून पद्धतींत फेरफार घडून येण्याचा संभव असतो. या दोन्ही बाबतींत हिंदुस्थान सरकारनें पत्रांत प्रदर्शित केलेलें धोरण उदारपणाचें दिसतें. या पत्रावर आतां प्रांतिक सरकारचे अभिप्राय काय पडतात व हिंदुस्थान सरकारनें योजिलेली ही कृषिशिक्षणविषयक सुधारणा केव्हां प्रत्यक्ष अंमलांत येते तें आतां पहावयाचें आहे.

## अल्पसंख्यकाचें प्रतिनिधित्व.

सध्या आपले देशांत जी राजकीय चळवळ चालली आहे तिचा मुख्य भाग होमरूलबद्दलच्या चळवळीनें व्यापिला आहे. या चळवळीचे पुरस्कर्ते अमक्याच एका विशिष्ट जातीला ज्यास्त हक्क न मागतां एकंदर देशाचे नैसर्गिक व सरकारनें वाचादत्त केलेले अधिकार आमच्या पदरांत पडूं द्या असें ह्मणत आहेत. पण या चळवळीबरोबर दुसऱ्याही कांहीं लोकांनीं आपापल्या जातीपुरती हक्काची मागणी करण्यासाठीं चळवळ आरंभिली आहे. उदाहरणार्थ, जैन, लिंगाईत, मराठे, व अस्पृश्य वर्गांतले लोक यांनीं आपापल्या जातीचे प्रतिनिधि कौंसिलांत असावे अशाविषयीं सभा भरवून अर्ज केले आहेत. जणूं काय त्यांच्या जातीचे प्रतिनिधि कौंसिलांत नसल्यामुळें आजपर्यंत इतर जातींनीं त्यांच्या हिताला खाऊन टाकिलें आहे! कित्येक तर हा हक्क मागतांना इतके घसरले आहेत कीं अल्पसंख्यक जातींचे प्रतिनिधि सरकार देणार नसेल तर आह्मांला होमरूलच नको. कारण, अशा स्थितींत हिंदुस्थानला होमरूलचा हक्क मिळाला तर कांहीं थोडेशीं ब्राम्हणच सगळी सत्ता बळकावून बसतील आणि सगळा सत्यानास होईल. या लोकांनीं कृपा करून जरा इंग्लंडच्या इतिहासाकडे नजर फेकावी. इंग्लंडांत जन्मसिद्ध जाती नाहींत ही गोष्ट खरी, पण समाजांतली कृत्रिम असमानता प्रबळ आहे. तेथें या घटकेला काय प्रकार आहे व त्यापासून त्या देशाचा सत्यानाश झाला आहे कीं काय याचा त्यांनीं विचार करावा.

## इंग्लंडांतली स्थिति.

इंग्लंडांत कारखान्यांतून काम करणाऱ्या मजुरांचा वर्ग तेथील लोकसंख्येच्या मानानें फारच मोठा आहे. इतर धंद्यांचे लोक अल्पसंख्यक आहेत. पण पार्लमेंटांतल्या सभासदांत जर कोणाही पक्षांतल्या सभासदांची संख्या अतिशय अल्प असेल तर ती या मजूर पक्षाची होय. या लोकांचे प्रतिनिधि कमी होते ह्मणून 'आमची संख्या पार्लमेंटांत राहील तरच आह्मांला पार्लमेंट हवें, नाहीं पेक्षां तें नसलेलें पतकरलें. पार्लमेंट मोडून टाका आणि झेटिंगशाही ठेवा' असा वाद मजूरपक्षानें कधीं घातला आहे काय? नाहीं. तर आपल्या लोकांना शिक्षण देऊन त्यांच्यांत जागृति उत्पन्न करून व विशेषतः एकीनें राहूनच त्यांनीं आपल्या पक्षाला इतकी दृढता आणिली आहे कीं त्यांचे ज्यास्त प्रतिनिधि घेतलेच पाहिजेत असें पार्लमेंटालाच वाटूं लागलें. मला मान द्या किंवा माझा हुकुम ऐका असें ह्मटल्यानें कोणी मान देत नाहीं किंवा हुकुम ऐकत नाहीं. त्या शद्बांच्या मागें शिक्षण, लोकहिताची जागृति, जबाबदारीची जाणीव व लोकमत यांचें भरपूर पाठबळ लागत असतें. आमचे अल्पसंख्यक पण स्वतंत्र प्रतिनिधित्वाच्या हक्कासाठीं हपापणारे बंधु ही गोष्ट नीट डोळे उघडून पाहतील तर त्यांना आपली चूक दिसून येईल.

## बाष्कळपणा.

अलीकडे तरुणांत बाष्कळपणा बोकळला आहे. स्वतः एखाद्या विषयाचें अध्ययन न करतां अनाधिकारी माणसांनीं अविचारीपणानें केलेलीं विधानें खरीं समजून तरुण मंडळी कांहीं तरी मतें बनवितात असा आक्षेप पुष्कळांच्या कडून करण्यांत येत असतो. त्यांत कांहीं तथ्य आहे हें आह्मांस दुःखानें कबूल करणें भाग आहे. पण हा दोष तरुणांचा नसून परिस्थितीचा आहे आणि या परिस्थितीच्या तडाख्यांतून मोठाले सरकारी अधिकारी सुद्धां सुटलेले नाहींत. परवाच मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड विलिंगडन यांनीं बाष्कळपणाचे विरुद्ध डेक्कन कॉलेजच्या विद्यार्थ्यांना उपदेश करतांना एका होमरूल विद्यार्थ्याची गोष्ट सांगितली कीं तूं होमरूलच्या पक्षाला कां मिळालास असें त्याला विचारलें असतां तें मला माहीत नाहीं, पुष्कळ लोक त्या पक्षाला मिळालेले मी पाहिले ह्मणून मी ही मिळालों असें उत्तर दिल्याचें सांगितलें आणि या एका उदाहरणावरून होमरूलला तरुण मंडळी कशी भाळतात याविषयीं आपला निवळ एकतर्फी ग्रह करून घेऊन तरुणांच्या पदरीं अविचार, बाष्कळपणा, उतावीळपणा इ. दुर्गुण बांधण्यास ते तयार झाले. खुद्द लाटसाहेबांचे हे उद्गार तर्कशास्त्राच्या व अनुभवाच्या कसोटीला लाविले तर ते कोणत्या वर्गांत पडतील हें सांगावयास नकोच. एका उदाहरणावरून सर्वसामान्य सिद्धांत काढणें ही तर्कपद्धति न्यायाची आहे काय? जबाबदार राज्यकर्ते अधिकारी जेथें दूषित परिस्थितीला बळी पडलेले दिसतात तेथें तरुणांनाच काय ह्मणून दोष द्यावा. अधिकारी वर्गाचें मुखपत्र जें पायोनियर पत्र किंवा त्यासारखीं स्टेटस्मन, मद्रास मेल इ. पत्रें याच्याहून ही भयंकर व हिंदुस्थानचें बदनाम करणारीं विधानें काडीमात्र पुराव्यावांचून करतात, तेव्हां त्यांना बाष्कळ ह्मणण्यासाठीं लाट साहेब तोंड कां उघडीत नाहींत. मिसेस बिझांट बाईची सुटका व मि. गांधी यांचा संचार यामुळेंच बकरीदच्या दिवशीं बहार प्रांतांत दंगे झाले असें पायोनियरनें ह्मटलें तेव्हां त्याचा निषेध किती अधिकाऱ्यांनीं केला? मि. वुड यांनीं हिंदी पालकांविषयीं धडधडीत अपमानकारक विधान केलें असतां व तें निराधार आहे हें कबूल करून ही सरकारी अधिकाऱ्यांनीं कौंसिलांत त्याची बाजू सावरून धरण्यासाठीं आपली पराकाष्ठा केली कीं नाहीं? अशा परिस्थितींत तरुणांच्या डोळ्यांतलें कुसळ काढण्यापेक्षां सरकारी अधिकाऱ्यांच्या डोळ्यांतलें मुसळ दाखविणें लाट साहेबांस योग्य नव्हतें काय?

## औद्योगिक उन्नतीची आशा.

सरकारी कारभाराची घट्टी दळण्याचें काम फार मंदगतीनें करते, पण जें काम करतें तें चांगलें होतें अशी इंग्रजींत ह्मण आहे; आणि तिची यथार्थता पाहणें असेल तर ती संयुक्त प्रांतांतल्या उद्योगधंद्यांसंबंधानें नुकत्या प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांत दिसेल. प्रस्तुतच्या युद्धानें औद्योगिक उन्नति साधण्याची उत्कृष्ट संधी हिंदुस्थानाबरोबरच इंग्लंड जपान, अमेरिका वगैरे देशांना आणून दिली, पण तिचा फायदा करून घेण्यांत अमेरिकेचा पाहिला, जपानचा दुसरा व इंग्लंडचा तिसरा नंबर लागला. हिंदुस्थानला मात्र तो फायदा मुळींच करून घेतां आला नाहीं. उद्योगाचे संबंधांत आह्मी किती मागें आहों याला दुसरें प्रमाण देण्याची अवश्यकताच नाहीं. औद्योगिक कमिशन बसविण्यापासून पुढें कधीं काळीं काय फायदा व्हावयाचा असेल तो होवो. आज तरी त्याचा काहीं एक उपयोग झालेला दिसत नाहीं. कित्येक प्रांतिक सरकारांनीं उद्योगधंद्यांसंबंधानें चौकशी करण्यासाठीं कमिट्या व तज्ञ नेमिले. पैकीं मद्रासच्या तज्ञानें कधींच हातपाय गाळले. मुंबईच्या कमिट्यांनीं व तज्ञांनीं एक दोन बाबतींत लोकांनीं उद्योग करणें फायद्याचें होईल असें दुरून काडीनें औषध लावणाऱ्या माणसाचें अनुकरण केलें. बंगाल, मध्यप्रांत, आसाम, मध्यहिंदुस्थान, वगैरे प्रांतिक सरकारच्या हातून ह्मणण्यासारखें कांहीं एक झालें नाहीं. ग्वालेर संस्थानानें मातीच्या भांड्याचा व कातड्याचा असे दोन कारखाने काढले. बडोदें सरकारनें चाकोलेटच्या व दुसऱ्या एक दोन किरकोळ कारखान्यांना उत्तेजन दिलें. म्हैसूर सरकारानें चंदनी तेलाच्या कारखान्याला सुरुवात करून अगदीं अल्प अवधींत त्याला भरभराटीला नेलें. पंजाब सरकारनें काय काम केलें याची आह्मास खबर नाहीं. पण संयुक्त प्रांताच्या सरकारानें मात्र खरोखर प्रशंसनीय कार्य करून दाखविलें यांत शंका नाहीं. तेल काढण्याचा व कातडीं कमावून त्याचे बूट वगैरे करण्याचा असे दोन धंदे त्यासंबंधाची यंत्रसामुग्री मिळण्यास अडचण पडली असतां ही त्यांनीं यशस्वी करून दाखविले. कातडीं रंगविण्यास लागणारीं द्रव्यें इकडच्या इकडे पैदा करून त्यांचा उपयोग केला ही विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. तरी बाभळीच्या शेंगांचा उपयोग रंगाचे कामीं होण्यासारखा असून लोक तो करीत नाहींत अशी रिपोर्टांत टीका नमूद आहे. बाभळीच्या शेंगा हिंदुस्थानांत सर्वत्र होतात व त्या सर्वांना सहजप्राप्य आहेत. पण लोकांची प्रवृत्ति अद्याप त्यांचा उपयोग करून घेण्याकडे होत नाहीं ही शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे. आमच्या मध्यप्रांतांपैकीं नेमाड जिल्ह्याच्या जंगलखात्याच्या अधिकाऱ्यांनीं ही बाभळीच्या शेंगांची शिफारस केली आहे. अशा कामीं सरकारी अधिकाऱ्यांनीं सरक्युलरें किंवा पत्रकें काढून स्वस्थ न बसतां लोकांना प्रत्यक्ष कृतीचे वस्तुपाठ दिले पाहिजेत तरच कांहीं कार्यभाग होईल. संयुक्त प्रांताच्या सरकारानें हातमाग, कांबळीं विणणें, हातमागावर काढलेलें कापड रंगविणें वगैरे

गोष्टींना ही उत्तेजन दिलें. सरकारनें कानपूर येथें काढलेल्या रंगशाळेचा फार उपयोग झाला. या शाळेंत देशी वस्तूंपासून रंग काढण्याचें काम शिकविण्यांत येतें ही गोष्ट फार थोड्यांना ठाऊक असेल. पण तिचा प्रसार ज्यास्त होणें फार जरूर आहे. काचेच्या कारखान्याकडे ही त्या सरकारचें दुर्लक्ष झालेलें नाहीं. उत्तम प्रकारची काच तयार करण्याचा कारखाना ब्रिझोई येथें काढण्यांत आला आहे बांगड्याची काच करण्याचा उद्योग गेल्या सालीं फायदेशीर झाला, त्यामुळें चांगली बांगड्याची काच निघूं लागली. हिंदुस्थानांत रासायनिक द्रव्यें तयार होऊं लागल्याशिवाय आमच्या उद्योगांचें पाऊल पुढें पडावयाचें नाहीं. या रासायनिक द्रव्यांच्या महागाई मुळेंच आगकाड्यांचे आमचे कारखान यशस्वी होऊं शकत नाहींत. बरेलीचा आगकाड्यांचा कारखाना याच मुळें बुडाला. दुसरे ही कित्येक कारखाने याच कारणामुळें बुडालेले आह्मांस माहित आहेत. सर्व कारखान्यांना आल्को हॉलची गरज लागतें. हे द्रव्य काढण्याचे कारखाने पुष्कळ निघाले पाहिजेत. त्यांच्या अभावीं बायक्रोमेटं ऑफ पोट्यास, सल्फेट ऑफ अल्युमिना, एपसम साल्ट वगैरे सारखीं किरकोळ रासायनिक द्रव्यें इकडे तयार होऊं लागलीं आहेत हें थोडेंसें समाधान आहे. पण आल्कोहॉल व सल्फ्युरिक ॲसिड यांची अवश्यकता विशेष भासते. कातड्याचे बटन, हातानें केलेले कागद, शुद्ध केलेली चरबी, पेनसिली, लोणचें ठेवण्याच्या काचेच्या बरण्या, काचेवर लिहिण्याच्या पेनसिली, वगैरे पुष्कळ जिंनसा संयुक्त प्रांताच्या सरकारच्या उत्तेजन मुळें तयार होऊं लागल्या आहेत व त्यांतल्या कांहीं तर जर्मन मालापेक्षां ही उत्तम आहेत असा दाखला तज्ञांकडून मिळाला आहे असें रिपोर्टांत ह्मटलें आहे. यावरून हें दिसून येईल कीं सरकारची अनुकूलता मिळाल्यास उद्योगधंद्यांच्या बाबतींत चांगली प्रगति होणें होणें शक्य आहे. संयुक्त प्रांताला जी गोष्ट शक्य झाली ती त्या प्रांताहून उद्योगधंद्यांसंबंधानें अधिक अनुकूल परिस्थिति असलेल्या इतर प्रांतांना कां करतां आली नाहीं या प्रश्नाचें उत्तर आतां कोणाला ही देतां येईल. लढाईमुळें कारखान्यांना द्रव्यसाह्य सरकारला कदाचित् करतां येणार नाहीं. पण रेल्वे कंपनीवर आपलें वजन खर्चून माल ने आणण्यासंबंधानें सवलती मिळविणें, कारखानदारांना इतर सवलती देणें, तज्ञाकडून लागणारी माहिती पुरविणें, स्कालर्शिपा देऊन उद्योग धंदे शिकण्यासाठीं लायक तरुण माणसें परदेशी पाठविणें, व्यवसाय पद्धतीचें शिक्षण देणें इ. शेकडों गोष्टी सरकारला सहज करतां येण्यासारख्या आहेत. त्या करण्यासंबंधानें त्यांचे ठायीं उत्साहाची जी मंदता दिसते तिचें कारण काय?

---

## कम्यांडर वेजवुड यांची स्पष्टोक्ति

कम्यांडर वेजवूड एम. पी. यांनीं हिंदुस्थानच्या राज्यकारभारांत करावयाच्या सुधारणा संबंधानें विलायतेंतल्या 'डेली डिसप्याच' नांवाच्या पत्रांत एक लेख लिहिला आहे. त्यांत ते ह्मणतात ही लढाई संपण्यापूर्वीं हिंदुस्थानाला जर्मन साम्राज्यांतल्या गुलामगिरीपेक्षां अधिक स्वतंत्रता मिळणार आहे, व तेथील कारभार पार्लमेंटच्या तंत्रानें अधिक चालूं लागावयाचा आहे जर्मनिशीं ही जी स्पर्धा आहे तींत त्या देशाचें अनुकरण नाहीं. हिंदुस्थानाला होम रूल देणें ह्मणजे अर्धवट शिकलेल्या काळ्या लोकांवर आपण मोठी मेहेरबानी करणार आहो असें समजण्याचें कारण नाहीं. ब्रिटिश साम्राज्यापासून होणाऱ्या फायद्याबरोबर त्याचें ओझें वाढूं लागल्यास स्वतंत्र सोबती ह्मणून आपण बोलावणार आहो. मागच्या गोष्टी विसरा, मागे झालेले अन्याय, दांडगेपणा नुकसानीच्या गोष्टी वगैरेवर पडदा ओढून आस्ट्रेलिया किंवा कानडा या प्रदेशांप्रमाणें आपल्या बाजूनें उभे राहून मदत करण्यास आपण हिंदुस्थानाला सांगणार आहों. हिंदुस्थानचा काळा मुख्य प्रधान इंपिरियल कॉन्फरन्समध्यें बसून ह्यूजेससारखा आपणास ब्रह्मज्ञानांच्या गोष्टी सांगेल. कांहीं हरकत नाहीं. पण त्याला आपण ह्यूजेस सारखेंच वागविलेंही पाहिजे. बरोबरीच्या नात्यानें त्याच्यशीं आपण बोलले चालले पाहिजे. त्यांच्याशीं आपण ताठा ठेवतां कामा नये. असें झाल्यास हिंदुस्थानापासून आपणांस मोठा लाभ होईल.

---

## मोडी लिपि.

विदेशी सरकारी अधिकाऱ्यांविरुद्ध लोकांची सामान्यतः अशी तक्रार आहे कीं ते हिंदुस्थानच्या लोकांच्या मानासिक स्थितीचा व भावनेचा बिलकुल विचार न करितां स्वतःच्या बारीकसारीक सोयीसाठीं लोकांचीं मनें दुखविण्यास मागें घेत नाहींत. याचें उत्कृष्ट उदाहरण मोडिलिपी बंद करणें हें एक आहे. मोडिलिपी आज ६०० वर्षांची जुनी व तिची वहिवाट ही आज पिढ्यानपिढ्या चालत आलेली असतां थोड्याशा युरोपियन अधिकाऱ्यांना मोडिलिपी वाचण्यास कठीण जाते या सबबीवर सरकारी व्यवहारांतून तिला मनाई करण्यांत येते या गोष्टीला काय ह्मणावयाचें? मोडी लिपी मुंबई सरकारानें काढून टाकली ती पुनः प्रस्थापित करवी असा ठराव मुंबईच्या कायदे कौन्सिल पुढें आणून ना. मि. परांजपे यांनीं सरकारी अधिकाऱ्यांना वादविवादाला अव्हान केलें होतें. पण सरकारच्या बाजूला दुराग्रह अज्ञान, आणि बेपर्वाई याशिवाय कांहीं दिसून आलें नाहीं. मोडीला अनुकूल असलेल्या पक्षानें तर्कशास्त्रसिद्ध युक्तिवादाच्या जोरावर बहुमतानें तो ठराव मंजूर करून घेतला. प्रत्येक जिल्ह्याला एखादा कलेक्टर त्याचे एक दोन असिस्टंट व एखादा जज अशा पांचचार युरोपियन लोकांच्या सोयीसाठीं हजारों देशी कारकुनांना सहज जलद लिहितां येणाऱ्या मोडी लिपीचा त्याग करून बाळबोधींत लिहिण्यास लावणें ह्मणजे अरेरावीपणाची शिकस्त ह्मणावयाची. ना. मि. परांजपे यांनीं पास करून घेतलेल्या ठरावानें या अरेरावीपणावर कुठाराघात केला व तो यशस्वी झाला याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. वादविवादांत लोकपक्षाला हा जय मिळाला खरा, पण प्रत्यक्ष व्यवहारांत सरकारी अधिकारी या नव्या ठरावानुरूप कितपत वागतात हें पहावयाचें आहे. या ठरावाची अंमलबजावणी योग्य प्रकारें न झाल्यास पुनः पुनः कौंसिलांत प्रश्न विचारून सरकारी अधिकाऱ्यांना सतावून सोडल्याखेरीज त हा लोकमताचा विजय पचूं देणार नाहींत. मुंबई इलाख्याप्रमाणेंच आमच्या मध्यप्रांतांतून ही मोडीचें उच्चाटन झालेलें आहे. येथें ही मोडीची प्रतिष्ठापना पुनः करण्याची हिंमत बाळगणारा परांजपे आमच्या नामदार मंडळींत कोणी निघेल काय? ना. मि. महाजनि यांनीं हें काम हातीं घ्यावें अशी आमची सूचना आहे.

---

## लोकसत्ता कीं प्रशियन जुलूम?

हल्लीं लोकसत्ता प्रसाराची एक जंगी लाट साऱ्या जगावर फिरत आहे, पण हिंदुस्थानावर ती येऊं नये, हिंदुस्थानांत युरोपियन अधिकाऱ्यांचेंच वर्चस्व कायम रहावें अशी सादिच्छा बाळगणारे कांहीं सात्विकवृत्तीचे लोक आहेत. अशांत मुंबईचे लार्ड बिशप याची गणना केली पाहिजे. जर्मनीचें सगळेंच वाईट, त्या बरोबर त्याची राज्यपद्धतिही तिरस्कारार्ह समजली जाते, पण हिंदुस्थानाला मात्र ती पद्धति अत्यंत योग्य आहे असें लॉर्ड बिशप साहेबांचें मत दिसतें. ब्रह्मदेवानें हिंदुस्थानाला दुसऱ्याची गुलामगिरी करण्यासाठींच निर्माण केलें, लोकसत्तेचा अनुभव घेण्यासाठीं नहीं, असें बिशप साहेबांना वाटत आहे. हिंदुस्थान लोकसत्तेचें वैभव भोगण्यास उतावीळ झालेला दिसत आहे व तें भोगण्याची पात्रताही त्याचे ठायीं आहे. पण त्यांकडे पाहावयाचेंच नाहीं असा बिशप साहेबांचा कृतनिश्चय दिसतो. प्राशियन राज्यपद्धति आज १५० वर्षांच्या अनुभवानें उत्कृष्ट ठरलेली आहे असें ते परवा डेक्कन सभेपुढील आपल्या भाषणांत ह्मणाले. ती पद्धति जर उत्कृष्ट आहे तर इंग्लंडांत ती सुरू करावी असें त्यांना कां वाटूं नये तें कळत नाहीं. पण तसें वाटत असेल तरी त्याबद्दल ब्र काढण्याची त्यांची छाती नाहीं. हिंदुस्थानासंबंधानें मात्र हवें त्यानें हवें तें बोलावें, असा प्रकार दिसतो. बिशप साहेबाना जी ही प्रशियन राज्यपद्धति इतकी प्यारी वाटते कीं तिचा अभिलाष ते स्वतःच्या देशासाठीं न करतां उदार मनानें ती हिंदुस्थानाला अर्पण करूं पाहतात, त्या पद्धतीचीं मूलभूत तत्त्वें तरी काय आहेत त्याचें वर्णन सर रवींद्रनाथ टागोर यांनीं एके ठिकाणी फार उत्कृष्ट प्रकारें केलें आहे. ते ह्मणतात कीं या पद्धतींत स्वार्थसाधुपणा हा पहिला व मुख्य गुण आहे. द्वेष व लोभ, भय व ढोंग, शंकेखोरपणा व जुलूम हे गुण त्यांच्या मागोमागच येतात. हे गुण राक्षसी स्वरूप धारण करून यथेच्छ धुमाकूळ घालतात मोठाल्या इमारती बांधतात, कारखाने काढतात, आणि व्यापारांत पैसा मिळवून लठ्ठ होतात. पण पुढें लवकरच त्यांचें पोट फुटतें; त्यांच्या तोंडांतून विषारी वाफा निघूं लागतात; आणि त्यांच्या ज्वालांनीं जें जें कांहीं समोर येईल तें जळून भस्म होतें. अशी ही प्रशियन पद्धति लॉर्ड बिशप साहेबांना जर मोहिनी वाटत असेल तर त्यांनीं ती स्वतःच्या देशाकरितां ठेवावी; हिंदुस्थानासारख्या देशाला नजर करण्याइतका मनाचा थोरपणा दाखविण्याचें कारण नाहीं आह्मां हिंदी लोकांना ती भस्मासुरासारखी दिसते.

---

## लॉर्ड सिडनह्याम.

मुंबईचे माजी गव्हर्नर लॉर्ड सिडनह्याम यांनीं हिंदुस्थानचें अन्न खाल्लें आहे. व खात आहेत पण, त्यांच्या मनाची प्रवृत्ति हिंदुस्थानाविषयीं सहानुभूतिपर नाहीं. उलट आहे, ही गोष्ट आतां सर्वांना ठाऊक आहे. इकडे असतां मुंबई इलाख्याचा कारभार त्यांनीं अरेरावीपणानें केला. अधिकाऱ्यांची सत्ता कमी होऊन लोकांची सत्ता वाढावी हें त्यांच्या दृष्टीनें राज्यावर महत्संकट, महान् अनर्थकारक आहे. कांग्रेस–मुस्लीमलीगनें मागितलेल्या सुधारणा घडून आल्यास अधिकाऱ्याची सत्ता कमी होऊन लोक सत्ता वाढेल, तें त्यांस नको आहे, फार काय, पण लोकमध्यें सत्ता मागण्याविषयीची जागृति उत्पन्न झाली आहे तेंच त्यांना नको आहे ह्मणून ही जागृति घडवून आणणाऱ्या मिसेस बिझांटबाईची मुक्तता घडवून आणण्यांत स्टेटसेक्रेटरी साहेब मि मांटेग्यु यांनीं मोठी चूक केली आहे. याबद्दल हाउस ऑफ लॉर्डस मध्यें ते टीका करणार आहेत. हिंदुस्थानांत बिझांटबाईच्या विरुद्ध व पर्यायानें मि. मांटग्यु यांचे विरुद्ध युरोपियन लोकांत जी खळबळ उडून राहिली आहे तिचे लॉर्डस् सभेतलें अध्वर्युत्व त्यांनीं आपलेकडे घेतलें आहे. हिंदुस्थानची हल्लींची राज्यपद्धतिच सर्वोत्कृष्ट आहे, तिचा पाया लोक मताच्या भक्कम आधारावर घालण्याचा प्रयत्न करून लोकांची तक्रार मिटाविणें या सारखी दुसरी चूक मुत्सद्दी करूं शकणार नाहींत असें त्यांचें मत आहे. अशा प्रकारचे विचार या विसाव्य शतकांत सडलेल्या मेंदू शिवाय इतरांकडून निघणें अशक्य आहे. राशियांत झारच्या हातीं सत्ता होती ती काढून घेऊन तेथें प्रजासत्ता स्थापित झाल्याबरोबर काय परिणाम झाला तो पहा व हिंदुस्थानांत तरी तशी चूक करूं नका असें ते बजावून सांगत आहेत. हिंदुस्थानची राशियाबरोबर तुलना ! धन्य आहे ती करणारांच्या अकलेची ! दुसरें काय ह्मणावयाचें ?

---

## महायुद्धाची प्रगति.

गेल्या आठवड्यांत राशियांत रिगाच्या आखातांत अगदीं अनपेक्षित रीतीनें शिशिर ऋतूचा वसंत ऋतू झाला. निराशेचे ढग वितळून आशेचा सूर्योदय झाला जर्मन शत्रूचें जंगी आरमार राशियन आरमाराला कोंडींत धरीत होतें. राशियन आरमारांत शत्रूशीं तोंड देण्याची ताकद नव्हती. त्याचा विनाशकाळ आठवड्यांनीं किंवा दिवसांनीं नव्हे तर तासांनीं मोजण्याची वेळ आली होती. पण परमेश्वराची करणी अगाध आहे. त्याच्या कृपेनें राशियन आरमारानें शत्रूची कोंडी फोडली इतकेंच नाहींतर शत्रूचें एक

ड्रेडनॉट, दोन क्रूझरें, व सहा टार्पेडो बोटी यांचा नाश केला! याबद्दल ॲडमिरल बखिरॉफ यांना खरोखर भाग्यवान् ह्मटलें पाहिजे. आतां राशीयन आरमार असेंच सुरक्षितपणें फिनल्यांडच्या आखातापर्यंत जाऊन पोंचतें कीं नाहीं तें पाहणें आहे. आतां ओसेल, मून व डागो हीं तिन्ही बेटें शत्रूंच्या हातांत पूर्णपणें गेलीं आहेत, व ते एस्थोनियाच्या किनाऱ्यावर उतरले आहेत. रिगाच्या आखातांतल्या राशीयन आरमाराला क्रॉनस्टाट येथील राशीयन आरमाराची मदत मिळूं शकली नाहीं ही दुर्दैवाची गोष्ट ह्मटली पाहिजे, आणि ती न मिळण्याचे कारण राशीयन लोकांतला शिस्तीचा अभाव हें आहे. क्रॉनस्टाटच्या आरमारांतले खलाशी त्यांच्या बंडखोरपणाबद्दल प्रसिद्ध आहेत. तेव्हां त्यांच्यापासून अशावेळीं मदत होईल अशी अपेक्षा करणें व्यर्थ आहे.

## राशियाची अंतःस्थ स्थिति.

ही अजून ही सुधारलेली दिसत नाहीं. राशीयात संप अद्याप चाललेच आहेत; तेथले मजूर भळभलत्या मागण्या करून अतिशय जरूरीच्या कामांत अडचणी उत्पन्न करीत आहेत; ही बंडळी मेडून टाकण्यासाठीं अतिशय कडक उपायांची योजना अधिकाऱ्यांनीं करावी असें कांहीं लोक ह्मणत आहेत तर कांहीं लोकाशीं सामोपचारानें न वागल्यास यांहून ही भयंकर प्रकार होतील असें ह्मणत आहेत. मॉ० केरेंझस्की लोकांची विनवणी करून व त्यांची समजूत घालून त्यांना सध्याची भयंकर स्थिति ओळखून तत्पर राहण्याविषयीं उपदेश करण्याची कोणती ही संधी वाया जाऊं देत नाहींत. जर्मनीच्या सैन्याला वश होऊन देशहितावर जळजळींत निखारा ठेवूं पाहणारे देशद्रोही लोक देशांत सर्वत्र संचार करून लोकांचीं मनें बिथरवीत आहेत, व अशा उपदेशकांचें ऐकूं नका असे हुकुम लष्करी अधिकारी आपल्या शिपायांना वरचेवर सोडीत आहेत. ही उत्तर राशीयांतली स्थिति झाली दक्षिण राशियांतली स्थिति ओडेसा येथील तारे वरून कोणाला ही कळण्यासारखी आहे. या तारेंत ह्मटलें आहे कीं लुटारू लोकांनीं व्लाडिकावकाड येथें एक आगगाडी रुळावरून पाडून शंभर उतारूंना मारलें व जखमी केलें! अशी गंभीर स्थिति जोंपर्यंत चालू आहे तोंपर्यंत राशियाच्या हातून रूमानियाला कितीशी मदत होईल तें दिसतेंच आहे. रूमानियानें आतांपर्यंत मोठ्या शिताफीनें म्याकेनसनला रोखून धरलें आहे; पण रूमानियन सैन्याला रसद मिळण्याची मारामार पडली आहे. अशा स्थितींत त्याचा निभाव फारवेळ लागणें कठीण दिसतें.

## जर्मन झेपलिनांचे आक्रमण

गेल्या आठवड्यांतली दुसरी महत्वाची गोष्ट ह्मणजे जर्मन झेपलिन जातीच्या विमानांनीं इंग्लंडवर केलेली स्वारी व तिची निष्फळता ही होय. या विमानाच्या स्वाऱ्या वारंवार पाठविण्यांत जर्मनीचा उद्देश तरी काय आहे तो कळत नाहीं. इंग्लंडच्या लोकांना भेवडावण्याचा किंवा त्यांचें नुकसान करण्याचा असेल तर तो प्रत्येक वेळेस निष्फळ झालेला आहे हें जर्मनीला पक्कें ठाऊक आहे. असें असतां पुनः पुनः स्वाऱ्या होत आहेत यावरून कांहीं निराळा तर्क करण्यास जागा मिळते. तो तर्क ह्मणजे हा कीं ज्याप्रमाणें पश्चिम रणांगणांत होत असलेली फजीती झांकण्याकरितां आणि जर्मन आरमार रिकामें पडून राहिलें आहे त्याच्या अंगांतला आळस झाडून टाकण्याकरितां राशियावरची स्वारी जर्मनीनें हातीं घेतली, त्याच प्रमाणें जर्मन लोकांत युद्धाच्या निष्फलत्वामुळें उत्पन्न झालेला असंतोष घालवून त्यांचे ठयीं थोडा बहुत उत्साह कायम राखण्याकरितां या विमानांच्या स्वाऱ्या होत असाव्या गेल्या आठवड्यांत जर्मनीनें याच उद्देशानें झेपलिन जहाजें इंग्लंडच्या किनाऱ्यावर पाठावलीं असलीं पाहिजेत. पण यांत जर्मनी सपशेल फसली. जर्मन विमानें आपलें कार्य उरकून परत जात असतां वाट चुकलीं, त्यांच्या जवळचें पेट्रोल संपलें, आणि अशा संकटाचे वेळीं फ्रेंच वैमानिकांनीं त्यांचा यथेच्छ समाचार घेऊन त्यांचा सत्यानाश केला. अकरा विमानापैकीं चारांनीं तर तेव्हांच गतप्राण होऊन पृथ्वीतल गांठलें, आणि चार इतकीं नादुरुस्त झालीं कीं, त्यांना स्वदेशभूमि पुन्हां दिसली कीं नाहीं याची शंकाच आहे. हीं विमानें जर्मनीनें मुद्दाम सुधारलेल्या नमुन्याचीं व अतिशय वेगवान् अशीं तयार केलेलीं होतीं. पण फ्रेंच एरोप्लेनपुढें झेपलिनचा टिकाव लागणें कठीण आहे हें जर्मनीला अद्याप कळूं नये हें आश्चर्य आहे.

## ब्रिटिश विमानें.

फ्रेंच वैमानिकांप्रमाणें पण निराळ्या प्रकारानें ब्रिटिश विमानें ही प्रशंसनीय कामगिरी करीत आहेत. सर डगलस हेग ह्मणतात कीं दाट धुकें असतां ही त्यांनीं एका जर्मन कारखान्यावर व रेलवे जंक्शनवर बांब फेकले, त्यामुळें मोठच उत्पात घडला. नुसत्या शनिवारीं २३८ बांब टाकण्यांत आले. असेच बांब निरनिराळ्या ठिकाणीं टाकण्यांत आले. कित्येक जर्मन विमानें या ठिकाणीं ठेवलेलीं होतीं, त्यांचा नाश झाला. ब्रिटिश व फ्रेंच वैमानिकांच्या मदतीला लवकरच अमेरिकन वैमानिक ही यावयाचे आहेत. अमेरिकेचीं विमानें अगदीं नव्या व सुधारलेल्या पद्धतीनें तयार केलेलीं असून तीं आल्यावर जर्मनीच्या विमानांना गपच बसावें लागेल असा अंदाज आहे.

## पश्चिम रणक्षेत्र.

गेल्या आठवड्यांत या रणक्षेत्रांत तोफांचा सामना सारखा सुरू होता. पण ह्मणण्यासारखी घटना एक ही झाली नाहीं. क्राइसेलसच्या उत्तरेस एका ठिकाणीं आयरिश शिपायांनीं मोठ्या बहादुरीनें शत्रूवर हल्ला करून कांहीं जर्मन कैद केले. रूटर ह्मणतो कीं एका जर्मन शिपायाच्याच पत्रावरून या रणांगणांत त्यांनी अतिशय मार खाल्याचें सिद्ध होतें. इंग्रजांनीं चार दिवसांत सात डिव्हिजनाचा नाश केला, आणि दुसरे दिवशीं पुनः पायदळाच्या दोन पलटणींतले एकूण एक लोक ठार केले. याच पत्रांत ह्मटलें आहे कीं कैसरच्या सैन्यांतले निवडक बहादर वीर एका मागून एक कामास येत आहेत. ब्रिटिश सैन्यापुढें टिकाव न धरवल्यामुळें त्यांचें धैर्य खचत चाललें आहे, व आतां काय करावें अशी चिंता कैसरच्या मनाला गुप्तपणें जाळीत आहे. बाह्यतः तो मिशाला पीळ घालीत आहे, पण वस्तुतः तो त्याच्या अंतःकरणाला पीळ पडत आहे.

पूर्व आफ्रिकेंतलें जर्मन सैन्य एकसारखें मागें मागें हटत चाललें आहे.

## चेंडूफळी.

### ( प्रांतिक टुर्नामेंट )

गेल्या गुरुवारपासून ४ दिवस येथील "**मित्रसमाजाची**" तिन्ही लॉनटेनिस पटागणें आनंदानें फुलून गेलीं होतीं. नावाजलेली टेनिसवाली मंडळी नागपूर, रायपूर, जबलपूर, वगैरे लांबलांबच्या ठिकाणांहून येऊन जयश्री मिळविण्यासाठीं आपापले पराकाष्ठेचें कौशल्य दाखवीत, तेव्हां टाळ्याचे गजर व प्रसन्न मुद्रा हीं विलक्षण अभिनंदन करीत असत. या टुर्नामेंटच्या महोत्सवाला मित्रसमाजानें फार शोभा आणली आणि गुदस्ता मिळविलेले आपले सुयशाचे सुवर्णरौप्य-पेले पुन्हा चिरस्थायी केले ही येथील टेनिसवाल्यांची बहादरी होय. क्षत्रिय तेज उदयास आणणारी ही ऑलम्पीयन ग्रीस पद्धती पाहून सरकारच्या सैन्य भरतीचीं प्रसाद चिन्हें कोणा सहृदय माणसास येथें दृश्य होणार नाहींत बरें! सरकार सहृदय होईल तर हिंदी सैन्यांतल्या सर्व जागा अतुलश्रीनें आमची हीच मंडळी भरून काढतील हें रहस्य आह्माला तर ही खेळाचीं मैदानें आपल्या सौम्य पण मुग्धवाणीनें कळवीत आहेत.

# वऱ्हाडवृत्त.

**हवामान**—हेमंत ऋतु पाण्याला गोडी, अन्नाला चव व शरीराला कांती ही क्रमशः नवी नवी आणीत आहे. कपाशीचीं पांढरीं शुभ्र बोंडें व ज्वारीचीं कणसें हीं स्वातीच्या उन्हानें शेतकऱ्यांच्या डोळ्यांना आनंदवीत आहेत.

**प्लेगः**— तारीख २० आक्टोबरच्या सप्तकांत उमरावती जिल्ह्यांत बडनेरा, चांदूर, मोर्शी, मंगरूळदस्तगीर, खानजमानपूर, येवली, शिरला देवतवाडा, भावली, रामतीर्थ वगैरे गांवें मिळून ११६ प्लेगाचे मृत्यू झाले. यवतमाळ, दिग्रस व इतर गांवें मिळून ३३ प्लेगाचे मृत्यू झाले. वाशिंटाकळी वाशीम, पातूर, कारंजा, बाळापूर शिरपूर व इतर गावें मिळून आकोला जिल्ह्यात प्लेगाचे मृत्यू २२४ झाले बुल्ढाणा जिल्ह्यांत हें प्रमाण फार सौम्य ह्मणजे २६ आहे. आकोल्याच्या पेठेंतील काळ्या चबुतऱ्याच्या पलीकडील उत्तर भागांत स्थानिक प्लेगाचे मृत्यू होऊं लागले आहेत व लोक वनांतील मंगल वस्तीला जाण्याचा क्रम सुधारत आहेत.

**इषारा**—वऱ्हाडांतील साधु डेबूजी महाराज उर्फ गोदडे बुवा हे कीर्तनें करून लोकांस धर्म शिकवीत असतात, पण त्यांना कशाचीही जरूर नसतांना कांहीं भोंदू लोक शिष्य ह्मणून पैसा उकळीत असतात. तसा प्रकार होऊं नये ह्मणून सूचनार्थ पुण्याच्या कांहीं मंडळींनीं मुद्दाम इशारा दिला आहे.

आलिशान नामदार चीफ कमिशनर साहेब यांची स्वारी येत्या २ नोव्हेंबरला निघून कटनी, बिलासपूर, रायपूर मार्गानें ११ तारखेपर्यंत नागपूरला येणार आहे.

नामदार दादाभाई कौंसिलदार यांच्या जागीं नव्या सभासदाची निवड आमचे प्रांतिक कायदे कौंसिल १ ल्या डिसेंबर रोजीं करतांना जबाबदार व स्वातंत्र्यशील असा सभासद निवडून देण्याविषयीं काळजी घेईल तर मागील चुकांची पुनरावृत्ती होणार नाहीं.

रा० रा० धुंडिराज विश्वनाथ परांजपे मुन्सफ खामगांव यांस गोंदियाला बदलून रा० रा० अमृत विश्वनाथ ताडके यांस पुसद येथें बदलण्यांत आलें.

रा० रा० सिद्धेश्वर घोष मुन्सफ यांस सोहागपुराहून मेहकर येथें बदलण्यांत आलें.

रा० रा० मूलचंद शुक्ल मुन्सफ रामटेक यांस वाशिम येथें बदलण्यांत आलें.

**युद्धकर्ज** —१३ आक्टोबरपर्यंत मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून युद्धकर्जाची रक्कम २१०१८६०८ रुपयावर झाली आहे. लोकभक्तीची ही उत्कृष्ठ साक्ष होय.

**स्वागत**—कपाशीचा हंगाम आतां सुरू होणार तोंच जपानचे घाऊक व्यापारी भराभर ठिकाठिकाणीं उतरत आहेत, आणि त्यांचें स्वागत आमची देशी व्यापारी मंडळी पुष्पमालांनीं करतांना दृष्टीस पडतात. खऱ्या औद्योगिक संग्रामांत आह्माला जर्मनी काय अगर जपान काय सारखाच हितशत्रु होय. हिंदी स्वराज्य झाल्याशिवाय ही औद्योगिक तटबंदी घालणें ब्रिटिश साम्राज्याला शक्य नाहीं.

**गोदोहन**—नुकत्याच गेलेल्या गंधर्व नाटकमंडळीनें व पटवर्धन सर्कस मंडळीनें युद्ध फंडासाठीं आपापला एकेक खेल दिला व अधिकारी मंडळी व कांहीं परिश्रमवाले सुखवस्तु यांनीं या दोन्ही गाई दोहून जितकें लेणी काढतां येईल तितकें काढल्याबद्दल सर्वजण प्रशंसेला पात्र होत.

**रिस्ले छाप**—स्थानिक सरकारनीं नुकताच एक ठराव बाहेर काढला आहे आणि रिस्ले सर्क्युलराची पुन्हा सुधारलेली आवृत्ती विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या सुखबोधासाठीं प्रकाशित केली आहे. यापुढील दाद देण्याला हिंदुस्थान सरकारच समर्थ होय. सुदर्शन ज्याचें त्यालाच काढतां येईल.

मुक्काम फत्तेखेर्डा ता. मेहकर येथें ता० २१-१०-१९१७ रोजीं तालुका कांग्रेस कमिटीच्या विद्यमानें जंगी जाहीर सभा होऊन नामदार मॅंटेग्यु साहेब यानकडे पाठविण्यांत येणाऱ्या अर्जावर सह्या करण्याचें काम करण्यांत आलें. तसेंच महमदअली व शौकत अली यांना सोडून देण्याविषयीं ठराव करण्यांत आला व तो हिंदुस्थान सरकाराकडे पाठविण्याचें ठरलें. समेंत रा. काळे वकील, राजेंद्रकर वकील, रा. सोमण

वगैरेंचीं भाषणें झालीं व ता० २२-१० १९१७ रोजीं मुक्काम देऊळगांवमाळी येथें जाहिर सभा भरविण्यांत येऊन वर प्रमाणेंच काम करण्यांत आलें.


## रोल्डगोल्ड सोन्याचे

### कधींच काळे न पडणारे दागिने

चंद्रहार किं. रु. ३-४; गोठ जोडी २-२॥; पाटल्या जडी २-२॥; वज्रटीका ३-४; ठुशी ६. नथ उत्तम मोत्यांनीं बांधलेली ४-९. शिंप्याचें मोतीं व्हान मोठें वाटेल तसें. सगाची २-३-४; अंगठी १; सल्ले अष्टपैलू जोडी १॥ बांगड्या जोडी २-२॥. सरी ४

दिवाळीकरितां सुगंधी मालाची प्रचंड लूट. !!

# आर्यवनौषधालय—मुर्डी.

## दीपावली. ॐ नमः श्रीगणेशाय. दिवाळी.

### अति उंच सुगंधि अत्तरांच्या पेट्या.

**प्रत्येक पेटीची किंमत पोष्ट ख. सह (१८१२)**

या पेट्या उत्तम सागाच्या लांकडाच्या मजबूत तयार करून त्यावर उत्तम पॉलिश केलेलें आहे. यामुळें पेटी विशेष मनोहर बनली आहे. या पेटींत गुलाब, हिना, वाळा, केवडा इत्यादि अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, उंची बेलिया बाटली एक, सुगंधि उटणें, गंधाचे रवे, स्त्रियाकरितां लालभडक कुंकू व हळद, असे एकंदर सुगंधि अकरा पदार्थ ठेविले आहेत. पेटींतील सर्व सुगंधि माल फार उत्तम ठेविला असून तो सर्वांना घेण्यास जबर वाटूं नये ह्मणून आह्मी आपला कोणत्याहि तऱ्हेचा फायदा ठेविला नसून प्रत्येक पेटी किंमत पो. ख. सह अवघी १८१२ ठेविली आहे. या पेट्या एकदम पांच घेणाराला एक पेटी, व आठ घेणाराला दोन पेट्या, चौदा घेणारास चार पेट्या कमिशन दाखल फुकट देऊं. वरील वर्णनावरून पेटीची किंमत किती अल्प ठेविली आहे, हें पेटींतील सर्व सुगंधि माल लक्ष्यपूर्वक पाहिल्यास सहज कळून येईल.

### उंची बादशाही अत्तरांच्या पेट्या.

**पेटीची किंमत पो. ख. सह तीन रुपये. (३)**

ही पेटी सागाच्या लांकडाची फारच सुबक बनवून वर सुरेख पॉलिश केलें आहे. या पेटींत सुरंगी, मालती, राजविलास, इत्यादि बादशाही अत्तरांनीं भरलेल्या बाटल्या सहा, बादशाही केशसौगंधिनी तेल बाटली एक, उटणें, गंधाचे रवे व स्त्रियांकरितां कुंकू, हळद व काजळ असे एकंदर बारा बादशाही सुगंध पदार्थ ठेविले आहेत. इतके असूनाहि या पेटीची किंमत अगदीं अल्प पो. ख. सह ३ ठेविली आहे. पेटींतील प्रत्येक मालाचें निरीक्षण केल्यास आह्मी ही ठेवलेली किंमत फारच अल्प ठरेल, तरी सर्वांनीं या पेट्यांचा अवश्य उपयोग करावा. या पेट्याहि एकदम पांच घेणाराला एक पेटी, व आठ घेणाराला दोन पेट्या कमिशनदाखल देऊं. पेटींतील सर्व माल अति उंची वापरला आहे. पाहिल्यावर सहज खात्री होईल.

### राजविलासी बादशाही अत्तरें.

| | | | |
|---|---|---|---|
| सुरंगी नं. १ | मालती, | गंधराज | लक्ष्मीविलास |
| दर तोळ्यास ३ रुपये | पुष्पराज | राजविलास | मदनविलास |

वरील अत्तरें आमच्या सौगंधिक कारखान्यांत विशेष मोठ्या प्रमाणावर तयार केलेली असून ती अतिसौगंधिक आहेत. या अत्तरांची प्रसिद्धि सर्वत्र झालेली असल्यामुळें विशेष वर्णन करण्याची जरूर नाहीं. ही अत्तरें पाव तोळ्यापासून पाहिजे तितकीं मिळतील व तीं खालील पत्यावर बिनचूक मागवावीं.

### उत्तम सुगंधी अत्तरें.

गुलाब, हिना, केवडा, अंबर, मोतिया. वाळा (खस), जाई, सोनचांफा, बकुल दवणा, पाच, पारिजातक केशर दर तोळ्यास १८८

**जीवनपुरी तैलें**—बेलिया चमेली हीना मसाला वगैरे तैल दर १० तों. १ रु०

वरील सुगंधी मालाच्या किंमती फारच अल्प ठेविल्या मुळें या वस्तूंना कमिशन मिळणार नाही. अत्तरें पाव तोळ्यापेक्षां कमी मिळणार नाहींत.

### अगोदर हें वाचा. फायदा आहे ! !

वरील सर्व सुगंधी माल दिवाळीचे सणाकरितांच अल्प किंमतीस द्यावयाचा आहे व त्याचा लाभ श्रीमंतांपासून गोरगरीबांपर्यंत सर्वांनीं घ्यावा व दिवाळीसारखा आनंदी सण आनंदांत घालवावा हिच आमची इच्छा असल्यामुळें यंदा हा माल फारच स्वस्ता केला आहे त्याचा लाभ सर्वांनीं जरूर घ्यावा. नकली मालास किंवा नकली वर्णनास भूलूं नये व फसूं ही नये. व्हि० पी० नें० पाठवूं.

**कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य मुर्डी**

पो० हर्णै जि० रत्नागिरी

नो० नं० ४३१

## केंस काळे करण्याचा साबण.

हा साबण अनेक परिश्रमानें तयार केला आहे. यानें केस काळे होतात व कायमचे काळे रहातात. तीन वड्यांच्या बाक्सची किं. १॥ रु.

पत्ता— **मगनलाल के. आणि कंपनी**

**गिरगांव— मुंबई**

नो० नं० ९

### अंगुरी

# हिंग.

पवित्र आणि अस्सल १८८ उत्तम कस्तुरी ३९, शुद्धशिलाजीत ८८ सुर्मा ममीरा ३ तो. अंगूरी हींग २।, सुगंधित जीरा १= कागजी बादाम ८९ पौंड, सेवाचा मुरब्बा २ पौं. टिन १।

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० ९**

नो० नं० ९

### गरीबांस फुकट

# रामबाण मलम

( कोणत्याहि त्वग्रोगावर )

गुणकारी किं. ६ आणे.

# केशनाशक पूड.

( ९ आणे )

(क्याटलॉग फुकट) पत्ता. व्ही. आर. मुळे

नांदूरा. G. I. P.

नो० नं० ३७०


### नोटीस

नोटिस बेशमी येशुसंगई सोनासंगई लाड दुकान अंजनगांव ता. दर्यापूर

यांना—

खाली सही करणार यांजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आह्मी पूर्वी आह्मी आपले शेत तुमचे रुपयाचा हवाला देऊन विकले, व त्याजबद्दल आह्मी तुह्मास ज्या नोटिशी दिल्या आहेत त्या आमचे इच्छे प्रमाणें दिल्या. असून खऱ्या व प्रामाणिकपणाच्या आहेत. मयत आमचा बाप यांचे देवघेवीचे तुमचे खात्यामध्यें जमाखर्च खरेपणाचा नसून त्यांत रेंग असल्या कारणानें तुह्मी आह्मास आमच्या नोटिशीप्रमाणें खाते व हिशोब न दाखवितां टाळाटाळ केली. व आह्मी गैर माहितगार असल्यामुळें आमचे गैर माहितीचा तुह्मी फायदा घेऊन आमची उलट सुलट समजूत करून व लालुच दाखवून तुह्मी माझी जुनी असामी असल्यामुळें सर्वस्वी तुमचा फायदा करून देतो असें आह्मास सांगून तुह्मी आपले मतांत घेतले. व तुमचे मताप्रमाणें तुमचे फायद्याची आमचा हवाला घेणार पांडूजी पाटील यास आमचे सहीची नोटिस ही देवविली. हे त्या नोटिशींतील मजकुरावरून दिसून येते, व त्याच प्रमाणें आमचेकडून तुमचे फायद्याचे व आमचे नुकसानीचे व्यवहार हवालेवाल्याचे विरुद्ध करविले आणि सदर्हू व्यवहारांत तुमचे अंगावर कोणते ही प्रकारे पैशाची किंवा कोणतेच प्रकारची जोखीम येत नाहीं व येऊं देणार नाहीं अशी आमची समजूत करून तुमचे खाते व हिशेब आह्मास कोणते ही प्रकारे न दाखवितां तुमचे इच्छेप्रमाणें लिहून आमच्या सह्या हिशेबावर व कोऱ्या कागदावर सुमारे दोन महिन्यापूर्वीं करून घेतल्या वं आह्मी तुमचे इच्छेप्रमाणें व मताप्रमाणें तुमच्याशीं वर्तन केल्याकारणानें आमचे फायद्याकरितां व आमचे कल्याणा करितां व आमचे कल्याणाकरितां तुह्मी आमचे जवळून ३०० तीनशे रुपये नगदी घेऊन शिवाअंदाकारावाले शेतांतील चार एकर शेत आह्मास सदर्हु तीनशे रुपयाचे मोबदल्यांत देण्यांचा ठराव केला व आमचे जवळ आमचे शेतापैकीं राहिलेले चार एकर शेत नी जोखमी करून देण्याचे कबूल केलें व तुमचे मताप्रमाणें हवाले वाल्यावर फौजदारींत करविलेल्या फिर्यादीचा खर्च तुह्मी आपले जवळून दिला. तो आमचे जवळून न घेण्याचेही कबूल केले होते परंतु हल्लीं आपले वर्तमानामध्ये आह्मास कांहीं फरक दिसुन आल्यामूळे आह्मी सदरील व्यवहार कांहीं समंजस लोकांस कळविल्यावरून आमची फसवणूक झाल्याबद्दल आह्मास समजले आहे. करितां या नोटिशीनें कळवितो कीं तुह्मी कबूल केल्याप्रमाणें तुमचे पैसे हवालेवाल्यांकडून वसूल करून घेऊन आमचे जवळ हल्लीं आमची असलेली मिळकत व आह्मास निजोखमी करून देऊन आमचेपासून करून घेतलेल्या सह्यांचे ऐवजीं व मुबादल्या ऐवजीं व आह्मी तुमचे मताप्रमाणें वर्तन केल्या ऐवजीं आह्मास शिवाय अडोकारावाले तुमचे शेतांतील चार एकर शेत आह्मास देण्याचा ठराव केला. ते आमचे नांवानीं खरेदीकरून देऊन सदरील व्यवहाराबद्दल लेख सुमारें आठ दिवसाचे आंत करून देऊन नोंदून द्यावेत. तसें तुमचेकडून न झाल्यास तुह्मी आह्मास जाणून बुजून भरंवशानें फूसलाऊन फसविल्याबद्दल व सदर्हू व्यवहारांत आह्मी फसून तुह्मी आपला अन्यायाचा फायदा करून घेतल्याबद्दल तुमचेवर फौजदारी कोर्टांत फिर्याद केली जाईल. कळावें. तारीख २९ माहे आक्टोबर सन १९१७ इसवी दस्तुर बाजीराव भदाजी गोळे राहणार हंतोड

सह्या

१ बाजीराव भदाजी गोळे रा. हंतोड ता. दर्यापूर द. खुद

२ शामराव भदाजी गोळे रा. हंतोड ता. दर्यापूर द. खुद

नो० नं० ४३९

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यात नारायण खंडेराव फडके यांनी सदाशिवाश्रमांत छापून प्रसिद्ध केलें